साप्ताहिक साधना

२ जुलै १९८३/दोन रुपये.






साप्ताहिक

# माणूस

◻

वर्ष : तेविसावे

अंक : पाचवा

◻

२ जुलै १९८३

किंमत : दोन रुपये

◻

संपादक

श्री. ग. माजगावकर

◻

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

◻

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

◻

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही

◻

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

◻

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

◻

मुखपृष्ठ

संजय पवार

## सप्रेम नमस्कार

◻ 'माणूस' दिवसेंदिवस अधिकाधिक मोकळा होत जातोय. वासंतिक विशेषांक मालिका नोंद घ्यावी अशीच आहे. 'पाया हादरलेली घरं' या आयुष्याशी अतिशय निगडित तरीही दुर्लक्षित असलेल्या विषयावरचे विविध लेख लक्षवेधी—काही लेख तर फारच 'अपील' झाले. डॉ शुभदा शेळके व नीलिमा देशपांडे यांची प्रकट आत्मनिवेदने वाचताना त्यात मला स्वत लाच अगदी स्पष्ट वाचल्यासारखे वाटले. डॉ. शेळके यांचे 'दोस्ती'च्या संदर्भातले स्वानुभवी निष्कर्ष त्याच अनुभवातून गेल्यामुळे अगदी ततोतंत पटले. 'लग्न का करत नाहीस ?' या प्रश्नाची यथार्थ, परखड आणि सडेतोड मीमांसा करणारा नीलिमा देशपांडेंचा लेख फार पटून गेला. असे जगण्याची इच्छा खूप जणांना असते, पण हे खूपजणही तसे अल्पसंख्याकच असतात. म्हणूनच नीलिमाबाईंसारख्या कुणी वाचकांना भेटल्या तरीही प्रचंड दिलासा मिळतो. ही वाट कापायला उमेद येते.

थ्री चिअर्स फॉर माणूस !

३० मे ८३ — सुरेखा जोशी, देवरुख

◻ अभिनंदन.

वासंतिक अंक मालिका अप्रतिम !

शारदाबाई आपट्यांचे तीर्थरूप अक्का, एका मावळत्या समाजाचे उत्तम चित्र आहे.

३१ मे ८३ — कुमार केतकर, ठाणे

◻ 'माणूस'चे स्वरूप बदलल्यापासून अधिक आकर्षक झालेल्या 'माणूस'च्या वासंतिक विशेषांकाची मालिका हातात पडू लागल्यापासून असे वाटते की 'माणूस'ने पुन. एकदा कात टाकलीय आणि कात टाकल्यावर झळाळणाऱ्या नागराजाप्रमाणे 'माणूस'चे हे अंक झळाळू लागले आहेत अत्यंत आनंद व समाधानाची गोष्ट की, या झगमगाटात 'माणूस' प्रबोधन विसरलेला नाही. 'गोंडा जिल्ह्याची भ्रमंती' आणि 'पाया हादरलेली घरं' ह्या लेखमाला हेच सांगत आहेत.

या मालिकेवरून आणखीही काही मनात आले त्यासाठी हे पत्र 'माणूस'मधून अनेक विषयावर सर्वांगीण चर्चा होते; पण 'माणूस'च्या रसिक वाचकांचा मेळावा अद्याप भरविला जात नाही. या वासंतिक मालिकेच्या समारोपानंतर पावसाळ्यापूर्वी मुंबईत असा मेळावा भरवावा मुंबईत सुचविण्याचे कारण की, पुण्यात अनेक उपक्रम होतात त्यामानाने आमच्या मुंबईच्या धकाधकीच्या जीवनात असे क्षण फार कमी असतात.

२२ मे ८३ — मंगेश नाबर, मुंबई

◻ 'त्याची माझी मैत्री' शोभा भागवत यांचा 'माणूस वर्षारंभ विशेषांका'तील लेख जितका सुंदर तितकेच त्याचं मुखपृष्ठ उथळ ! लेखाशी विसंगत असं उथळ मुखपृष्ठ 'माणूस'ने तरी टाळायला हवे होते.

मागील अंकातील 'माझा घटस्फोट' हा लेखदेखील अंतर्मुख करणारा होता. संवेदनाशील अरुणा साठे यांच्या संसार-प्रवासाची परिणती या टोकापर्यंत जाणे ही एक अपरिहार्य बाब होती; पण त्यासाठी त्यांनी जे धैर्य दाखवले ते कौतुकास्पद आहे. (एकंदर आपल्या सामाजिक परिस्थितीचा

### मुखपृष्ठावरील छायाचित्रांत

१) काळाराम मंदिराच्या महाद्वारापाशी सावरकर-समता ज्योतीचे स्वागत करताना—

डावीकडून— १. श्याम जाजू. २. कवी कुसुमाग्रज. ३. समतायात्री शेखर चंद्रात्रे.
४. दया पवार. ५. रिपब्लिकन पक्षाच्या नेत्या श्रीमती शांताबाई दाणी.
६. श्री. सुधीर फडके. ७. आमदार विनायकराव पाटील.

२) डॉ. फारुख शेख यांचे स्वागत.

विचार करता) नानाजींच्या प्रयोगाची सविस्तर ओळख वासंतिक विशेषांकामधून करून दिल्याबद्दल धन्यवाद ! 'ब्लड कॅन्सर' ही कादंबरीही 'माणूस'च्या परंपरेला साजेशी.

असंच सकस साहित्य 'माणूस'ने द्यावे व आपली उपक्रमशीलता अशीच नित्य नूतन रूपे घेत आमच्यासमोर यावी अशी अपेक्षा.

१६ जून ८३ — शरद सुर्वे
उस्मानाबाद

□ बोलता बोलता 'माणूस'ने बावीस वर्षांची वाटचाल पूर्ण करून तेविसाव्या वर्षांत पदार्पण केले. यंदा वासंतिक विशेषांकातील चारही अंक चांगले निघाले. मला तिसरा विशेषांक मिळाला नाही; पण इतरत्र पाहिला.

वर्षारंभ अंकातील श्री. वि. स. वाळिंबे यांनी 'औदुंबर आळीपासून सारसबागेपर्यंत' मध्ये केशवराव कोठावळे यांच्या मनोज्ञ व्यक्तित्वाचा चांगला वेध घेतला आहे. उ. प्र. मधील 'गोंडा'प्रमाणे मराठवाड्यातील बीड जिल्हा विकासासाठी दीनदयाळ संस्थेने घेतला हे फार चांगले झाले. कारण आमच्यासारख्यांना 'गोंडा'ला जाऊन कार्य पाहणे अवघड. बीडमध्ये त्याची झलक दिसेल.

वासंतिक अंकातील 'ब्लड कॅन्सर' कादंबरी अत्यंत वैशिष्टयपूर्ण वाटली. अरुणा साठेंचे घटस्फोटासंबंधीचे विवेचन मनमोकळे आहे. रमेश साठेंचे अनुभवकथन देता आले असते तर बरे झाले असते.

'माणूस'चे स्वरूप अधिक आकर्षक होत आहे. वाचकवर्ग मोठ्या प्रमाणात आकर्षित होत आहे असे मला माझ्या प्रवासात दिसून येते.

६ जून ८३ — प्रा. देवदत्त तुंगार
नांदेड

□ वासंतिक 'माणूस' अंक वाचले. मृदुलाच्या मनाची स्त्रीसुलभ अशी आंदोलने चितारणारी 'अधांतरी' कथा आवडली; पण त्याबरोबरच हेही जाणवले की, हे आजच्या समाजाचे—पाया हादरलेल्या घराचे चित्रण नव्हे. प्रतिबिंब नव्हे. 'रक्ताच्या नात्याला Substitute नसतो...'सारखी काही वाक्ये खरोखरच विचार करायला लावणारी, स्वप्नाळू मनाला जागे करून वास्तवाचे भान देणारी वाटली.

'लग्न का करत नाहीस'— हा नीलिमा देशपांडे यांचा लेख खरोखरच समाजमनाला हादरे देणारा वाटला. 'मुली सुखी-समाधानी व्हाव्यात म्हणून केवळ त्यांचे लग्न करण्यापेक्षा आपली जबाबदारी पूर्ण करण्याची अधिक घाई वडील माणसांना झालेली दिसते.'—हे त्यांच्या लेखातील वाक्य दुर्दैवाने खरे आहे. स्त्रीच्या स्वतंत्र कर्तृत्वाचा विचारच होत नाही हे खरे; पण लग्न न करणे हा यावरचा जालीम उपाय नव्हे असं आपलं माझं मत. एकंदरीतच आपले वासंतिक अंक वाचनीय आहेत. 'ब्लड कॅन्सर' ही प्रा. राईलकरांनी अनुवादित केलेली कादंबरी खरोखरच वाचनीय, मनाला जाऊन भिडणारी. अनुवादही छान जमला आहे.

जाता जाता एक सूचना करावीशी वाटते. पाया हादरलेल्या घराचे नुसतेच दर्शन घडविण्यापेक्षा त्यावरचे उपाय—वेगवेगळ्या वयोगटानुसार, आर्थिक दर्जानुसार—कसे योजले जावेत, याविषयीचा आढावा—परिसंवाद, चर्चा यामधून घेता आला असता. असो. एकूण 'माणूस'च्या वासंतिक अंकाने आपल्या परंपरेला साजेसे सुरेख लिखाण आम्हा वाचकांना दिल्याबद्दल धन्यवाद !

१७ जून ८३ — प्रा. सौ. मंगला गोखले
मुंबई

□ सा. माणूसच्या वासंतिक विशेषांक मालिकेतील चारही अंक फारच आवडले. विशेषत: दिल्लीच्या दीनदयाळ संस्थेने नानाजी देशमुख यांच्या नेतृत्वाखाली, गोंडा जिल्ह्यात चालू केलेल्या ग्रामोदय प्रकल्पावरील श्री. दत्तप्रसाद दाभोळकर यांचे लेख मनस्वी आवडले. त्यांची लिहिण्याची स्टाइल पण उत्तम आहे. त्यांना आभार कळवावे.

त्याचप्रमाणे 'पाया हादरलेली घरे' या ज्वलंत विषयावरी सर्व लेख व मुलाखती विचार करायला लावणाऱ्या आहेत. या वर्षीचा तीव्र उन्हाळा आपल्या वासंतिक विशेषांक मालिकेमुळे सुसह्य झाला. या नवीन उपक्रमाबद्दल धन्यवाद !

१ जून ८३ — रा. म. गोरकर
बार्शी




....पृष्ठ ३२ वर

## पुणेवार्ता

# अंधश्रद्धा-निर्मूलन समिती

‘अंधश्रद्धा निर्मूलन समिती’ इतकं सरळ आणि स्पष्ट नाव धारण करणारी एक संघटना नुकतीच स्थापन झाली आहे. तरुण पत्रकार श्याम मानव, नागपूर विद्यापीठाच्या मानसशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. चंद्रशेखर पांडे, मानवीय नास्तिक मंचाचे डॉ. सुधाकर जोशी हे समितीचे काही खंदे कार्यकर्ते. समितीनं स्वतःपुढे ठेवलेला कार्यक्रम अतिशय स्पष्ट आहे. जिथे जिथे म्हणून बुवाबाजी – ढोंगबाजी – भगतबाजीचा रोग दिसेल तिथे तिथे ही अंधश्रद्धा-निर्मूलनाची, विज्ञाननिष्ठेची लस टोचायची.

अंधश्रद्धा-निर्मूलन समितीच्या कामाची ओळख झाली ती श्याम मानव यांनी नुकत्याच घेतलेल्या पत्रकार परिषदेमुळे. या परिषदेत श्याम मानव यांनी तीन जाहीर आव्हानं समोर ठेवली. त्यापैकी एक आव्हान सर्वाधिक खपाचं पिवळं साप्ताहिक ‘श्री’ व या साप्ताहिकाचे लेखक अरुण ताम्हनकर यांना दिलं आहे. १९ फेब्रुवारी ८३ च्या ‘श्री’च्या अंकात ‘आम्ही काढलेयत आत्म्याचे फोटो’ या मथळ्याखाली एक मुखपृष्ठकथा प्रसिद्ध झाली आहे. या कथेला जोडून आत्म्याचे फोटो घेतानाचे टप्पे छायाचित्रातून दाखवले आहेत. ‘हे परामानसशास्त्रातले भारताचे पहिले यशस्वी संशोधन’ असल्याचा दावाही या लेखात केला आहे. समितीनं दिलेलं आव्हान या संदर्भात आहे. ‘फोटो काढण्यासाठी एक भूत सादर करा आणि एक लाख रुपये मिळवा!’ असं हे दणदणीत आव्हान आहे. या आव्हानाबरोबरच ‘श्री’ साप्ताहिक व अरुण ताम्हणकर यांच्यावर समितीनं काही आरोप केले आहेत. आत्म्याचे फोटो ही साधी ट्रिक फोटोग्राफीची किमया आहे असं विधान करून समितीनं म्हटलं आहे की, स्वामी विद्यानंद आणि अरुण ताम्हणकर यांच्या सम्मीलित बुवाबाजीचा हा आविष्कार आहे. आरोप क्रमांक दोन आहे, ‘श्री’ साप्ताहिकानं तद्दन खोटी आणि लोकांच्या मनातल्या अंधश्रद्धांना खतपाणी घालणारी धादांत खोटी गोष्ट केवळ धंद्यासाठी छापून लोकांची फसवणूक केली आहे.

या एक लाखाच्या आव्हानाबरोबर अन्नपाण्यावाचून जिवंत रहाण्याचा दावा करणाऱ्या संत जनाबाईला समितीने दुसरे आव्हान दिले आहे. ‘मंत्रशक्तीने रोग दुरुस्त करून दाखवा’ हे समितीचे तिसरे आव्हान आहे.

ही आव्हाने अजून तरी स्वीकारलेली नाहीत.

आज भारतीय समाजात अंधश्रद्धेनं अक्षरशः थैमान घातलं आहे. तथाकथित चमत्कारांच्या दर्शनानं भाळून साधूंच्या मागे लागणं, भानामतीच्या लीलांनी गर्भगळित होणं, भुताखेताच्या कल्पनांना बळी पडून मानसिक आजारानं पछाडणं, देवी अंगात येण्याच्या कल्पनेवर विश्वासून मानसिकदृष्ट्या गुलाम होणं इत्यादी प्रकारांना सुशिक्षित–अशिक्षित हे भेद ओलांडून सर्व थरांतील लोक दररोज बळी जात आहेत. किंबहुना ‘सोफिस्टिकेटेड’ बुवाबाजीची एक नवी लाट नव्याने येऊ बघत आहे.

दैवी चमत्कार आणि मंत्र-तंत्रशक्तीची एक मोठीच परंपरा फार पुरातनकाळापासून साधु–संतांनी आपल्या समाजाला दिलेली आहे. धार्मिक श्रद्धेच्या दडपणाखाली या प्राचीन चमत्कारांची सत्यासत्यता पडताळून पहाण्याचा विवेकही आपण गमावून बसलो आहोत. त्या परंपरेचा मोठा प्रवाह आज गल्लीबोळातल्या बुवांपर्यंत आला आहे. हात घासून विभूती काढून देणं, हातावर कापूर पेटवून दाखवणं, अंगात आलेल्या बायकांनी–पुरुषांनी असल्या क्षुल्लक हातचलाख्या करून धंदेवाईक बुवा बनलेल्यांची संख्याही कमी नाही. या बुवांच्या नादाला बळी पडून वाट्टेल त्या अघोरी मार्गाला लागून आपल्याबरोबरच इतरांच्याही आयुष्याचा सर्वनाश करणाऱ्या अनेक माणसांच्या बातम्या आपण दैनिकांतून वाचतो.

अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्यावतीनं श्याम मानव यांनी यासाठी एक धडक कार्यक्रम आखला आहे. चमत्कार, भूत-भानामती यासंबंधीच्या भ्रामक कल्पना दूर करण्यासाठी मूलभूत लोकशिक्षण करणं हाच उपाय आहे असं तेही मानतात. बुवांच्या अनेक ‘ट्रिक्स’ मानव करू शकतात. त्या ट्रिक्स कशा करता येतात हे दाखवूनही देतात आणि नोट जाळून त्याच नंबरची दुसरी नोट करणं यासारखी खास जादुगारी ट्रिकसुद्धा ते चलाखीनं करतात. श्याम मानव यांनी या निर्मूलन-कामात आखलेला कार्यक्रम प्रात्यक्षिके आणि त्यावरील चिकित्सक भाषण अशा स्वरूपाचा आहे. खेड्यापाड्यातल्या अडाणी लोकांपासून पॉश वस्तीतल्या सुखवस्तू उच्चभ्रू अडाण्यापर्यंत या किंवा अशा कार्यक्रमांची सारखीच गरज आहे. पण समितीचं खरं लक्ष आहे ते शाळा-कॉलेजातीच तरुण मुलं-मुली ज्यांच्यावर विज्ञाननिष्ठेचे खरे संस्कार करण्याची गरज आहे. पण मानसिक परावलंबित्वापासून निदान या तरुणांनी तरी दूर रहावं आणि उद्याची समर्थ पिढी निर्माण करावी यासाठी कराव्या लागणाऱ्या प्रयत्नात अंधश्रद्धानिर्मूलन हा महत्त्वाचा टप्पा आहे. यासाठी शाळा-कॉलेजांतील मुला मुलींसमोर हे बुवाबाजीचे ‘दैवी’ चमत्कार करून त्यातील खोटेपणा उघडकीस आणण्याचा कार्यक्रम श्याम मानव करत आहेत. विदर्भ, अमरावती, यवतमाळ, नागपूर यासारख्या गावांतून त्यांनी व्यक्तिशः दीडशेच्यावर कार्यक्रम केले आहेत. प्रत्यक्ष प्रयोग व त्यावरील भाषण यामुळं हा कार्यक्रम प्रभावी होतो.

बुवाबाजीच्या सर्व ट्रिक्स माहीत करून घेऊन त्याचेच या अंधश्रद्धानिर्मूलन कामात महत्त्वाचे शस्त्र उगारणाऱ्या श्याम मानव आणि त्यांच्या सहकाऱ्यांना अंधश्रद्धा-निर्मूलनाचे कार्यक्रम करण्यासाठी संधी मिळायला हवी. शाळा-कॉलेज-इतर समाजसेवी संस्थांनी ती संधी द्यायला हवी समितीसाठी अधिक कार्यकर्ते हवेत, ते अशा कार्यक्रमातूनच मिळतील.

—मेधा राजहंस

## आंबीटघर, तालुका वाडा, जि. ठाणे

# तापलेले तवे, सळया आणि कात्री

विष्णु – जयदेव

शनिवारी रात्री ऑफिस सोडण्याच्या तयारीत होतो. साडेआठ वाजून गेलेले. ठाण्याच्या स्ट्रिंगरचा फोन आला. एका ट्रेनी रिपोर्टरने फोनवरून बातमी घेतली आणि टाइप करून डेस्कवर दिली. बातमी विलक्षण होती.

वाडा तालुक्यातील आंबीटघर ह्या खेड्यात एका मांत्रिकाने आठ बायांना तापलेल्या सळईचे चटके दिले. त्यांपैकी एका आदिवासी बाईला तर तापलेल्या तव्यावर उभे केले ! हा सारा प्रकार गावकऱ्यांच्या साक्षीने गावाच्या शाळेत घडला. कोणी तरी तक्रार नोंदविली त्यावरून पोलिसांनी भगतासकट एकूण पंधरा लोकांना अटक केली. आता त्यांना जामिनावर सोडण्यात आले होते. गावकऱ्यांच्या मते ह्या आठही बाया चेटूक करणाऱ्या. ह्यांच्यामुळेच गावात रोगराई पसरलेली होती.

बातमी आम्ही पहिल्या पानावर छापली. न्यूज एडिटर म्हणाले, 'तू उद्या सकाळीच फोटोग्राफर घेऊन वाड्याला जा. सोमवारसाठी चांगली फॉलोअप स्टोरी होईल !'

मुंबईपासून आंबीटघर जवळजवळ दीडशे किलोमीटर दूर. सकाळपासूनच पावसाची रिप् रिप् सुरू झाली होती. सात वाजता आम्ही दादरला भेटलो. आंबीटघरला जायचे म्हणजे आधी ठाण्याला पोहोचायला हवे. ठाण्याहून भिवंडी, भिवंडीहून वाडा आणि वाड्यापासून गाव दहा कि. मी. आत !

ठाण्याला आम्ही आमच्या वार्ताहराला भेटलो. आंबीटघरला जायचा रस्ता त्यानेच सांगितला. ठाण्याहून भिवंडीला रिक्शानेच गेलो. भिवंडीला तेथील पालिका-कर्मचाऱ्यांचा संप चाललेला. पावसामुळे वाड्याची बस केव्हा लागेल ह्याचा नेम नाही. आम्ही परत रिक्शाने जायचे ठरविले. वाड्याला पोहोचेपर्यंत साडेबारा झालेले.

यशवंत थोरात गावातील एक प्रतिष्ठित गृहस्थ. कॉंग्रेसचे कार्यकर्ते. त्यांच्या घरी गेलो. घरी समजले की ते पी. डब्ल्यू. डी. क्वार्टर्सवर गेले. तिथेच थोरातांची भेट झाली. पन्नास–पंचावन्न वर्षांचा गृहस्थ. खादीचे कपडे. गेली दहा–बारा वर्षे ते कॉंग्रेसमध्ये आहेत. त्यापूर्वी समाजवादी पक्षात. त्यांना होती तेवढी जुजबी माहिती त्यांनी पुरवली. आम्हाला गावात जायचे होते. गावात दिवसातून म्हणे एकच बस जाते. रस्ताही खाचखळग्यांचा. थोरातांनी गाडीची व्यवस्था करण्याचे आश्वासन दिले.

ह्या पी. डब्ल्यू. डी. क्वार्टर्सवर आणखी दोघांची भेट झाली. हे दोघे युवक कॉंग्रेस (आय)चे कार्यकर्ते. मूळचे जयपूरचे. दोघांचेही नाव तिवारी. पार्टीने त्यांना दिल्लीहून येथे पाठविले. युवक कॉंग्रेस (आय)च्या ह्या नव्या कार्यक्रमाची मला माहिती नव्हती. (आणि बऱ्याच कॉंग्रेस कार्यकर्त्यांनाही त्यांची माहिती नाही. हा एकूण सगळा प्रकारच गौडबंगाल आहे. ) ह्यांची नेमणूक म्हणे राजीव गांधींनी केली !



सरस्वतीबाई पाटील

जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात युवक कॉंग्रेस (आय)ने दिल्लीला एक सेमिनार घेतले. त्यातून म्हणे कार्यकर्त्यांची निवड करून देशातील वेगवेगळ्या ठिकाणी पाठविण्यात आले. त्यांचे काम फक्त वीस कलमी कार्यक्रमाची अंमलबजावणी होते की नाही ते पहायचे. दर पंधरा दिवसांनी त्यांनी राजीव गांधीला रिपोर्ट लिहून पाठवायचा. त्यांच्या खाण्या-पिण्याचा सारा खर्च पार्टी करणार; पण ते पी. डब्ल्यू. डी. क्वार्टर्समध्ये का राहत होते हे काही केल्या समजले नाही. आम्ही पोहोचलो तेव्हा त्यांचा रिपोर्ट लिहून झाला असावा. कारण ते व्हरांड्यात खुर्च्या टाकून पाऊस पाहण्यात मग्न झाले होते. युवक कॉंग्रेस (आय)ने देशातील बऱ्याचश्या मागासलेल्या जिल्ह्यांत अशा लोकांची नेमणूक केलेली आहे असे ते म्हणाले. आंबीटघरबद्दल त्यांनी काहीच ऐकले नव्हते. त्या दिवशीचा पेपरही चाळलेला नव्हता. तुम्ही आमच्याबरोबर येता का ? असे विचारले. पण पाऊस पाहून त्यांचा उत्साह बारगळला.

अशा घटनांचा वीस कलमी कार्यक्रमाशी काही संबंध नाही का ? असे विचारल्यावर ते म्हणाले की, आमचा संबंध फक्त इन्स्पेक्शनशी आहे. अंमलात आणण्याचे काम आमचे नाही. असो. थोरात आल्यावर त्यांच्याबरोबर आम्ही वाड्याच्या पोलीसठाण्यावर गेलो.

अशा ठिकाणचे पोलीसइन्स्पेक्टर हे बहुधा सुलतानच असतात; पण माळवे मात्र त्याला अपवाद निघाले. त्यांच्याशी बराच वेळ चर्चा झाल्यानंतर माझ्या असं लक्षात आलं की, त्यांनी केस फार समंजसपणे हाताळली आहे. वाड्याला येऊन त्यांना जवळजवळ दहा वर्षे झाली होती. त्याच्या आधी ते नाशिकला होते. माळव्यांबरोबर झालेले बोलणे आणि पोलीसस्टेशनवरील मिळालेली माहिती अशी :–

### मांत्रिक गावात आला

ह्या साऱ्या घटनेची सुरुवात जूनच्या सुरुवातीला झाली. आंबीटघरची वस्ती सातशे ते आठशे. त्यातील बहुसंख्य कुणबी आणि उरलेले वारली आणि कातकरी.

कुणब्यांचा प्रमुख व्यवसाय शेतीचा आणि वारली व कातकरी मोलमजुरी करून जगणारे. दोन-चार लोक सोडले तर गावात सातवी-आठवी पलीकडे कोणी शिकलेलेच नाही. तितके तरी शिक्षण झालेले ह्याचे कारण गावातील सातवीपर्यंतची जिल्हा परिषदेची शाळा.

नारायण दाजी खाडे नावाच्या गावातील एका सधन शेतकऱ्याचा एक वर्षाचा मुलगा आजारी पडला. गावात सर्व उपाय करून झाले; पण गुण आला नाही. खाडे मुलाला घेऊन ठाण्याला गेले; पण इतके इलाज करूनही मूल काही बरे झाले नाही. खाड्यांनी म्हणे दीड-दोन हजार रुपये खर्च केला.

एक दिवशी एक विचित्र प्रकार घडला. मुलाला गोठ्यात जिथे आंघोळ घातली जायची तेथे कोणी तरी पहाटेच कणकेची बाहुली करून ठेवली. त्याच्या शेजारीच कणकेचा एक दिवा करून त्यात तेल घातलेले होते. कापडाच्या चिंधीची वात त्यात पेटती ठेवलेली. बाहुलीवरती थोडे तांदूळ टाकलेले. हे पाहताच खाड्यांची झोप उडाली. बातमी गावभर पसरली. कर्मधर्मसंयोगाने मुलगा दुसऱ्या दिवशी मरण पावला. लोकांची खात्री पटली गावात कोणी तरी चेटूक करीत आहे.

मग नामदेव पांडुरंगाची बहीण आजारी पडली. काही केल्या तिला गुण येईना. काही लोकांची ढोरे आजारी पडली. एक-दोघांच्या गायींच्या सडांतून रक्त यायला लागले. आता घडणारी प्रत्येक गोष्ट भुताटकीमुळे होते आहे असे वाटायला लागले.

लोकांची सभा घ्यायचे ठरले. गावचा पोलीसपाटील लडकू राम पाटील ह्याच्या घरी उपसरपंचासह गावातील सारे लोक जमले. गावात कोणी तरी भुताटकी करीत आहे ह्याबाबत दुमत नव्हते. मग त्याला उपाय काय ? ही माणसे शोधून काढल्याशिवाय गाव बरा होणे शक्य नव्हते. शेवटी मांत्रिकाला बोलवण्याचे ठरले.

ह्यांच्या अडाणीपणातही एक गंमत आहे. एकदा मांत्रिक बोलवल्यानंतर कोणी मागे व्हावयास नको म्हणून सर्वांची मान्यता घ्यावयाचे ठरले. पाच रुपयांचा स्टँपपेपर आणून त्यावर गावातील सर्व लोकांच्या सह्या घेण्यात आल्या. उगाच नंतर कोणी मागे व्हावयास नको. सर्वांच्या संमतीने श्रीपत लोडू पाटील, पांडुरंग भाऊ पाटील, विलास काळू पाटील, लोडू बेंडू पाटील, गणपत पाटील ह्यांना पंच म्हणून नेमण्यात आले.

शहापूर तालुक्यातील गोटीघर येथील महादेव पांडुरंग डिंगोरे ह्या मांत्रिकाला बोलवायचे ठरले. डिंगोरे हा बराच प्रसिद्ध मांत्रिक असावा. कारण त्याची ख्याती ह्या गावीही पोहोचली होती. त्याने ह्या कामासाठी रुपये बाराशेची मागणी केली. वर्गणी काढून पैसे जमा करण्यात आले. डिंगोरे शनिवारी सकाळी गावात आला. देवीच्या देवळात पूजा करण्यात आली. त्यानेही लोकांकडून वेगळे ॲफिडेव्हिट लिहून घेतले. गावातील लोकांकडून लेखी कबूल करून घेतले की, आपण काहीही केले तरी कोणी पोलिसांकडे तक्रार करणार नाही.

## तापलेला तवा, सळया आणि कात्री


दुसऱ्या दिवशी सकाळी रविवारी पंचांसमक्ष पूजा झाली. एका पितळी वाटीत मांत्रिकाने पाच लिंबे आणि तांदूळ ठेवले. वाटी दशरथ परशुराम पाटील आणि विष्णू गणपत म्हसकर ह्या दोघा गावकऱ्यांच्या हातात आळीपाळीने दिली.

वाटी घेऊन ते कोणाच्या तरी घरात शिरायचे आणि मग कोठल्या तरी माणसाच्या पायाला वाटी लावायची आणि म्हणायचे, 'बाई, तू भुताळी आहेस !' अशा रीतीने त्यांनी आठ बाया आणि एक पुरुष ह्यांना 'भुताळी' ठरविले. ह्यापैकी एक बाई आदिवासी आणि बाकी सर्व कुणबी. हा सर्व प्रकार दुपारी एक-दोनपर्यंत संपला.

मग शाळेमध्ये सभा घ्यावयाचे ठरविले. वाड्याहून जाताना गावाच्या सुरुवातीलाच शाळा लागते. इन मीन दोन खोल्या. जमीन शेणाने सारविलेली. ह्या दोन खोल्यांत सातवीपर्यंत वर्ग भरतात. एकूण शिक्षक पाच. त्यांपैकी एक शिक्षक लक्ष्मण राऊत. शाळेच्या जवळच झोपडी बांधून राहतात. ते आणि त्यांची पत्नी दोघेही शाळेत शिकवितात.

नंतर राऊतांना भेटलो. तेव्हा ते म्हणाले की, पंच घरी आले तेव्हा आम्ही घरी नव्हतो. पंचांनी त्यांच्या मुलाकडून जबरदस्तीने शाळेची किल्ली घेतली. पोलीसस्टेशनवरील भोईरच्या जबानीत मात्र मास्तरांनी स्वतः शाळा उघडून दिली असल्याचे म्हटले आहे. मास्तर मूळचे पालघरचे. गावातले नसल्यामुळे अजून गावकीत सामील करून घेतले नसावे.

शाळा अजून सुरू झाली नसल्यामुळे वर्ग रिकामेच होते. गावात काही ठिकाणी वीज आहे; पण शाळेत नाही. वर्गात टिळक, ज्योतिबा फुले, शिवाजीमहाराज ह्यांचे फोटो लावलेले. भिंतीवर राज्यांच्या राजधान्या, खंडांची नावे, मातीचे वेगवेगळे प्रकार, नद्यांची नावे अशी सगळी माहिती लावलेली. एका कोपऱ्यात टिळक आणि फुले ह्यांच्या फोटोंसमोर डिंगोरेने चूल पेटवली. तेल घालून तवा तापत ठेवला. एक



(डावीकडून) केशव नामदेव पाटील, लाडकू रामा पाटील, बुदाजी गोविंद पाटील

कात्री घेतली आणि काही लोखंडी सळया तापत ठेवल्या.

मग त्याने 'भुताळी' असलेल्या लोकांना शाळेत आणायला पचांना पाठविले हा चमत्कार पाहायला सारा गाव शाळेशी जमलेला. गावकीचे बोलावणे, त्याला नाही कसे म्हणणार? ह्या आठही बाया आणि पुरुष अनता कृष्णा भोईर शाळेशी आले.

मांत्रिकाने प्रथम पार्वतीबाई वाघ ह्या पन्नास वर्षांच्या आदिवासी बाईस आत बोलावले. दरवाजा लावून घेतला. तिला सागितले, 'बाई, तू भुताळी आहेस' तिने नकार दिला; पण पचांचा थोडाच त्यावर विश्वास बसणार? त्यावर डिंगोरेने तिला तापून लालभडक झालेल्या तव्यावर उभे राहावयास सागितले. पार्वतीबाई घाबरली. तिने त्याना विनवून सांगितले की, 'मी भुताळी' नाही. माझी दोन लहान मुलं आहेत. नवरा आहे. मी कामावर गेले नाही तर आम्ही खाणार काय?' तिचा नवरा जानूही तेथे आलेला. त्यानेसुद्धा अडवायचा प्रयत्न केला; पण त्याला कोण जुमानणार? पंचांनी तिला दोन्ही बाजूनी पकडून तव्यावर उभे केले. पाय भाजल्याबरोबर ती रडूओरडू लागली. डिंगोरेने तिला ठणकावून सागितले की, 'भुताळी असशील तर पायाला फोड येणार नाहीत; पण नसशील तर फोड येतील!' शेवटी वेदना असह्य होऊन ती बेशुद्ध पडली. पायाला फोडही आले. तिला खाद्यावर घेऊन जानू घरी आला.

नंतर अंजनीबाई भोईरला आत बोलाविले. भोळ्या, अडाणी बाया. गावकीसमोर त्याच्या घरातील पुरुषाना विरोध करता आला नाही. त्या काय करणार? त्याना गुपचूप सहन करावे लागले. अंजनीबाईच्या कपाळावर आणि जिभेवर लालभडक सळईने डाग दिले. तिला आता नीट बोलता येत नाही. तिचा नवरा अनंता भोईर ह्याला मात्र फक्त त्याच्या शेंडीचे केस कापून त्याला सोडून दिले.

जिजाबाई पाटीलच्या जिभेवर डाग दिला सरस्वतीबाई पाटील, शेवंतीबाई भोईर, अनसुयाबाई जाधव आणि भीमाबाई पाटील ह्या चौघीचे काही केस कापून त्याच्या जिभेवर डाग देण्यात आले. सकवार बापू पाटील ह्या बाईचे मात्र केसच कापण्यात आले.

## शेवटी प्रकरण पोलिसात

हा सारा प्रकार होईपर्यंत कोणी विरोध केला नाही; पण आता कोणी पोलीसकडे गेला तर? मग पंचानी असा निर्णय घेतला की, जो कोणी पोलीसठाण्यावर तक्रार नोंदवील त्याला वाळीत टाकण्यात येईल व त्याच्याकडून एकशेएक्कावन्न रुपये दंड वसूल केला जाईल!

दोन दिवस कोणालाच काही बोलण्याचा धीर झाला नाही. पायाचे तळवे भाजल्याने पार्वतीबाईला चालता येत नव्हते. अजूनही बसल्या-बसल्याच तिचे सर्व व्यवहार चालतात. ज्यांना 'भुताळी' म्हणून ठरविले त्याना गावात तोड दाखवायची लाज वाटू लागली. आपण 'भुताळी' म्हणून अंजनीबाईचे मन खायला लागले. पोलिसांनी वेळेवर ॲक्शन घेतली नसती तर ह्या बाईने आत्महत्याच केली असती!

आठ तारखेला बुधवारी मात्र चाकणजवळच्या गुराच्या बाजाराला जाण्यासाठी अनंता भोईर आणि जानू वाड्याला आले. धीर करून ते पोलीसठाण्यावर आले आणि सध्याकाळी साडेसातच्या सुमारास त्यानी तक्रार नोदविली.

पोलिसानीदेखील फार जलद ॲक्शन घेतली. दुसऱ्या दिवशी सकाळीच जाऊन त्यांनी डिंगोरेसकट एकूण पंधरा जणाना अटक केली माळवेंना मी म्हटलं की, आरोपीनासुद्धा मला भेटण्याची इच्छा आहे तेरा तारखेला त्याना जामिनावर सोडण्यात आले होते. सुदैवाने त्यातील पाच सहाजण पोलीसठाण्यावर आले होते. गावचे पोलीस पाटील लडकू पाटील आणि उपसरपंच दुदाजी गोविंद पाटील ह्यातले प्रमुख आरोपी. माळवे म्हणाले की, ते लोक आताच गावात परत चालले आहेत. 'त्याना तुम्ही चौकी बाहेर भेटा!' बहुसंख्य आरोपी २५ ते ३५ गटातले. एकट्या लडकू पाटीलचे वय पन्नासच्या जवळपास. दुदाजीचे वय पस्तीस वर्षांचे.

पाऊस जोरात पडायला लागला म्हणून त्यांना घेऊन मी जवळच्या शाळेच्या पायरीवर बसलो.

'दुदाजी, तुम्ही कसं काय केलंत हे?'

'साहेब, आम्ही आमच्यासाठी थोडंच केलं? भगत बोलवायला सगळ्या लोकानी सह्या दिल्या आणि आता ह्यांच्याच घरात 'भुताळी' निघाल्याने हे लोक उलटे फिरताहेत!'

'पण तुमचा विश्वास आहे 'भुताळीवर?'

'मग? खाडेचा मुलगा कसा मेला? सगळ्या गावकऱ्यानी त्याच्या गोठ्यात वाहुली पाहिली. पांडुरंगची बहीण शीक झाली. गाई दूध देईनात....'

'आता 'भुताळी' काढल्यावर त्या गाई दूध द्यायला लागल्या का?'

पाटील काहीच बोलले नाहीत. त्याचे एक पालुपद.

'साहेब, आम्ही गावाच्या भल्यासाठी केले. ह्या भाटकरची आई शेवतीसुद्धा 'भुताळी' निघाली; पण त्यानं कुठं तक्रार केली? हे लोक आता उलटले आहेत आमच्यावर! आम्ही शेफ (Safe) आहोत.'

लडकू पाटलानीही आवर्जून सागितले आपण कसे शेफ आहोत ते.

'साहेब, लिहा ते. मी तर एकदम शेफ आहे. कारण मी ह्यांना पहिल्यांदा सागितलं की काही गडबड होणार असेल तर 'आपण ह्याच्यामध्ये नाही!'

स्टँप पेपरवर सह्या घेण्याची कल्पना लडकू पाटलाची.

बोलता बोलता मला कळून चुकले. ही माणस अगदीच साधीभोळी आहेत. ह्याचा 'भुताळीवर' ठाम विश्वास आहे. डॉक्टरी उपायाने गाव सुधारत नाही! मग दुसरा इलाज काय?

प्रत्येक गोष्टीकडे पाहण्याचा दृष्टिकोण जर शास्त्रीय नसेल तर मग योगायोग आणि कार्यकारणभावही एकच वाटायला लागतात आणि ह्या शास्त्रीय दृष्टिकोनाची प्रत्येकाची पातळीही वेगवेगळी असते. दुदाजीचा भुताखेतावर ठाम विश्वास आहे आणि भुताळी काढण्यासाठी केल्या जाणाऱ्या अघोरी उपायावरही विश्वास आहे. इन्स्पेक्टर माळव्याचा 'तिसऱ्या शक्तीवर' विश्वास आहे; पण अघोरी उपायांवर नाही. माझ्या एका मित्राला हे सगळं खोटं वाटलं; पण ज्योतिषशास्त्र मात्र त्याला खरं वाटतं!

मला हे काहीच पटत नाही. तरी मांजर आडवं गेलं की, घशाला कोरड पडते.

एकूण काय तर आपल्या अनुभवावर आधारलेली अंधश्रद्धा तेवढी खरी; पण दुसऱ्याचा विश्वास मात्र अंधश्रद्धा! असच मी लिहीन.

### गावकीपुढं आवाज नाही.

तुम्ही बराच वाद केलात तर हे सारे त्यांचे शेवटचे शस्त्र काढतात. ' तुम्हाला अनुभव नाही त्याचा. आमच्या डोळ्यांपुढे घडलंय!'

शास्त्रीय दृष्टी मुळीच नसणं आणि ती अर्धवट असण हे सारखंच धोक्याच. तुमची निष्कर्ष काढण्याची पद्धतीच जर तर्कशुद्ध नसेल तर तुमचा अनुभव तुमच्यापुरताच मर्यादित राहतो. त्याला तुम्ही सार्वत्रिक स्वरूप देणार कसे ?

मी दुदाजी आणि लडकू पाटील ह्या दोघानाही वचन दिले की, ते ' शेफ '-आहेत असंच मी लिहीन.

कॉंग्रेस (आय)च्या एका खासदाराची जीप घेऊन आम्ही गावात गेलो. खाच-खळग्यानी भरलेला रस्ता. दिवसातून फक्त एकदाच गावात बस जाते. पाच सहाशे लोक-वस्तीचा गाव. प्रशस्त कौलारू घरं कारवीच्या भिंतीची. चार-पाच घरेच फक्त बिटाची. आम्ही शाळेपाशी थाबलो. राऊत फार समंजस गृहस्थ आहेत. त्यांनी स्वतःला ठाऊक होती तेवढी माहिती सांगितली. शाळा उघडून दाखविली.

तेथून पार्वतीबाईंच्या घरी गेलो. दारातच ती पाय पसरून बसलेली. पायाचे फोड बरे झाले आहेत; पण अजून चालता येत नाही. जानूने तिला अजून हॉस्पिटलमध्ये ठेवलं नाही. तिथं ठेवलं तर तिच्याजवळ बसणार कोण ? पावसाळा तोंडावर आलेला. शेतीची कामं कोण करणार ? बोलता बोलता तिच्या डोळ्यात पाणी आलं. ती परत परत सागत होती. 'मी ' भुताळी ' नसतानाही मला तापलेल्या तव्यावर उभं केलं हो!'

पार्वतीबाईनंतर अंजनीबाई, जिजाबाई, सरस्वतीबाई, शेवंताबाई, अनंता भोईर या साऱ्यांना भेटलो; पण साऱ्यांना हा नशिबाचाच भाग वाटत होता! त्यांना वेदना कळते; पण आपल्यावर मोठा अन्याय झाला आहे असं त्यांच्या मनात येत नाही. गावकीपुढं आपण काय करणार ' अशी भावना. गावात हळूहळू दोन तट पडू पाहत आहेत. भगत ' भुताळी ' काढून गेला; पण गावचे पाणीही गढूळ करून गेला. त्याच दिवशी आणखी काही गडबड होऊ नये म्हणून पोलिसानी आणखी सहा जणाना अटक केली.

सर्वात विशेष अनुभव म्हणजे शंकर पाटलांच्या घरचा. त्याच्या सावत्र आईच्या भीमाबाईच्यासुद्धा जिभेवर डाग दिला. केस कापले. पाटील ह्या भागातले सधन शेतकरी. ऐशी एकर जमीन ४८ साली त्यानी बी. ए. केलेले. एक मुलगा ठाण्याला वकील आणि दुसरा पुण्याला इंजिनियर. ओसरीवर ह्या तिघाचीही सर्टिफिकिटे फ्रेम करून लावलेली. दारावर सुवचने लिहिलेली —' संतुष्ट स्त्री हीच घराची लक्ष्मी '—धार्मिकता हाच घराचा कळस. ह्याच घरातल्या लक्ष्मीच्या जिभेवर डाग दिला तरी पाटलाची तक्रार नाही.

पाटील वाड्याचे माजी सभापती. स्वभावाने प्रेमळ, आतिथ्यशील. त्यानी आमचा पाहुणचार व्यवस्थित केला; पण झालेल्या प्रकाराबद्दल काहीच बोलले नाहीत.

शेवटी मीच त्यांना विचारले—' मला आईंना भेटायचे आहे. ' पाटील गडबडले. ' नाही, नाही, तिला काहीच झालं नाही. ती ठीक आहे. तुम्ही समोरच्या सरस्वतीबाईंना भेटा. त्यांच्या कपाळावर आणि जिभेवरही डाग दिले आहेत. '

भीमाबाईंनाही समोर यायची लाज वाटत असावी. शेवटी त्याना न भेटताच आम्ही पाटलाकडून निघालो. *शिक्षणाचा अंधश्रद्धेशी* काही संबंध असतो का ?

दिवसभर पावसाने पाठ सोडली नव्हती. संध्याकाळचे सहा वाजत आले.आमचे कामही आता संपत आले होते. साडेनऊपर्यंत परत मुंबईला पोहोचलो तरी बारापर्यंत बातमी आत जाईल. गचके खात जीप वाड्याकडे निघाली.

पाऊस थांबला तरी आकाश ढगांनी भरलेलं. संध्याकाळचा विचित्र प्रकार, पाण्याने भिजलेली झाडं, रस्त्यावर आणि आजुबाजूला पसरलेला चिखल. ह्यामुळे गाव अधिकच भकास आणि भयाण वाटू लागला.

गावच्या वेशीपाशी रस्त्यापासून दूर एका मोठ्या वडाच्या झाडाखाली एक छोटंसं देऊळ आहे. कदाचित ह्याच देवळात भगताने पूजा केली असेल. त्या प्रकाशात ते देऊळ मला अधिकाधिकच गूढ वाटू लागले. वाटलं, हे देऊळ आहे तोवर ह्या लोकाचा अडाणीपणा जाणार नाही.

दिवसाभराच्या धावपळीने अंग दुखून आले. चहाशिवाय फारसे खाणे पिणेही झाले नव्हते. जीपमध्ये बसल्या-बसल्या माझे डोळे मिटायला लागले आणि बातमी मनात आकार घेऊ लागली.

Ignorance is never a bliss. It always takes its toll. The tragedy at Ambitghar is a case in point...

☐

---

ह्या ना त्या निमित्ताने...

# सरदारजी प्रश्न : सरदारजी उत्तर

फिरोझ रानडे

" काही नाही, ह्या सरदारांना ते मागताहेत तसे स्वतंत्र राज्य-खलिस्तान देऊन टाकायला हवे व हा प्रश्न कायमचा सोडवायला हवा! "श्यामने एवढे म्हटले मात्र त्याचा एकमेव श्रोता चवताळून उठला.

' काय पण शहाणपणाचा सल्ला! " *कथ्यींना आपला राग आवरणे अगदी अशक्य* झाले. तरी पण श्यामच्या वयाकडे पाहून त्यानी आवरते घेतले. नाही तर त्यानी श्यामला घरबुडवे, देशद्रोही वगैरे म्हटले असते. ' ह्या तुमच्या स्वतंत्र राज्य देण्यामुळे प्रश्न सुटेल कसा ? उलट तो वाढतच जाईल. उद्या आसामी स्वतंत्र राज्य मागतील, परवा मद्रासी, तेरवा केरली वा बगाली!'

स्वतंत्र राज्य मागण्याबाबत होणाऱ्या चर्चेत ही बघण्यासारखी गोष्ट असते. बोलणारा बाकी प्रान्ताचे लोक स्वतंत्र राज्य मागतील म्हणजे काही अर्थी त्यांच्यात एकराष्ट्रीयत्वाची भावना कमी आहे असे अगदी बिनदिक्कत म्हणतो. आता जर उद्या

आसामी लोक, परवा मद्रासी वा बंगाली स्वतंत्र राज्याची मागणी करतील तर तेरवा मराठी लोक पण नाही का स्वतंत्र राज्य मागणार? पण वर म्हटल्याप्रमाणे कर्वे मराठी असल्यामुळे मराठी लोक कधी स्वतंत्र राज्य मागतील असे त्याना वाटणे शक्यच नव्हते.

श्यामचा एक उत्तर-प्रदेशचा मित्र नेहमी म्हणावयाचा. उत्तर-प्रदेशाला इतिहासकालापासून 'हिंदुस्थान' म्हणतात ते योग्यच आहे. कारण बंगालचे, महाराष्ट्राचे, मद्रासचे, पंजाब-काश्मिरचे लोक त्यांचा काही प्रश्न उभा राहिला की स्वतंत्र राज्याची मागणी करतात; पण आम्हा उत्तर-प्रदेशाच्या लोकाचे तसे नाही.

त्या वेळी संयुक्त-महाराष्ट्राचा लढा चालू होता व त्या उत्तर-प्रदेशीयाचे बोलणे त्या लढ्याला उद्देशूनच होते.

लढा फार पेटला होता. मुंबईतच काही शंभर-सव्वाशे माणसे नाहक मारली गेली होती. स. का. पाटलानी तर पाच वर्षांनंतरच काय पण पाच हजार वर्षांनीही मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही असे मुंबईच्याच चौपाटीवर जाहीर केले होते.

त्यामुळे मराठी लोक मोठे चिडून उठले होते व जर भारतीय संघराज्यात आपल्याला न्याय मिळणार नसेल तर ह्या संघराज्यात रहाण्यात तरी काय अर्थ आहे? आपण वेगळे राज्य का मागू नये? असे विचार काही जणांच्या मनात येऊन जात होते.

श्यामचा तो उप्र मित्र ह्या अर्थाने उत्तर-प्रदेशच 'खरा' हिंदुस्थान आहे असे म्हणाला होता.

श्याम त्या वेळी त्या उत्तर प्रदेशीय मित्रावर खूप चिडला होता; पण आता कर्व्यांनी त्याला 'काय पण शहाणपणाचा सल्ला' असे खडूसपणे म्हटले होते तरी श्याम शांत होता. इतके वर्षांच्या संसारानंतर व तितकेच वर्षांच्या सरकारी नोकरीनंतर त्याचे राग येण्याचे यंत्र अगदी निकामी झाले होते. तो शांतपणे कर्व्यांना म्हणाला,

'आपणही स्वतंत्र राज्याची मागणी करण्याच्या विचारात होतोच की, संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचे वेळी!'

'ते योग्यच होतं.' समजा भारताची भाषावार पुनर्रचना करावयाची पण तो अधिकार फक्त मराठी लोकाना द्यावयाचा नाही, हा आमच्यावर घोर अन्याय नव्हता का? मग वेगळं होतो म्हटलं तर काय चुकलं?

'तुमचं म्हणजे आपलं त्या वेळी काहीच चुकलं नाही असे असेल तर आता सरदारजींना आपल्यावर अन्याय होतो आहे असे वाटल व त्यांनी वेगळं राज्य मागितलं तर त्यात त्याचं काय चुकलं?'

आता कर्व्यांना काय बोलावे ते कळेना. सरदारजीचे काही तरी चुकते आहे हे त्यांना कळत होते; पण काय चुकले आहे ते वळत नव्हते.

'पण मग काय त्याना पंजाब देऊन टाकावयचा? निदान शिखानी तरी अशी मागणी करायला नको होती. मुसलमानाचे आपण समजू शकतो; पण शिखाचा समाज आपल्याशी एकजीव झाला आहे. ते आपल्याला अगदी भावासारखे आहेत.'

'हे बघा, हा प्रश्न असा भावनेच्या पातळीवर नेऊ नका. अगदी सख्ख्या भावाभावात भांडणे होतात. एक भाऊ घर सोडून स्वतंत्र बिऱ्हाड करीन म्हणतो. येथे तर शीख फक्त आपल्या भावासारखे.

'बरे, मग तुमचे काय म्हणणे? त्यांना खलिस्थान देऊन टाकावे? आणि उद्या?

'अगदी तावडतोब देऊन टाकण्याचे मान्य करावे असे म्हणतो आहे मी व त्यामुळे उद्याचे प्रश्नही सुटतील.

'आता तुम्ही शब्दांच्या खेळाची भाषा सुरू केलीत. देऊन टाकावे असे नाही; पण तावडतोब देऊन टाकण्याचे मान्य करावे. म्हणजे प्रथम काय करावे?' कर्वे छद्मीपणाने हसून विचारते झाले.

प्रथम म्हणजे हिंदूनी आपण ह्या देशातले बहुसंख्य आहोत, म्हणजे मोठ्या भावासारखे आहोत हे मनाशी पक्के केले पाहिजे व मुसलमान, शिख, ख्रिश्चन हे अल्पसंख्य आपल्या धाकट्या भावासारखे आहेत ही आपली भावना असली पाहिजे

'सध्या हिंदू आपणही एका अल्पसंख्य जमातीचे लोक आहात असे समजतात व वागतात. तसे वागावयाचे नाही. मोठ्या भावासारखे, मोठ्या जबाबदारीने वागावयाचे.'

'म्हणजे कसे?'

'म्हणजे धाकटा भाऊ आपल्याला घरात सुख मिळत नाही, आपल्या बायका-मुलाना नीट वागवत नाहीत म्हणून वेगळे रहातो म्हणाला तर त्याचा तो अधिकार तावडतोब मान्य करावयाचा.

'व त्याचबरोबर असे वेगळे रहाण्यातले नुकसान, तोटे त्याच्या ध्यानी आणून द्यावयाचे. म्हणजे बुवा जागेकरता फार पैसे पडतील, कोणी आजारी पडले तर त्याच्याकडे बघणे गैरसोयीचे होईल वगैरे...

'पण ह्या सरदारजीचे काम करावयाचे? ते तर लाखा-लाखाच्या सेना तयार करताहेत. कर्व्यांना हे धाकट्या भावाचे उदाहरण येथे कसे लागू पडते ते कळेना.

'अगदी धाकट्या भावाबद्दल करतो तेच. त्याना म्हणावयाचे तुम्ही हिंदुस्थानात खूप नाही ना? मग व्हा स्वतंत्र. होऊन जाऊ द्या तुमचे खलिस्तान; पण मग...'

'मग काय?'

'काय तुमचे राज्य, खलिस्तानात—पाकिस्तान व हिंदुस्थान मधले BUFFER-STATE होईल. जगातल्या सगळ्या बफर स्टेटचे काय झाले बघा. पोलंड, अफगाणिस्तान ह्यांची उदाहरणे अगदी ताजी आहेत. उद्या पाकिस्तानने तुमच्यावर हमला केला तर आम्ही तुमच्या बचावाला येणार नाही हे स्पष्ट करावयाचे.

'सगळ्यात मुख्य म्हणजे पाकिस्तानच्या वेळी जी चूक केली ती आता करावयाची नाही.

'भारत—माता आणि आपण सगळे तिची लेकरे वगैरे भोंगळ भावना येऊ द्यावयाच्या नाहीत

'असे नियम करावयाचे की एकदा खलिस्तान झाले की, कोणाही शिखाला हिंदुस्थानात प्रॉपर्टी करता यावयाची नाही. त्याना उद्योग—धद्यात नोकरी करता येईल; पण त्याच्या मालकीचा धदा होणार नाही त्याना सैन्यात व मुलकी कारभारात अधिकाऱ्यांच्या जागा मिळणार नाहीत—त्याना मताचा अधिकार रहाणार नाही. ते निवडणुकीला उभे राहू शकणार नाहीत.'

'पण त्यामुळे इतर चागल्या सरदारजीवर अन्याय होणार नाही का?'

'त्याला काही इलाज नाही. हे खरे की, काही शीख ह्या देशाचे सुपुत्र आहेत, त्याचे देशप्रेम आमच्याइतकेच आहे त्यांनी स्वातंत्र्याकरता फार मोठा त्याग केला आहे!

'पण जर स्वतंत्र—राज्य हवे असेल तर त्यातले तोटे पण त्याना कळायला हवे आहेत व ते सुद्धा आधी—आत्ता हिंदुस्थानात विखुरलेल्या लाखो शिखाना खलिस्तानमुळे आपले काय नुकसान होणार आहे हे कळले तर तेच शीख आपल्या पुढाऱ्यावर दडपण आणतील व खलिस्तानला जालिम विरोध करतील.'

'आता काय होते की त्याचे आपले राज्य बनते; पण हिंदुस्थानची जबाबदारी कमी होत नाही. उलट वाढतेच.'

कर्व्यांना श्यामचे म्हणणे पटलेसे वाटले. ते म्हणाले, 'हे आपण ४७ साली करायला हवे होते नाही?' □

## जम्मू-काश्मिर निवडणुका

# इंदिरा काँग्रेस हिंदूंचा पक्ष बनत चाललाय

अभय गोखले

जम्मू-काश्मिरमधील आजवरच्या अटीतटीने लढविल्या गेलेल्या विधानसभेच्या निवडणुकीत फरुख अब्दुलाचा नॅशनल कॉन्फरन्स पक्ष चागल्या बहुमताने निवडून आला आहे निवडणुकापूर्वी बराच हिंसाचार झाला. दोन्ही बाजूचे ( इदिरा कांग्रेस व नॅशनल कॉन्फरन्स ) एकमेकावर आरोप-प्रत्यारोप झाले, जातीयवादी भाषणे झाली. फरुख अब्दुल्ला व इदिरा गांधीनी आपली स्वतःची प्रतिष्ठा पणास लावून दिवसरात्र प्रचाराचा धुमधडाका लावून मतदाराना आपल्या जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न केला. अपेक्षेप्रमाणे फरुक अब्दुल्लाच्या पक्षाला काश्मिर भागात जवळजवळ सर्व जागा मिळाल्या आहेत. निवडणुकीपूर्वी नॅशनल कॉन्फरन्स व इदिरा कांग्रेस यांच्यात समझोता करून निवडणुका लढवण्याचा प्रयत्न झाला; पण जम्मू-काश्मिर इंदिरा कांग्रेसचे अध्यक्ष मुफ्ती मोहंमद सईद याच्या आग्रही भूमिकेने इदिरा कांग्रेसने स्वतंत्र निवडणुका लढवण्याचा निर्णय घेतला. शेख अब्दुल्लाच्या मुलाने इंदिरा कांग्रेसला देऊ केलेल्या जागा फारच थोडया होत्या व केंद्रात राज्य करणाऱ्या पक्षाची प्रतिष्ठा वाढवणाऱ्याही नव्हत्या. माजी मुख्यमंत्री सैद मीर कासीम यानी नॅशनल कॉन्फरन्स व इदिरा कांग्रेस याचा समझोता करण्याचा प्रयत्न केला; पण त्यात त्याना यश आले नाही.

शेख अब्दुल्लांप्रमाणे त्याचा मुलगा फरुक हा मते खेचू शकणार नाही हा इदिरा कांग्रेसधुरीणाचा अदाज साफ चुकला. काश्मिर भागात बहुसंख्य मुसलमान असलेल्या मतदारसघामध्ये नॅशनल कॉन्फरन्सने इंदिरा कांग्रेसला धूळ चारली. काश्मिरी मुसलमानाना इंदिरा कांग्रेसची तथाकथित सेक्युलर इमेज खरी वाटली नसावी. काश्मिर खोऱ्यातील एकूण ४२ जागांपैकी नॅशनल कॉन्फरन्सने ३९ जागा जिकून इदिरा कांग्रेसची निधर्मी प्रतिमा फेकून दिली आहे. पाकिस्तानमध्ये फाळणीच्या वेळेस भारतातून गेलेल्या काही लोकाना त्याची इच्छा असल्यास जम्मू-काश्मिरमध्ये पुन्हा परत येता येईल हा फरुक अब्दुल्लाचा निर्णय मुसलमानाची मते मोठ्या प्रमाणावर आपल्या पक्षाकडे खेचण्यास मदत करणारा ठरत असेल. मात्र काश्मिरमध्ये ४२ जागापैकी फक्त दोन जागा मिळवणारा इंदिरा कांग्रेस पक्ष हा आता हिंदूचा पक्ष बनला आहे. काश्मिर भागात ४२ जागांपैकी ३९ जागा जिंकणाऱ्या नॅशनल कॉन्फरन्सचा जम्मूमध्ये आपल्या प्रमुख प्रतिस्पर्ध्यांइतका दारुण पराभव झालेला नाही. जम्मूतील ३२ जागांपैकी ८ जागा फरुक यांच्या पक्षास मिळाल्या आहेत. जम्मूतील लोकांनी आपल्याला साथ न दिल्यास काश्मिरपासून तो प्रदेश तोडून टाकू असे हृताशपणे विधान करणाऱ्या फरुक अब्दुल्ला याना जम्मूतील त्याच्या कामगिरीमुळे थोडासा दिलासा मिळाला असेल

भारतीय जनता पक्षाला जम्मूतून नामशेष केल्याबद्दल इदिरा कांग्रेसने जरूर जल्लोष करावा; पण जम्मूतील ३२ पैकी २३ जागा जिकून त्याने आपण फक्त हिंदूचेच प्रतिनिधित्व करत असल्याचे सिद्ध केले आहे. याचे कोणते परिणाम इदिरा कांग्रेसला उत्तरेत भोगावे लागतील ते नंतर दिसेलच. प्रथम दिल्लीत, नतर मध्यप्रदेशात व आता जम्मूमध्ये हिंदूची मते आपल्याकडे खेचून इदिरा कांग्रेसने त्या भागात भाजपला शह दिला; पण त्या प्रयत्नात मुसलमानापासून ते दुरावले व आपली सेक्युलर प्रतिमा त्यांनी धुळीस मिळवली दिल्लीत, कर्नाटकात व आता काश्मिरमध्ये बहुसख्य मुसलमानानी इंदिरा कांग्रेसकडे पाठ फिरवली याची नोद आता पक्षश्रेष्ठीनी घेतली असेलच. भारतीय जनता पक्षाच्या जम्मूतील दारुण पराभवाची कारणेही तपासून पहावयास हवीत. विसर्जित विधानसभेत या पक्षाचे अकरा सभासद होते व आता एकही नाही. फरुक अब्दुल्लाच्या मुस्लिमधार्जिण्या धोरणाला जम्मूचे लोक वैतागले आहेत. त्यातच फाळणीच्या वेळेस पाकिस्तानातून आलेल्या हिंदू निर्वासितांना जम्मू-काश्मिर विधानसभेकरिता मतदान करण्याचा अधिकार अजूनही मिळालेला नाही; पण फाळणीच्या वेळेस भारतातून पाकिस्तानात गेलेल्या काहीना (मुस्लिमानीच) जर जम्मू-काश्मिरात परत यावयाचे असल्यास ते येऊ शकतात, असा चीड आणणारा निर्णय फरुक अब्दुल्लाने घेतल्याने जम्मूनील हिंदूनी ठरवले की, फरुक अब्दुल्लाला हरवायचेच आणि त्याला हरवू शकेल असा एकच पक्ष आहे तो म्हणजे इदिरा कांग्रेस पक्ष. मग त्यानी भाजप, जनता या पक्षाचा विचार न करता आपली मते इदिरा कांग्रेसच्या झोळीत टाकण्याचा निर्णय घेतला. कारण त्यावरच त्याचे भवितव्य अवलंबून होते. भाजप हा जम्मूत प्रभावी होता; पण इदिरा कांग्रेसप्रमाणे काश्मिरमध्ये त्याला स्थान नाही. शिवाय भाजपमध्ये फरुक अब्दुल्लांशी समझोता करावा व करू नये असे दोन प्रवाह आहेत रिशिकुमार कौशल हे नॅशनल कॉन्फरन्सवादी आहेत तर चमनलाल गुप्ता हे त्याविरुद्ध आहेत. फरुक अब्दुल्लाच्या वर सागितलेल्या वादग्रस्त विधेयकाच्या बाबतीतही भाजपमध्ये दोन तट पडले. वाजपेयी वगैरेंनी काश्मिरला खास राज्याचा दर्जा देणारे ३७० वे कलम रद्द करावे वगैरे हिंदूना दिलासा देणारी भाषणे केली; पण जम्मू महानगरपालिकेत नॅशनल कॉन्फरन्सबरोबर सहकार्य करुन सत्ता उपभोगणाऱ्या भाजपबद्दल हिंदू मतदाराना विश्वास वाटला नसावा.

त्यात पुन्हा वादग्रस्त पुनर्वसन विधेयकाच्या बाबतीत काही भाजप नेत्यांनी नॅशनल कॉन्फरन्सच्या बाजूने मतप्रदर्शन केल्याने हिंदू मतदारांना इंदिरा कांग्रेसकडे जाण्याशिवाय पर्याय राहिला नाही' इंदिरा गांधीनी पुनर्वसन विधेयकाच्या बाबतीत संदिग्ध धोरण स्वीकारले आसाममध्ये ज्याप्रमाणे बंगाली लोकानी आपले अस्तित्व टिकविण्यासाठी इंदिरा कांग्रेसला बहुमताने निवडून आणले व कम्युनिस्टांना धूळ चारली, तोच प्रकार भाजपच्या बाबतीत हिंदू मतदारानी जम्मूमध्ये केला.

## भाजपला हात दाखवला !

मतदानाच्या एकंदर आकडेवारीवरून जम्मूत इंदिरा कांग्रेसने बरीच प्रगती केलेली दिसते. गेल्या विधानसभेत त्यांच्या बारा जागा होत्या त्या सव्वीस झाल्या आहेत. त्यातल्या २३ जागा जम्मूतल्या, २ जागा काश्मिरमधल्या व एक जागा लडाखमधली आहे. मात्र आठ जागा जम्मूत जिकणाऱ्या नॅशनल कॉन्फरन्सने मतदानाच्या टक्केवारीत प्रगती केली आहे. अर्थात इंदिरा कांग्रेस व नॅशनल कॉन्फरन्सचे जम्मूतील यश हे भाजप व जनता पक्षाच्या मेहेरबानीमुळेच आहे. भाजपचे रिशिकुमार कौशल, चमनलाल गुप्ता, ठाकुर बलदेवसिंग हे बडे नेते जम्मूत भुईसपाट झाले ! इतका मोठा पराभव भाजपने (जनसंघ) ह्यापूर्वी कधीच अनुभवला नव्हता. चार जागा सोडता उरलेल्या जम्मूतील अठ्ठावीस जागात कित्येक ठिकाणी भाजपला तिसरा क्रमाकही मिळविता आला नाही. जनता पक्षाचे तर जम्मूत नामोनिशाण उरले नाही. दिल्लीत पराभूत झालेला भाजप पराभवाच्या खाईत अधिकाधिक ओढला जातोय ही काही चागली चिन्हे नव्हेत. दिल्लीच्या दारुण पराभवानंतर भाजप मध्यप्रदेशात नगरपालिकाच्या व विधानसभाच्या दोन पोटनिवडणुकात हरला. पोरबंदरमध्ये त्याची कामगिरी आशादायक नव्हती आणि जम्मूतील भाजपचा पराभव कबरडे मोडणारा आहे भाजपच्या पराभवाचे समर्थन करणारा त्याच्या चिटणिसाचा खुलासा हास्यास्पद आहे. भाजप व इंदिरा कांग्रेस याच्यामध्ये जम्मूभागात हिंदू मते विभागून सुद्धा त्याचा फायदा नॅशनल कॉन्फरन्सला उठवता आला नाही याचे कारण असे विभाजन होऊ न देण्याचा पक्का निर्णय जम्मूच्या हिंदूनी घेतला होता. भाजप व नॅशनल कॉन्फरन्स याच्यात गुप्त समझोता झाला आहे असा खोटा प्रचार जम्मूतील हिंदुच्या गळी उतरवण्यास इंदिरा गांधी व त्याचे स्थानिक नेते यशस्वी झाले. अर्थात नॅशनल कॉन्फरन्सला जम्मूत ज्या आठ जागा मिळाल्या त्यातील चार जागा या हिंदूचे मतविभाजन भाजप, इंदिरा कांग्रेस, जनता व भीमसिंग याची पॅथर पार्टी यांच्यात झाल्याने मिळाल्या. ज्या ठिकाणी भाजप, जनता, पॅथरपार्टी जास्त मते खेचू शकले, त्या ठिकाणी इंदिरा कांग्रेसचे उमेदवार पराभूत ठरले. जम्मूच्या काही भागात तेथील अल्पसख्य मुसलमानाची जवळजवळ शभर टक्के मते नॅशनल कॉन्फरन्सला मिळाल्याने तेथे ते उमेदवार विजयी झाले पॅथर पक्षाचे भीमसिंग यानी आपली जागा काठावर राखली. जे काम भाजपचे अध्यक्ष ठाकूर बलदेवसिंग याना जमले नाही तो पराक्रम भीमसिंगांनी करून दाखवला. जमाते इस्लामीला जसा काश्मिरात मतदारांनी हात दाखवला तसा जम्मूत मतदारांनी भाजपला दाखवला.

## ऐक्याचा घोळ तसाच !

भरपूर बोलबाला झालेल्या 'पिपल्स कॉन्फरन्स'ला काश्मिरात मोठा पराभव पत्करावा लागला. त्याचे अध्यक्ष लोने हे अगदी थोड्या मतानी निवडून आले. काश्मिरमध्येही मुसलमान मतदारानी मुस्लिम मताचे विभाजन होऊन त्याचा फायदा इंदिरा कांग्रेसला मिळू नये म्हणून पिपल्स कॉन्फरन्स, जमाते इस्लामी आदी कट्टर जातीयवादी पक्षाना दूर सारले. स्वतंत्रपणे निवडणुका लढवून फरुक अब्दुल्लाना हरवण्याची शेखी मिरवणारे इंदिरा कांग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मुफ्ती मोहमद सैद हे दोन मतदारसंघातून एकाच वेळी उभे राहिले व दोन्ही ठिकाणाहून पराभूत होऊन स्वत.वर व पक्षावर त्यानी नामुष्की ओढवून घेतली. इंदिरा कांग्रेसच्या प्रचारामुळे हबकून गेल्याने फरुक अब्दुल्लानी अवामी ॲक्शन कमिटी या जातीयवादी संस्थेचे मौलवी फरुक याना हाताशी धरले व या पाकिस्तानवादी नेत्याचा मुस्लिमावरील प्रभाव लक्षात घेऊन मुस्लिमाची मते मोठ्या प्रमाणावर खेचण्याच्या नादात फरुक हे त्याच्या (मौलवी फरुकच्या) आहारी गेले व आता त्याला आवरणे त्याना जड जाणार आहे. मौलवी फरुकमुळे काश्मिरात नॅशनल कॉन्फरन्सला कितपत फायदा झाला देव जाणे; पण जम्मूत मात्र नॅशनल कॉन्फरन्सला बरीच मते गमवावी लागली. जम्मू–काश्मिरच्या निवडणुकीत मतदानाच्या बाबतीत बरेच गैरप्रकार झाल्याचा आरोप इंदिरा कांग्रेसतर्फे केला जातो. त्यात काही तथ्यही असेल; पण काश्मिरमध्ये ज्या फरकाने (मोठ्या मताधिक्याने) इंदिरा कांग्रेसचे उमेदवार हरले त्याचा विचार करता गैरप्रकाराचा फारसा मोठा परिणाम अंतिम निकालांवर झाला असे म्हणता येणार नाही आणि जम्मूत इंदिरा कांग्रेसने नेत्रदीपक यश प्राप्त केल्यावर निवडणुकातील गैरप्रकाराचा अर्थ कसा लावायचा ? आणि अशी ओरड करण्याचा इंदिरा कांग्रेसला नैतिक अधिकार कसा काय पोचतो ? आसाममध्ये इंदिरा कांग्रेसने काय केले ? आसामी जनतेवर निवडणुका लादल्या, फिरती मतदानकेंद्रे घरोघर फिरवली, पोलीसबंदोबस्तात निवडणूक–प्रचार–सभा घेतल्या, जातीयवादी प्रचार केला, काही ठिकाणी अत्यल्प मतदान होऊनही निवडणुका घेण्याचा हट्ट कायम ठेवला व आसामात हिंसाचाराचे थैमान माजवले. हाच इंदिरा कांग्रेस पक्ष आता फरुक अब्दुल्लावर जातीयवादी भाषणे करण्याचा, हिंसाचार माजवण्याचा आरोप करत आहे हा मोठा विनोदच म्हणावयास हवा ! काश्मिरप्रमाणे जम्मूमध्ये भरपूर पाठिंबा न मिळण्याची खत फरुक अब्दुल्लाला वाटत असणारच, परंतु त्यामुळे जम्मूवर सूड न उगवता जम्मूला योग्य प्रतिनिधित्व देऊन आपल्याला सापत्नभावाने वागणूक मिळते ही जम्मूभागातील लोकाची भावना नाहीशी करण्यातच डॉ. फरुक अब्दुल्लाचे हित आहे त्याचप्रमाणे आता जम्मू-काश्मिरच्या निवडणुका सपल्या आहेत. या निवडणूकप्रचारसभात दोन्ही बाजूनी आरोप–प्रत्यारोपाची जो राळ उडवण्यात आली तिची उजळणी न करता त्यावर पडदा टाकून केंद्र व जम्मू-काश्मिर यांनी सामजस्याने वागणे दोघाच्याही हिताचे आहे. हे हित फरुक अब्दुल्ला व श्रीमती इंदिरा गांधी यांना बरोबर समजते. त्यामुळे हे संबध पुन्हा सुधारतील अशी आशा करावयास हरकत नाही. पुनर्वसन–विधेयकाच्या बाबतीत डॉ. फरुक यांनी ताणून

धरण्याचे कारण नाही. त्याचप्रमाणे या बाबतीतील संदिग्ध भूमिका इंदिरा गांधींनी सोडून द्यावयास हवी व या विधेयकास कडवा विरोध करावयास हवा. याकरिता तर जम्मूतील हिंदू मतदारांनी इंदिरा काँग्रेस पक्षाला निवडून दिले आहे. फरुक अब्दुल्लांनीही बहुगुणांच्या नादी लागून विरोधी पक्षऐक्यप्रयत्नांच्या पाठीमागे जास्त न लागता राज्याची घडी नीट बसवण्याच्या पाठीमागे लागावे. कारण विरोधी पक्षऐक्याचा घोळ असाच चालू रहाणार असून त्यातून काही निष्पन्न होणार नाही.

## दुसरा पर्याय नाही !

जम्मूमध्ये नेत्रदीपक यश मिळवून हिंदूंचा पक्ष अशी नवीन प्रतिमा मिळवलेला इंदिरा काँग्रेस पक्ष इतर ठिकाणी आपली भूमिका काय ठेवणार आहे ? भारतीय जनता पक्षाला संपवण्याच्या नादात मुस्लिम मते गमवावी लागत आहेत याचा गंभीरपणे विचार इंदिरा गांधींनी केला असेलच. जम्मू-काश्मिरच्या निवडणुकीत मुस्लिम मतदार इंदिरा कांग्रेसकडे संपूर्णपणे पाठ फिरवत असताना हिंदू मतदारांनी इंदिरा काँग्रेसला हात दिला; पण देशाच्या उत्तरभागात जेथे मुस्लिम मतदार भरपूर आहेत व त्यांच्या जोरावरच इंदिरा काँग्रेस पक्ष राज्य करत आहे, त्या मुस्लिमांची प्रतिक्रिया जम्मू-काश्मिर निवडणुकीच्या संदर्भात काय असेल ? मागे दिल्लीत मुस्लिमात लोकप्रिय नसलेल्या तथाकथित प्रतिगामी भाजपने तेथील निवडणुकीत चार मुस्लिम उमेदवार निवडून आणले होते तर इंदिरा काँग्रेस पक्ष एकही मुस्लिम उमेदवार निवडून आणू शकला नव्हता. काश्मिरमधील मुसलमान उर्वरित भारतीय मुसलमानांप्रमाणे इंदिरा काँग्रेस पक्षाला सेक्युलर मानत नाही हा याचा अर्थ की, संपूर्ण मुसलमान समाजच हळूहळू इंदिरा पक्षापासून दूर जाऊ लागलाय ? पंजाबमध्ये काय चाललेय ? तेथेही निवडणुका घेण्याचा प्रसंग आला तर भारतीय जनता पक्षाच्या मेहेरबानीने हिंदूंची मते मोठ्या प्रमाणावर खेचण्याचा प्रयोग इंदिरा काँग्रेस करेल. कारण अकाली आंदोलनात इंदिरा काँग्रेस पक्ष बदनाम झाला असून त्यांना आता सत्ता टिकवण्यासाठी हिंदूंकडे जाण्याशिवाय पर्यायच उरलेला नाही ! अशा परिस्थितीत शीख इंदिरा काँग्रेसवर नाराज असल्याने त्यांना आता हिंदूंना चुचकारण्याशिवाय पर्यायच नाही. त्यामुळे तर पंजाबमधील शिखांच्या मागण्या मान्य करण्याबद्दल सत्ताधारी पक्ष चालढकल करत आहे, त्याचे कारण तेथील हिंदूंना न दुखावणे हेच आहे. हिंदूंना आपल्याकडे मोठ्या प्रमाणात वळवायचे व त्यांच्यातील भाजपचा जोर कमी करायचा हा एका दगडात दोन पक्षी मारण्याचा कार्यक्रम आहे. त्यामुळे मुस्लिमांवर काय परिणाम होईल ते लवकरच दिसेल; पण अखिल भारतीय पक्ष म्हणून मिरवणाऱ्या, केंद्रात सत्तास्थानी असणाऱ्या व सेक्युलर म्हणवत मुस्लिमांचे हित जपण्याचा दावा करणाऱ्या इंदिरा काँग्रेस पक्षाने जम्मूतील हिंदूंचेच फक्त प्रतिनिधित्व करावे आणि काश्मिरमध्ये हिंदू नाहीत म्हणून तेथे मार खावा हा काळाचा महिमा म्हणावा लागेल ! भाजपसारख्या पक्षांना जातीयवादी, हिंदुत्ववादी अशी दूषणे लावणाऱ्या इंदिरा काँग्रेसवर काळाने हा सूड उगवला आहे ! □

---


गांधींच्या सहवासातून शिररला दिसला ख्रिस्ताशी साधर्म्य सांगणारा एक महात्मा...आणि त्या महात्म्यात दडलेला माणूस. त्या महात्म्यालाही या माणूसपणाची जाणीव होती. अनेकदा तसं तो जाहीरपणे बोलूनही दाखवायचा....

**राजहंसचे आगामी प्रकाशन**



# महात्मा आणि माणूस

**लेखक : विल्यम शिरर । स्वैर रूपांतर : निखिल वागळे**

**लवकरच प्रसिद्ध होत आहे !**

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुण ३०

## रत्नागिरी, चिपळूण, महाड, सांगली, कोल्हापूर, कोपरगाव, औरंगाबाद, आंबेजोगाई, नांदेड, शेंदुर्णी, भगूर, नासिक, येवला, खोपोली, कल्याण....

# सावरकर समताज्योतीचा संचार

विनय सहस्त्रबुद्धे

"दुपारी अडीचच्या सुमारास जेवण वगैरे आटोपून आम्ही वाईतल्या एका वाचनालयाच्या हॉलमध्ये विश्रांतीसाठी म्हणून आलो. बोलत बोलत जरा आडवे होतो न होतो तोच कार्यकर्त्यांचा एक घोळका ओळखी करून घ्यायला म्हणून आला. त्याचा उत्साह एवढा होता की, विश्रांतीचा मोह आवरावाच लागला. आमच्याबरोबर असलेल्या सर्वांची ओळख मी करून दिली. तर याच कार्यक्रमाच्या पूर्वतयारीसाठी आठ दिवस आधीच साताऱ्याहून आलेल्या आमच्या एका कार्यकर्त्याने वाईकर कार्यकर्त्यांचा परिचय करून दिला. अशी ओळखदेख सुरू असतानाच हॉलच्या दारात डोक्यावर मुडास, टोप्या असलेले चार–पाच गावकरी येऊन उभे राहिले. वाचनालयात आले असतील या कल्पनेनं मी गप्प राहिलो. एवढ्यात आमच्या वाईच्या एका कार्यकर्त्यानं लगबगीनं उठून त्यांची विचारपूस केली आणि त्यांना तो माझ्याकडे घेऊन आला. त्या चौघांनीही आम्हाला नमस्कार केला आणि त्यामुळं मी खूपच संकोचून गेलो.


नंतर ओळख झाल्यावर समजलं की, हे चौघे जवळच्याच एका वस्तीवजा खेड्यातले हरिजन ग्रामस्थ आहेत देवराम कांबळे आणि आबाजी कांबळे अशी त्यातल्या दोघांची नावं. समताज्योत वाईत आलीय हे समजल्यावर भर दुपारच्या रणरणत्या उन्हात मैल-दोन मैल पायी चालत ते मुद्दाम आम्हाला भेटायला आले होते. आपण इतका त्रास घेऊन का, कशासाठी आलात ? असा प्रश्न कोणी तरी विचारला. त्याला उत्तर देताना साठी ओलांडलेले आबाजी कांबळे म्हणाले– 'भर उन्हातच दोन–अडीच तास चाललेली तुमची समतायात्रा मी बघितली. तुमच्या लोकाची भाषणं मी ऐकली, घोषणाही काळजीपूर्वक ऐकल्या. तुम्ही फक्त सावरकर, आंबेडकर इ. च्याच घोषणा देत आहात. एकाही राजकीय नेत्याचा झिंदाबाद मी तुमच्या मिरवणुकीत ऐकला नाही. त्यावरून कोणत्या स्वार्थासाठी नव्हे तर केवळ समतेसाठी तुम्ही आज रस्त्यावर आला आहात याबद्दल मला मनोमन समाधान वाटलं. मिरवणुकीतला तुमचा उत्साह मी बघितला आणि असं वाटलं की, विचार करणारे, सामाजिक जाणीव असणारे तुमच्यासारखे तरुण-विद्यार्थी जर समतेसाठी पुढे आले तर राखीव जागासारख्या प्रश्नांवरून नव्या पिढीत जे समज–गैरसमजाचे वातावरण दिसून येते ते निवळायला खूपच मोलाची मदत होईल. हे सगळं मनाला जे वाटलं ते तुम्हाला सांगायला आलो !'

आबाजी कांबळ्यांशी नंतर खूप गप्पा झाल्या. मी त्याना विद्यार्थी परिषदेच्या कामाची माहिती दिली. त्यानी त्याच्या अडचणी सांगितल्या. वाई सोडताना जीपमध्ये बसल्यावर वाटलं की, हा प्रसंग तसा खूप साधा असला तरी त्याचं मोल खूप मोठं आहे. दबकत-दबकत, संकोचानं आलेली ती हरिजन मंडळी जाताना माझे मित्र बनून गेली होती !"–

शेखर वसंत चंद्रात्रे या अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या एका कार्यकर्त्याच्या फुटकळ नोंदवहीतलं हे एक पान आहे. विद्यार्थी परिषदेच्या महाराष्ट्र प्रदेश शाखेनं स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जन्मशताब्दिनिमित्त योजलेल्या महाराष्ट्रव्यापी समताज्योतयात्रेचा शेखर प्रमुख होता. मूळचा धुळ्याचा राहणारा शेखर रा. स्व. संघाचा लहानपणापासूनचा स्वयंसेवक ! आणीबाणीत मिसाबंदी म्हणून नासिकरोडच्या जेलमध्ये वर्षभर होता. सुटका झाल्यानंतर धुळ्यातूनच बी. कॉम. झाला. पुढे पुण्यात एम. कॉम. केलं. त्यानंतर मात्र लगेचच विद्यार्थी परिषदेचा पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून तो बाहेर पडला. गेली तीन वर्षं पुणे शहराचं काम बघितल्यानंतर आता त्याच्याकडे पुणे विद्यापीठाच्या कक्षेत येणाऱ्या सर्व जिल्ह्यांचं काम आलं आहे.

प्रसन्न व्यक्तिमत्त्वाच्या, मृदुभाषी शेखरला देण्यात आलेली महाराष्ट्रव्यापी समताज्योतयात्रेच्या प्रमुखाची जबाबदारी तशी महत्त्वाचीच होती. दि १ मेला रत्नागिरीच्या पतितपावनमंदिरापासून निघालेली ही समताज्योतयात्रा ठिकठिकाणी स्वागताचे हार-तुरे झेलत, समतेचे पोवाडे ऐकत, सावरकरांची स्मृती जागवत, त्यांच्या गीताचे स्वर घुमवत, सामाजिक अभिसरणाच्या प्रक्रियेला जाणीवपूर्वक पुढे नेत नेत, स्वा. सावरकरांच्या जन्मशताब्दीच्या दिवशीच महानगरी मुंबईच्या चैत्यभूमीवर, आंबेडकरांच्या स्मारकानजिक सागराला साक्ष ठेवून समाप्त झाली ! विद्यार्थी परिषदेच्या संघटनात्मक रचनेत एक वेगळाच प्रांत असलेले विदर्भाचे आठ जिल्हे वगळले तर उभा महाराष्ट्र या यात्रेनं पालथा घातला. मताच्या पेटीवर आधाशासारखी नजर ठेवून, कोणतीही राजकीय संधी साधण्यासाठी नव्हे, तर एकात्म आणि अभंग अशा निकोप समाजरचनेचं चित्र साकारण्यासाठी ज्यांनी कष्ट घेतले अशा सावरकरांसारख्या द्रष्ट्या युगपुरुषाची जन्मशताब्दि साजरी करण्यासाठी ही समताज्योत होती. साहजिकच तिला एक वेगळं महत्त्व होतं.

उघड्या टेंपोवर ठेवलेली समताज्योत, कार्यकर्त्यांसाठी एक स्वतंत्र जीप, बरोबर सहा–सात कार्यकर्ते इत्यादी लवाजमा सांभाळत आणि मुख्य म्हणजे बरोबरच्या सर्वांचा उत्साह–आनंद कायम राखत



¤

**समता ज्योतीचे प्रमुख संयोजक**
**शेखर चंद्रात्रे**
**मुंबई दि. २८ मे**

¤

सतत अठ्ठावीस दिवस उन्हातान्हात हा प्रवास करायचा म्हणजे सोपी गोष्ट नव्हती ! ज्यानं यात प्रमुख जबाबदारी सांभाळली त्या शेखर चंद्रात्रेशी या सगळ्या अक्रमातले अनुभव इत्यादी जाणून घेण्यासाठी खूप गप्पा मारायच्या होत्या, अनेक प्रश्न विचारायचे होते. परवा कोल्हापूरला झालेला महाराष्ट्र प्रदेश विद्यार्थी परिषदेचा अभ्यासवर्ग आटोपून शेखर मुंबईस आला त्या वेळी ही संधी मिळाली. दोन-अडीच तास गप्पा खूपच रंगल्या. त्यातूनच एक मुलाखत तयार झाली !

¤

**° शेखर, समताज्योतीचा हा एवढा मोठा उपक्रम हाती घेण्यात विद्यार्थी परिषदेचा नेमका काय उद्देश होता ? काही जणांना ही एक प्रकारची स्टंटबाजी वाटते. तुमचं यावर म्हणणं काय ?**

° गेल्या काही वर्षांपासून सामाजिक समतेच्या संदर्भात परिषदेनं निश्चित अशी काही पावलं उचलली आहेत. काही वर्षांपासून ६ डिसेंबर म्हणजे आंबेडकरांच्या पुण्यतिथीचा दिवस आम्ही समता–दिन म्हणून पाळत आलो आहोत. अशा प्रसंगांच्या वेळी नुसती भाषणं, चर्चा वा परिसंवाद व्हावेत यात आम्हाला स्वारस्य नाही. भाषणांच्या अशा कार्यक्रमांबरोबरच काही तरी ठोस कृतीचे उपक्रमही आम्ही वेळोवेळी हाती घेतले आहेत. पाच–एक वर्षांपासून आम्ही अशा स्थायी उपक्रमांचा, मागास वस्त्या वा झोपडपट्ट्यांमधून चालणाऱ्या संस्कारकेंद्रांसारख्या गोष्टींचा जास्त आग्रह धरीत आहोत. त्यातूनच आज मुंबईत मुलुंड, कुर्ला, जोगेश्वरी शिवाय पुणे, कोल्हापूर, सोलापूर, फलटण, धुळे, ठाणे, कल्याण, जळगाव, अमळनेर, लातूर इ. अनेक ठिकाणी अशी काही ना काही सामाजिक समताभिमुख ॲक्टिव्हिटी उभी राहिली. या सगळ्या ठिकाणी कॉलेजात शिकणारे, एरवी कधीही अशा वस्त्यांकडे ढुंकूनही न पाहणारे आजचे विद्यार्थी वरवर पाहता तिथल्या लहानलहान मुलांवर संस्कार करायला जसे गेले तसे काही संस्कार घेऊनही आले. समाजातला फार मोठा वर्ग अशा वस्त्यांमधून राहतो व त्यांच्या, त्यांच्या मुलांच्या विकासासाठी आपल्यालाच काही ना काही केलं पाहिजे ही जाणीव त्यातूनच वाढीला लागली.

सामाजिक अभिसरणाची ही सगळी प्रक्रिया वेळ घेणारी आहे, दलित आणि तथाकथित सवर्ण या दोघांच्याही मानसिकतेत भावात्मक परिवर्तन घडवून त्यांच्यात एक सुसंवाद–रॅपोर्ट–निर्माण करणं हे काम वर्षानुवर्षं करावं लागेल, आग्रहानं हा विषय रेटावा लागेल, याची आम्हाला जाणीव आहे. त्यामुळं प्रत्यक्ष कृतीचे छोटे–मोठे कार्यक्रम हाती घेत असताना आम्ही त्याचे अकारण डिंडिम वाजविले नाहीत. साहजिकच आज हे सगळं सगळ्यांना माहिती असेलच असं नाही. परिषदेच्या कामाकडे अमुक एका नजरेनंच बघणाऱ्यांना वा आमच्या कामाची नीट माहिती नसलेल्यांना समता–ज्योत ही स्टंटबाजी वाटू शकते. प्रत्यक्षात मात्र तशी ती नाही, असण्याचं काही कारणही नाही.

या सगळ्या पार्श्वभूमीवर सावरकरांच्या जन्मशताब्दीच्या निमित्तानं त्यांच्या सामाजिक समतेच्या प्रयत्नांचा, याबाबतच्या त्यांच्या विचारांचा प्रभावी प्रसार-प्रचार व्हावा, याबाबतचं चिंतन घडून यावं असा विचार आम्ही अगदी स्वाभाविकपणेच केला. समता–ज्योत–यात्रेची कल्पना या संदर्भात सर्वांत योग्य वाटली, म्हणून ती स्वीकारली. समताज्योतीचा आम्हाला स्टंटच करायचा असता तर समतेच्या आवश्यकतेचा एकाएकी साक्षात्कार झाल्यासारखं यात्रा काढून आम्ही मोकळे झालो असतो; पण तसं नसल्यामुळंच समतेच्या विषयात खारीचा वाटा उचलण्याइतकं का होईना, यापूर्वीही काही केलं आहे, इथून पुढेही काही करण्याची उमेद बाळगून आहोत.

**° सामाजिक समतेच्या या विषयात राखीव जागांसारखा किंवा मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतरासारखा प्रश्न ज्या ज्या वेळी पुढे आला त्या त्या वेळी परिषदेनं कोणती भूमिका घेतली होती ? त्या भूमिकेसाठी कोणती ठोस पावलं उचलली होती ?**

° या दोन्ही प्रश्नांबाबत आमची भूमिका तेव्हाही अगदी रोखठोक होती, आजही ती तशीच आहे. दलितांच्या सर्वंकष विकासात एक साधन म्हणून राखीव जागांचा निश्चितपणे उपयोग असल्यामुळं त्या आणखी काही वर्षे तरी सुरू रहाव्यात अशीच आमची भूमिका आहे. विद्यार्थ्यांमध्ये या विषयाची सतत चर्चा घडवून आणून या तरतुदीच्या विरोधकांना राखीव जागांची आवश्यकता पटवून

देण्यासाठी आम्ही नेहमीच प्रयत्नशील असतो. गुजरातेत राखीव जागांच्या विरोधात झालेल्या आंदोलनास नुसता विरोध करूनच आम्ही थाबलो नाही, तर या विषयावर राखीव जागाच्या बाजूनं, शिक्षणक्षेत्रातील मंडळीची एक सहमती तयार व्हावी म्हणून पाटण्यात आम्ही या विषयावर एक राष्ट्रीय स्वरूपाचा सेमिनारही घडवून आणला होता.

नामांतराच्या बाबतीतही आम्ही नामातर व्हावं अशीच नि:संदिग्ध भूमिका घेतली होती, आजही ती तशीच आहे. मात्र या संदर्भात या मुद्द्यावरून समाजात दोन तट पडावेत व कोणाही एकाच्या सघर्षात्मक भूमिकेमुळ ही तेढ वाढीस लागावी हे आम्हाला मान्य नाही व त्यामुळंच नामातर आदोलनात 'उडी टाकणे' वगैरे भाषा न वापरता आम्ही आजपर्यंत सत्याग्रहात भाग घेण्यापासून समाजप्रबोधनापर्यंत अनेक गोष्टी शांतपणे केल्या.

**० या एवढ्या मोठ्या उपक्रमाचा तू प्रमुख होतास, तेव्हा याच्या पूर्वतयारीचं कामही तूच केल असणार! ही पूर्वतयारी कशी केलीत ?**

० सुरुवातीस रत्नागिरीहून महाडमार्गे थेट मुबईपर्यंत एकच समताज्योतयात्रा काढावी अशी कल्पना होती. त्यावर मराठवाड्यातली मंडळी म्हणाली की, आम्हीही एक ज्योत औरंगाबादहून घेऊन येऊ. अशा दोन ज्योती निघण्यापेक्षा एकच ज्योत काढावी व ती सर्व महाराष्ट्रात फिरवून आणावी असा मार्ग त्यातून निघाला. शेवटी या यात्रेचं तारीखवार वेळापत्रक ठरून पुढे पूर्वतयारीला सुरुवात झाली.

प्रामुख्याने इंधन, वाहनाचा भाडेखर्च व प्रचारासाठीचा खर्च यावर मिळून एकूण काही हजार रुपये यासाठी खर्च होतील असा अंदाज होता! जिल्हा शाखाच्या वर्गणीतून आता हा खर्च भरून निघेल. या यात्रेच्या प्रसिद्धी–प्रचाराव्यतिरिक्तची जवळजवळ सर्व पूर्वतयारी मुंबईतून झाली. एका टेंपोच्या मागच्या भागात एका उच्चासनावर सावरकराचा अर्धपुतळा, बाजूला म. फुले, डॉ. आबेडकराची मोठी चित्रे व समोर एका त्रिकोणी स्टॅंडच्या वर समता–ज्योत अशी रचना केली होती. आमच्याबरोबर आम्ही विक्रीसाठी उपलब्ध अशी सावरकराची काही चित्रे, तसेच एक अतिशय प्रभावी प्रदर्शनही घेऊन गेलो होतो. ठिकठिकाणी हे प्रदर्शन माडले जात असे.

**० तुझ्याबरोबर एकूण किती कार्यकर्ते होते ?**

मी स्वत, मुबईचा विवेक गायतोंडे आणि फलटणचा संजय चिटणीस आम्ही तिघेही सबंध २८ दिवस प्रवासात होतो. आमच्यातला एकजण समता-ज्योत, तिच्यासाठी आवश्यक ते इंधन इत्यादीकडे लक्ष पुरवायचा, तर तिसऱ्याकडे वाहनाच्या व्यवस्थेचे काम दिलेले होते. सपूर्ण प्रवासभर राहिलेल्या आम्हा तिघाशिवाय आमचा प्रात मंत्री, श्याम जाजू, मुबईचा रवि पारकर, लोणंदचा राजन पंडित, कराडचा प्रकाश साळुखे, शिवाय तुषार जामदार, नंदू नाशिककर, आलोक केळकर, विनोद तावडे इत्यादी. अनेकजण मधूनमधून होते. शिवाय अनेक प्रमुख ठिकाणी आमचे अध्यक्ष अनिरुद्ध देशपाडे, प्रा. आपटे इत्यादी अनेक प्राध्यापक कार्यकर्तेही उपस्थित होते. दया पवार, सुधीर फडके, प्रभाकर अत्रे, वि. स. वाळिंबे, वि. ना. देवधर, विश्वास गांगुर्डे इत्यादी काही नामवंत मडळीही प्रवासात काही काळ आमच्याबरोबर होती.

**० तुमचा दिनक्रम साधारण कसा असायचा ?**

० वेळापत्रकानुसार मुक्कामाच्या ठिकाणाहून साधारण सकाळी सहा वाजता निघावं लागे. त्यामुळं पाच वाजताच आम्ही सर्वजण उठायचो. पुढे नाश्ता वगैरे घेऊन सकाळी आठपासून कार्यक्रम सुरू व्हायचे! दिवसभरात साधारणत: चार मुख्य गावाचा व साधारण तितक्याच वाटेवरच्या खेड्याचा प्रवास व्हायचा. प्रत्येक ठिकाणी सभा, मिरवणूक इत्यादी कार्यक्रम व्हायचे. नामवंतांची हजेरी लागायची. घोषणांच्या निनादात वातावरण सावरकरमय व्हायचे. रात्री, मुक्कामाच्या गावी मोठी जाहीर सभा होत असे. सर्व आटोपून, दुसऱ्या दिवशीचे नियोजन करून झोपी जायला बारा वाजत असत.

**० इतक्या गर्दीच्या वेळापत्रकाचा त्रास नाही झाला? कार्यक्रमातही तोचतोचपण असेल, मग बरोबरची मंडळी कटाळली नाहीत ?**

० गर्दीच्या वेळापत्रकाचा त्रास काही ठिकाणी निश्चितच झाला. त्यामुळे काही गावामध्ये ही यात्रा खूप उशीरा पोहोचली. गावकऱ्याच्या उत्साहामुळे विश्रांती मिळू शकली नाही; पण हाही एक आनंदाचा, प्रोत्साहनाचाच भाग ठरला; पण असे काही अपरिहार्य अपवाद वगळले तर साधारणत: आमच पूर्वनियोजन यशस्वी ठरलं. कार्यकर्त्यांपैकी मधूनच एखाद-दुसराजण कंटाळायचा; पण त्याचा अन्य परिणाम फारसा होत नसे, झाला नाही. उलट आम्ही सर्वांनीच एक प्रकारच्या धुंदीत, कार्यक्रम यशस्वी झाल्यावर वाटणाऱ्या समाधानात हा सर्व काळ घालविला. जीपचा ड्रायव्हर अमीद अली, अहमद अली व टेंपोचा ड्रायव्हर वसंत ताम्हाणे ही दोघेही आमच्यातलेच एक होऊन अठ्ठावीसही दिवस राहिले. या दोघा ड्रायव्हरमंडळीना मधूनमधून विश्राती देण्याचं काम ज्याना ड्रायव्हिंग येत होतं, असे आमच्यातले कार्यकर्ते करीत असत

**० या सर्व प्रवासात विशेष उल्लेखनीय असे कार्यक्रम कुठे कुठे झाले ?**

० अशी यादी बरीच लांबलचक होईल; पण तरीही काही ठिकाणाचा उल्लेख केलाच पाहिजे.

१ मेला रत्नागिरीहून आम्ही निघालो तो कार्यक्रम रत्नागिरीकराच्या अपूर्व उत्साहामुळं यशस्वी ठरला. चिपळूणला सावरकराबरोबर समतेच्या कामात सहभागी झालेले अनेकजण भेटले. महाड, सागली, कोपरगाव, औरंगाबाद, भगूर, खोपोली, कल्याण इत्यादी अनेक ठिकाणी प्रचड उत्साहात ज्योतीच्या मिरवणुका निघाल्या. कोल्हापूर, आबेजोगाई, नादेड, औरंगाबाद, शेंदुर्णी, नाशिक, येवला, पुणे इत्यादी ठिकाणच्या सभा खूप गाजल्या. औरंगाबादच्या सभेसाठी तिथल्या वसंतराव नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य राजाराम राठोड हे सर्व मित्रमंडळींनी, तुम्ही या मंडळीच्या (प्रतिगाम्याच्या!) कार्यक्रमाला जाऊ नका असं सागितलं असतानाही मुद्दाम आले व कार्यक्रमानं प्रभावित होऊन गेले. नाशिकला कुसुमाग्रज, दया पवार, सुधीर फडके, शांताबाई दाणी, संघाचे प्रांत-कार्यवाह वसंतराव भिडे अशी नानाविध क्षेत्रांतली मंडळी बहुधा प्रथमच एका व्यासपीठावर

आली. आटपाडी आणि डोंबिवली या ठिकाणचे समता-भोजनाचे कार्यक्रम खूप गाजले. अवघ्या काही तासाच्या पूर्वसूचनेनं, मुबईत प्रकाश आंबेडकर, एल. डी. भोसले व औरंगाबादेत एस. टी. प्रधान इत्यादी नेते काळाचौकीत झालेल्या समता-ज्योतीच्या स्वागतास जातीनं हजर राहिले.

० पोलिसांच्या परवानगीची अडचण कुठ आली काय ?

० अगदी सुरुवातीलाच ! रत्नागिरीला. तिथले पोलीस वाहनातून जळती वस्तू घेऊन जाण्यास परवानगी द्यायला तयार नव्हते. ते म्हणाले की, तुमची ही मशाल-मिरवणूक आहे व अशा मिरवणुकीस आम्ही परवानगी देत नसतो, पण आमच्या कार्यकर्त्यांनी समजावून सांगितले की, ही मशाल नसून नुसती ज्योत आहे, फक्त ती जरा मोठी असून तिला खाली दांडा आहे गंमत म्हणजे हा युक्तिवाद तिथल्या पोलिसाना पटला व मिरवणूक निघाली कोल्हापूरलाही अशीच परवानगीची अडचण येऊ पहात होती, पण तिथल्या इंदिरा काँग्रेसच्या अध्यक्षानीच स्वत हून ती सोडविली. नांदेडला मिरवणुकीला बंदी असतानाही शोभायात्रा शांततापूर्ण पद्धतीने निघाली. तिथल्या दै. पचनामाचे सपादक श्री. लक्ष्मणराव गायकवाडानी तर जाहीर सभेत आव्हानच दिले की, अटक करायची हिंमत असेल तर प्रथम मला अटक करा !

० प्रवासात, वेगवेगळ्या कार्यक्रमात या यात्रेच्या काळात आलेले काही विशेष अनुभव सांगता येतील ?

० तसे बरेच अनुभव आहेत, पण प्रकर्षानं जाणवलेल्या काही गोष्टींच्या सदर्भात दोन अनुभव सांगतो.

इस्लापूरला आम्ही गेलो त्या वेळी तिथल्या शोभायात्रेत ठिकठिकाणी ज्योतीला ओवाळण्याचे, सावरकराच्या पुतळ्याला हार घालण्याचे कार्यक्रम झाले एका ठिकाणी धनगर व मातंग समाजाच्या काही महिला मोठ्या भक्तिभावानं स्वागतासाठी आल्या व त्यानी घागरीच्या घागरी पाणी, टेंपोच्या चाकावर ओतलं. या कार्यक्रमाच्या ठिकाणापासून जवळच एका सार्वजनिक नळावर रिकामे हडे व कळशा घेऊन काही महिला पाण्याच्या प्रतीक्षेत असल्याच आम्हाला दिसले दुष्काळी परिस्थितीमुळ एकीकडे पाण्यासाठी दाही दिशा फिरण्याचा प्रसग आलेला असताना ज्योतीच्या स्वागतासाठी मात्र हडेच्या हडे ओतले जात होते हे आम्हाला पटलं नाही. मग आमच्यातल्याच तिघा-चौघानी खाली उतरून त्या महिलाच्या श्रद्धेचा आदर राखून त्याना ते न ओतण्याची विनती केली, त्यानीही ती ऐकली. आम्हा सर्वांच्याच मनात हा प्रसग घर करून राहिला. समतेचाच नव्हे तर सावरकरांचा विज्ञाननिष्ठेचा सदेशही समाजाच्या पचनी पाडण किती अवघड आहे याची जाणीव झाली.

लक्षात राहण्याजोगा असाच एक प्रसग औरंगाबाद जिल्ह्यातला आहे शहापूर सोडून अंबडला आलो त्या वेळी आमची जीप पुढे आली; पण टेंपो मात्र आधी पेट्रोलपंपावर व मग एका रानात, तांत्रिक बिघाडामुळे अडकून पडला. आम्ही अंबडला पोचलो; पण मुख्य म्हणजे ज्योतीचाच पत्ता नाही ! टेंपोच्या शोधासाठी आम्ही अंबडहून काही वाहनेही पाठविली; पण व्यर्थ. शेवटी अन्य कोणत्याही मदतीची आशा न राहिल्याने संजय चिटणीस आणि राजन पंडित हे हे आमचे दोन कार्यकर्ते, रात्रीच्या काळोखात १६ कि. मी. अतर पायी चालत आले व उशीरा का होईना अबडचा कार्यक्रम पार पडला !

० या समताज्योतीवर उघड टीका कुठे झाली का ? की सर्वसाधारण स्वागताचाच प्रतिसाद होता ?

० मुबईत एन एस. यु. आय. च्या एका पदाधिकाऱ्यान काढलेल पत्रक सोडल तर या उपक्रमाला विरोध कोणीही दर्शविला नाही. काहीजण या उपक्रमापासून मुद्दामच कदाचित बाजूला राहिले असतील, पण निदान आमच्यावर हेत्वारोप करून या उपक्रमाला गालबोट लावण्याचा करंटेपणा तरी सामान्यत कोणीही केला नाही दलितवस्त्यामधून या यात्रेच उत्साहात स्वागत झालं दलित सघटनाचे पुढारी अनेक ठिकाणी जातीन हजर होते. तसेच ज्येष्ठ विचारवत शकरराव खरात, जयदेव गायकवाड, प्रकाश आंबेडकर, लक्ष्मणराव गायकवाड, शांताबाई दाणी, प्राचार्य राजाराम राठोड, केशव मेश्राम, तसेच गो नो दांडेकर, विद्याधर गोखले, शिवाजी सावत, प्रभाकर अत्रे, सुधीर फडके, शं. ना. नवरे, डॉ. श्रीराम लागू, नानाजी देशमुख इ. चा आमच्या उपक्रमातला सहभाग आम्हाला प्रोत्साहन देऊन गेला. जिल्हा वृत्तपत्रासह मुबई–पुण्याच्या वृत्तपत्रानी या यात्रेला ठळक प्रसिद्धी दिली. किती तरी वृत्तपत्रानी या ज्योतीबद्दल अग्रलेख वा सपादकीय स्फुटे लिहिली ठिकठिकाणी विविध राजकीय पक्षाचे नेते, खासदार, आमदार स्वागताच्या कार्यक्रमाना जातीन हजर राहिले. पाथरीसारख्या ठिकाणी तर कम्युनिस्टनेते कॉ. शफीक फारुकी यांनी सावरकराचा गौरव करणारं भाषण केलं. थोडक्यात सागायच म्हणजे हा कार्यक्रम कुठेच एकट्या विद्यार्थी परिषदेचा राहिला नाही तर तो सर्व समाजाचा झाला.

० साराशानं, या सगळ्या यात्रेतून विद्यार्थी परिषदेनं नेमकं काय साधल ? परिषदेची प्रतिमा यामुळं काही अंशी बदलण्याव्यतिरिक्त यातनं आणखी महत्त्वाचं असं काय मिळालं ?

० बरंच काही मिळाल ! पहिली गोष्ट म्हणजे विद्यार्थी परिषद आपली प्रतिमा बदलण्यासाठी म्हणून काही करत नसते. त्यामुळे या यात्रेच्या उपक्रमातून इतराच्या दृष्टीने आमची प्रतिमा जर बदलली असेल, तर तो दुय्यम भाग झाला. महत्त्वाचे साध्य आहे ते वेगळेच!

या समताज्योतयात्रेमुळे अतिशय व्यापक स्वरूपात विद्यार्थी परिषदेच्या ठिकठिकाणच्या कार्यकर्त्यांचा, 'दलित सघटना' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अनेक सघटनाशी, त्याचे नेते व कार्यकर्ते याच्याशी खूप निकटचा सबंध आला. विविध कार्यक्रमातून तथाकथित, दलित व सवर्ण, या समाजघटकाना व्यापक प्रमाणावर आम्ही एकत्र आणू शकलो. परस्परात नवा विश्वास निर्माण करू शकलो. समाजात अकारण कप्पेबद राहिलेल्या तथाकथित सवर्ण व दलित नेत्याना व्यापक, एकसंध समाजरचनेची आवश्यकता नीटपणे लक्षात आणून दिली तर सहसवेदनेची, सुसंवाद साधण्याची प्रक्रिया वेगानं सुरू होऊ शकते याची जाणीव आम्हाला या यात्रेतून जागविता आली.

शिवाय या महाराष्ट्रव्यापी उपक्रमामुळे सामाजिक समतेला अनुकूल असं वातावरण, काहीसं तात्कालिक का होईना, पण जरूर निर्माण झालं आहे ठिकठिकाणच्या कार्यक्रमातून, भाषणातून, यावर

पृष्ठ २० वर

# संशय पिशाच्च

सुधा नरवणे

मी आहे एक साधासुधा माणूस – हातावर पोट असणारा. माझा व्यवसाय आहे नळदुरुस्तीचा. कधी मला भरपूर पैसे मिळतात तर कधी अगदीच बेताची आवक होते; पण मला या चढ–उताराचं इतकं काही वाटत नाही कारण जीवनापासून माझ्या काही फार मोठ्या अपेक्षा नाहीत. मी आणि माझी बायको फिलोमेना–दोघं टुकीनं राहतोय दोन्ही वेळचं पोटभर जेवण मिळतंय् – थोडे पैसे तगीच्या दिवसासाठी बाजूला ठेवायचे. माफक चैन, माफक मौज-मजा – अस आपलं साधसुध, सुरळीत आयुष्य घालवणारा माणूस होतो मी... ..

...त्या दिवसापर्यंत

...त्या दिवसापासून मात्र खरंच सारं बदललंय्...

त्या दिवशी मला गावातल्या अगदी दूरवरच्या भागात बॉयलर–दुरुस्तीचं काम आलं – मी अगदी लौकर उठलो. माझी हत्यारं घेतली आणि घराच्या बाहेर पडलो. तेव्हा फिलोमेना झोपलेलीच होती. ती उठे-पर्यंत मला वेळ दवडून चालणार नव्हत. त्या ठिकाणी पोचायला सहज अर्धापाऊण तास – पाइप-दुरुस्तीच्या कामाला तास-दीड तास सुद्धा लागतो. कधी अपेक्षेपेक्षा जास्त दुरुस्त्या कराव्या लागतात. एखादा नट, बोल्ट, जॉइंट बाजारातून विकत आणल्या-शिवाय दुरुस्तीचं काम खोळंबतं. परत यायला पुन: अर्धापाऊण तास. म्हणजे एकं-दरीत तीन तास मला घराच्या बाहेर काढावे लागतात तेव्हा कुठं पैसा दिसतो ! तस पाहिलं तर तीन तास म्हणजे काही फार नाही. पोटापाण्याचा व्यवसाय करायचा म्हणजे वेळेचा विचार करून कुठं चालतं का ?

त्या दिवशी काय झालं की मी माझं काम पुरं करून येत होतो. बसस्टँडपाशी मला माझ्या नावानं कुणी तरी हाका मारत होतं. ...मी वळून पाहिलं. ती होती म्हातारी फेड – आमच्या घरासमोरच राहणारी. तिचे दोन्ही पाय म्हातारपणान असे टम्म सुजले होते की अगदी तिच्याकड पाहून हत्तीची आठवण यावी ! तिला चालताना चांगलीच धाप लागली होती. मी वळून पाहताच म्हणाली, "बर झाल भेटलास – अगदी देवानच पाठवल्यासारखाच समोर आलायस बघ – तू त्या पलीकडच्या रस्त्यानं जाणार ना ? मलाही तिकडेच जायचंय् – धरतोस का या भाजीच्या पिशव्या ?'

'हो, धरतो की – त्यात काय मोठसं ?' माझ्या हातात तिच्या पिशव्या आणि ती माझ्याजवळून पाय ओढीत ओढीत चाललेली–अशी आमची दुक्कल रस्ता ओलाडायला लागली. रस्ता ओलाडून आम्ही पलीकडे गेल्यावर तिनं विचारलं, 'तुझी फिलोमेना कुठंय्–?'

'कुठं म्हणजे ? घरी ! आत्ता या वेळी ती आणखी कुठं असणार ?'

'होय रे होय–आत्ता ती घरीच असणार–नक्कीच घरी...'

'असं 'नक्की–नक्की' का म्हणता फेड-मावशी ?' उगीच काही तरी विचारायचं म्हणून मी हा प्रश्न विचारला.

'तू बाहेर पडलास म्हणजे ती घरीच–बिचारा...तुला बापड्याला काय कळणार म्हणा–'

माझ्या मनात एकदम शंकेची पाल चुक-चुकली. मी क्षणभर बावचळलो. जरा थांबून शांतपणे विचारलं, 'का ? असं मला 'बापडा' अन् 'बिचारा' का म्हणता ?'

'कारण खरच तू बिचारा आहेस ..तुझी मला फार कीव येते...' माझ्या दृष्टीला दृष्टी न भिडवता म्हातारी हळहळत होती.

'म्हणजे काय ?' हजार शंकाचं मोहोळ...

'म्हणजे असं की आता काही पूर्वीसारखे दिवस उरलेले नाहीत. आमच्या वेळच्या आणि आजकालच्या बायका – फार फरक आहे बरं ..'

'कसला फरक मावशी ?'

'आमच्या वेळी ना – नवरे आपापल्या बायकाना सुखेनैव घरी सोडून आपल्या कामधंद्याला जाऊ शकत होते...आता ? नको रे विचारूस जास्ती – हल्लीच्या बायकाना ना ताळ, ना तंत्र... '

'का ? आताच्या बायका काय करतात?'

'काय करतात ? कशाला बाबा मी माझी जीभ विटाळू भलत्या गोष्टी बोलून ? ...हं . आण त्या पिशव्या इकडं – तुझ्या मदतीबद्दल थँक्स हं ..'

...ती सुंदर सकाळ आणि अर्थार्जनाचा माझा आनंद – दोन्हीही फेडच्या बोलण्यामुळं पूर्णपणे नासून गेला. तिला पिशव्या न देता मी म्हटलं, 'मुळीच नाही देणार मी तुमच्या पिशव्या – आधी समजून सांगा तुमचं हे गूढ बोलणं ... यात फिलोमेनाचा कुठं संबंध येतोय...'

'मला नाही रे बाबा काही माहिती ! आपलं तुला सावध करून ठेवलं...'

'कशाबद्दल सावध ? सांगा ना नीट–' मी जवळजवळ ओरडूनच विचारलं–'सांगा ना फिलोमेनानं काय केलंय् ?...'

'आता असं कर, तू ते सर्व अॅडेलजिसाला विचार... .' एवढं बोलून तिनं माझ्या हातून पिशव्या जवळजवळ हिसकावूनच घेतल्या आणि अशा चपळाईनं तिनं माझ्या पुढून पळ काढला की, तिचे हत्तीचे पाय जणू क्षणात हरणाचे पाय झाले ! ....

......मी हतबुद्ध झालो. विचार केला की, आता दुकानात आणि घरी जाण्यात काही अर्थ नाही. प्रथम या प्रकरणाचा छडा लावलाच पाहिजे. चला, त्या अॅडेलजिसाला भेटावं. ती या बसस्टँडपासून काही फार दूर रहात नव्हती मला फिलोमेना भेटण्यापूर्वी हिच माझं लग्न ठरलं होतं. मी तिला झिड-कारून फिलोमेनाशी लग्न केलं यावद्दलचा तिचा राग अजून विझला नव्हता. तेव्हा मत्सरापोटीच तिनं फिलोमेनाबद्दल खोडसाळ अफवा उठवल्या असणार.

अॅडेलजिसा राह्यची चौथ्या मजल्यावर. चार जिने चढून मी अशा जोरानं दार ठोठा-वलं की बहुतेक माझा सर्व राग अन् तिर-स्कार माझ्या मुठीत उतरला असणार. दार अगदी लगेच उघडलं गेलं. ती घरकाम

करीत होती. तिच्या हातात झाडू होता. फ्रॉकच्या बाह्या वर सारल्या होत्या. कमरेला एप्रन बांधला होता. माझा रागानं लाल झालेला चेहरा पाहून तिनं जरा चमकूनच विचारलं, ' का रे कशाला आलायस ? काय हवंय तुला ?'

' काय ग भवाने ? तूच कंड्या पिकवतेस वाटतं माझ्या फिलोमेनाबद्दल ? मी दुकानात गेलो की ती माझ्यामागं मित्रांना बोलावून रंगढंग करते असं तूच सांगत सुटलीयस वाटतं ? '

माझं रागारागानं दार ठोठावणं आणि तावातावानं बोलणं पाहून तीही संतापली. दोन जळजळीत डोळे माझ्यावर रोखून म्हणाली, ' हवी होती ना तुला ती फिलोमेना—? माझ्यापेक्षा सुंदर वाटली ना ?—चटकचांदणी ती ! मला टाकून तिच्याकडं गेलास. जा—जा—भोग आता आपल्या कर्माची फळं ! ......' तिच्या या उद्धट बोलण्यानं माझ्या रागात भरच पडली. मी तिचे बखोटे धरून तिला गदगदा हलवलं अन् ओरडलो, ' वाटलंच मला—तूच असणार ती भोचकभवानी.खोटयानाटया बातम्या पसरवणारी—'

माझ्या मनात सशयाचं बीजारोपण झालेलं तिला स्पष्ट दिसून आलं आणि ते पाहून तिला आनंद झाला. मी तिला इतक्या खसखसा हलवलं तरी ती मुळीच घाबरलेली दिसली नाही. अगदी धीटपणे म्हणाली, ' मी नाही हं बातमी उठवली—मी आपलं जे ऐकलं ते सांगितलं......'

' काय ऐकलंस अन् कुणाकडून—? ' आता मी पिसाटासारखा वागत होतो.

' नीनाकडून— '

यावर काही बोलण्यासारखं नव्हतंच—तिचे हात सोडून मी परत जायला निघालो. ती फुत्कारली, ......' आणि हे बघ, आता पुन: मला भोचकभवानी म्हणू नकोस— आधी स्वत:च्या पायाखाली काय जळतंय ते बघावं आणि मग दुसऱ्यांना शिव्या द्याव्या—बरं ! '

तिनं धाडकन् दार लावलं. दार लावता लावता म्हणाली, ' गोगलयाय अन् पोटात पाय असण्यापेक्षा भोचकभवानी असणं बरं—'

आता मात्र मी पुरताच भांबावून गेलो. खरं काय न् खोटं काय याचा विचार मला करता येईना. या संशयाचं निराकरण झालंच पाहिजे, त्याशिवाय मला अन्नपाणी गोड



म्हणजे तूच ती गटारगप्पा उठवणारी — नीच — नादान !

¤

लागणार नाही. डोळयाला डोळा लागणार नाही. फिलोमेना मला फसवीत असेल असं मला वाटत नव्हतं. आमचं लग्न होऊन तीन वर्षं झालीयत्—या तीन वर्षांत तिनं मला भरभक्कम प्रेम दिलंय—माझ्या घराचं नंदनवन करून सोडलंय्......कुठं काही उणं पडू दिलं नाही......

....तरीही या दोन बायकांच्या बोलण्यामुळं माझ्या मनात संशयानं प्रवेश केलाय्. मत्सर......तो झोटिंग आता हळूहळू आपले हातपाय पसरवतोय्. फिलोमेनाचं आणि माझं प्रेम आठवतंय्. तिचं गोड वागणं-मधुर शब्द—सगळं नाटक की काय ? तिच्या वागण्यात मला फसवेगिरीचं प्रतिबिंब दिसतंय्..तिचा एकेक शब्द, एकेक विभ्रम म्हणजे चंचल चवचाल स्त्रीचे चाळे वाटताहेत—वरूनवरून प्रेमाचं नाटक आणि अंतर्यामी......

काय म्हणालो ॲडेलजिसा ? ' मला नीनाकडून कळलं ' म्हणाली ? चला आता नीनाला गाठावं...

नीना एका कॅफेमध्ये वेट्रेस होती. अगदीच सामान्य कॅफे...जेमतेम चालणारं...

मी गेलो तेव्हा ती एका गिऱ्हाइकाला कॉफी देत होती. मी एका टेबलाशी बसलो. माझी ऑर्डर घ्यायला ती आली तेव्हा एका झटक्यात विचारून टाकलं, ' काय ग ? तू सर्वांना असं सांगत फिरतेस की फिलोमेना दुसऱ्या पुरुषांना घरी बोलावते ? मी नसतांना ?'

तेवढ्यात आणखी एक गिऱ्हाईक आलं. ती चटकन् त्याची ऑर्डर घ्यायला गेली. त्याच्याशी शांतपणे बोलून, त्याला हवे ते पदार्थ देऊन मग माझ्याकडे वळली.

' काय म्हणतोयस बाबा ? '

मी पुन: तिला माझा प्रश्न विचारला.

' ...तुला, खरंच असं वाटतं का मी माझ्या जिवलग मैत्रिणीबद्दल अफवा पसरवीन ? '

' मग ॲडेलजिसा काय झोपेत बरळत होती ?'

' तसं नाही. तिनं बरोबरच सांगितलं... पण महत्त्वाची गोष्ट अशी आहे की, मी ती बातमी उठवलेली नसून जे मी दुसरीकडून ऐकलं ते फक्त मी तिला सांगितलं— '

' वा ! वा ! काय पण जिवाभावाची मैत्रिण तूं— '

'नाही – अरे, तरी मी म्हटलंच की, माझा यावर विश्वास बसत नाही म्हणून–ते मी बोललेलं तेवढं अँडेलजिसानं सांगितलं नाही तुला–भोचक मेली–'

'बरं ते जाऊ दे. आता सांग, तुला कुणी सांगितलं?'

'व्हिन्सेनानं...! ती एक दिवस तिच्या लाँड्रीतून पळत पळत आली मला हे सांगायला–'

... जास्त काही न बोलता एका तिरिमिरीतच मी तिथून निघालो आणि थेट लाँड्री गाठली. रस्त्यातून दूरवरूनच मला दिसली व्हिन्सेना. इस्त्री करीत होती – ती मुलगी म्हणजे अगदी बुटबैंगण–ओबडधोबड चेहऱ्याची, एके काळी ती माझ्यावर लाइन मारीत असे आणि अजूनही मला पाहून हरखून जाते. आत्ताही ती अगदी आनंदित झाली.

'... किती दिवसांनी भेटतो आहेस रे... किती बरं वाटतं म्हणून सांगू–'

'पुरे कर तुझं आनंदाचं पुराण–' महामाये, तूच जिकडेतिकडे सांगत फिरते आहेस ना की मी कामधंद्याला गेलो की फिलोमेना मित्रांना गोळा करते म्हणून?'

माझा जमदग्नीचा अवतार पाहून ती दोन पावलं मागं सरली. तिचा चेहरा पडला. हिला एवढं निराश व्हायला अन् हिरमुसायला काय झालय?

'का? तुझी काही हरकत आहे का तिच्या वागण्याला?...'

'प्रथम माझ्या प्रश्नाचं उत्तर दे...तूच ही बातमी पसरवलीस का?...'

'अरे वा! भलताच मत्सरी नवरा आहेस की तू–! अरे, ती मित्र जमवते तर तू मैत्रिणी जमव!...' माझ्याकडं आशेनं पाहू लागली. पुन' आपलं इस्त्रीचं काम सुरू करता करता म्हणाली, 'काय झालं एखाद्या स्त्रीला पुरुष–मित्र असले म्हणून? इतकं आकाश–पाताळ एक कशाला करायचं?...'

'ह–म्हणजे तूच ती गटारगप्पा उठवणारी–नीच–नादान!–'

'हे बघ, कितीही शिव्या दे तू मला, मुळीच मला राग यायचा नाही. कीव मात्र येतेय्. मला काय करायचंय् तुझी बायको काय करते याच्याशी–जाईना का ती तिकडं खड्ड्यात–मला आपलं अँग्नेसनं सांगितलं ते मी नीनाला सांगितलं. अँग्नेसला तर तुझ्या बायकोच्या त्या मित्राच नावसुद्धा माहीत आहे! मला सांगितल होतं तिनं...'

'सांग – मला सांग –' मी अधीरतेनं विचारल.

'नावबिव मी नाही रे बाबा सांगायची. आपल्याला नकोत दुसऱ्यांच्या भानगडी–'

– आता मात्र माझी खात्रीच पटली की, फिलोमेना नक्कीच मला फसवतेय् सगळ्यांना तिच्या प्रियकराचं नाव माहिती–! कहर आहे!

माझी प्रिय पत्नी फिलोमेना दुसऱ्या पुरुषाच्या बाहुपाशात! मला कल्पनाच करवेना–कसं शक्य आहे?

चला! आता पुढची पायरी–अँग्नेसची भेट घेणं आलंच–

अँग्नेस काम करायची तिच्या वडिलांच्या सिगारेटच्या दुकानात–मी काँटरवर पैसे फेकले आणि सिगारेटी मागितल्या. ही जेमतेम सतरा वर्षांची मुलगी; पण महाडांबरट–सगळे जाणून होते तिची ही ख्याती. पैशासाठी काहीही करायला तयार असणारी लावसट होती ती–

मी उगीच फालतू बोलणं करण्यात वेळ घालवला नाही. धाडकन् विचारलं, 'सांग मला त्या हरामखोराचं नाव–'

'कुणाचं?'

'त्याच त्या हलकटाचं-माझ्या बायकोच्या प्रियकराचं...'

तिच्या चेहऱ्यावर मूर्तिमंत भीती दिसत होती. माझ्याकडे ती अशी पाहत होती–जणू तिच्यापुढं आग्यावेताळ उभा होता! माझा चेहरा मत्सरानं हिरवापिवळा पडला असणार. शिवाय त्वेषाचे, हिंसापूर्ण विचारही माझ्या मुद्रेवर दृग्गोचार झालेले असणार. त्याशिवाय का तिचा असा नखशिखान्त थरकाप उडतोय्?

घाबरत–घाबरत, चाचरत–चाचरत ती कशीबशी उत्तरली, 'मला नाही काही माहिती–' मी विचार केला जरा नरमाईनं घ्याव–थोडी निवळल्यासारखी चर्या केली–थोडसं हसायचा प्रयत्न केला. तिला चुचकारत आर्जवी स्वरात विचारलं, 'सांग ना–असं काय? मी तुला नाही काही करणार–सगळ्यांना हे प्रकरण माहीत आहे अन् मीच एकटा अंधारात–हे योग्य आहे का?'

...हे बोलताना मी खिशातून पैसे बाहेर काढले. मघाशी नळदुरुस्तीच्या कामासाठी मिळालेली एक हजार लिराची नोट होती ती–

'...बघ त्याचं नाव सांगितलंस तर ही नोट देईन तुला...'

एवढ्या मोठ्या रकमेची नोट पाहताच अँग्नेसच्या डोळ्यात एक वेगळीच चमक दिसायला लागली. लोभ आणि हावरेपणा ओसंडून जायला लागला. तिच्या आनंदाला पारावार उरला नाही. तिच्या गालावर अशी लाली पसरली की जणू मी तिच्याजवळ प्रेमयाचना करतोय्–

तिनं नोटेवर हात ठेवला आणि इकडेतिकडे पाहत हळू आवाजात पुटपुटली, 'मारिओ!'

'तुला कसं कळलं हे नाव?'

'तुमच्या इमारतीची देखभाल करणारी बाई आहे ना – तिनं सांगितलं–'

एकूण काय? ती दुष्ट अफवा खरी ठरली. इतका वेळ माझ्या मनात द्वंद्व चालू होतं. दोलायमान अवस्था होती – मनातला संशयाचा झोका कधी इकड तर कधी दुसऱ्या बाजूला हेलकावत होता. आता तो एका जागी स्थिर झाला.

अँग्नेसच्या दुकानातून बाहेर पडल्यावर एकच करण्यासारख होतं ते मी केलं–म्हणजे घराची वाट धरली – वाटेनं मी मारिओ नावाचा जप करीत चाललो – एका नव्या विचारानं माझा ताबा घेतला... मारिओ नावाचे किती पुरुष आमच्या माहितीचे होते! यातला कोणता मारिओ फिलोमेनाचा मित्र असेल? दूधवाला मारिओ? का सुतार मारिओ? का तो भाजीविक्या मारिओ? कुणाशी सूत जुळवलं हिनं?

...हं–का तो सैन्यातून परत आलेला तगडा मारिओ हिचा मित्र असेल? रिकामटेकडाच आहे सध्या तो – पण तरतरीत बलदंड – त्याच्यावर फिलोमेना भाळली असेल का?

मारिओ – मारिओ – मारिओ...या रोम शहरात हजारो मारिओ असतील – त्यापैकी कुणाशी फिलोमेनानं सूत जमवल?

आमच्या बिल्डिंगपाशी पोचल्यावर मी

थेट 'केअरटेकर'च्या खोलीत गेलो – त्या फेडप्रमाणच हीही म्हातारी आणि लठ्ठी होती. अगदी कुरूप–

नमनाला काडीचंही तेल न घालता मी एकदम मूळ विषयाला हात घातला–'काय हो? तुम्ही फिलोमेनाविषयी कसल्या कसल्या कड्या पिकवता? मी घरात नसताना तिच्याकडे मित्र येतात?'

माझा भाडणाचा पवित्रा पाहून ती हबकली – पण तीही भाडकुदळच होती – कमरेवर हात ठेवून टिपेचा आवाज काढून म्हणाली, 'मी कशाला कड्या पिकवू– तुमच्या बायकोनंच सांगितलं मला–

'काय? काय??' माझ्यावर वज्राघातच झाला.

'हो तर! ती नेहमी मला सांगते, मारिओ नावाचा एक मनुष्य मला भेटायला येणार आहे–माझा नवरा घरात असला तर त्याला सांग वर नको येऊ म्हणून – आणि माझा नवरा बाहेर कामाला गेलेला असला तर त्याला वर पाठव – आत्तासुद्धा आहे तो तुमच्या घरी!...'

'काय म्हणता तरी काय? आत्ता? एका क्षणात त्याना पकडता येईल...माझ्या बायकोशी गुलगुल गोष्टी करत बसलाय् तो आत्ता?'

'मग! शंका आहे का? तास झाला त्याला येऊन...'

आता मी क्रोधानं हिरवा-पिवळा, लाल-निळा, जांभळा-पारवा सर्व रंगाचा बनून गेलो!

हं! एकूण मारिओ नावाचा प्रियकर खरंच अस्तित्वात आहे! एवढंच नव्हे तर आता तो फिलोमेनाबरोबर प्रेमालाप करतोय्–या कल्पनेन माझ्या डोळ्यात खून चढला!

मी पळतपळत जिने चढलो. तिसऱ्या मजल्यावरच्या माझ्या फ्लॅटच्या दरवाज्यावर धडाधडा धडका मारल्या.

फिलोमेनानं दार उघडल. एरवी शांत, सोज्ज्वळ दिसणारी माझी बायको – आत्ता पांढरीफटक पडलेली दिसली. पडणारच – पाप हे भित्रंच असतं.

'काय ग बाजारबसवे, मी नसताना तुझा मारिओ येतो काय इथं?'

'मग काय झाल?'

'काय झालं? चाडाळणी – तुला असं बोलवतं कसं? सगळं कळतंय् मला – बघू दे मला – कुठंय् – चागला समाचार घेतो त्याचा–'

तिनं दोन्ही हातानी माझी वाट अडवली. 'अरे, जरा शांतपणानं वाग – दमानं घे – तुझं काय बिघडतंय् तो आला म्हणून? एवढं आकाडताडव करायला काय झाल?'

'माझं काय बिघडतं? वरीच आहेस की–मानभावी–शहाजोग–' तोंडाला येईल ते बडबडत, आरडत-ओरडत मी आत शिरलो.

–आणि सैंपाकघरात बसलेल्या त्या मारिओला पाहून स्तंभितच झालो! एका जागी खिळल्यासारखा उभा राहिलो...

मारिओ कॉफी पीत बसला होता!

पण हा मारिओ सैन्यातून परतलेला तगडा सैनिक नव्हता की, गुलछबू दूधविक्या नव्हता की, गोडबोल्या भाजीविक्या मारिओ नव्हता!

हा मारिओ फिलोमेनाचा सख्खा भाऊ.– चोरीच्या आरोपावरून दोन वर्षे तुरुंगाची हवा खाऊन आलेला. म्हणूनच मला न आवडणारा...आग लागो त्या बायकाच्या


# विस्तारित क्षितिजे

ज्या वेळी भारताच्या नकाशात महाराष्ट्र राज्याची स्वतंत्र नोंदही नव्हती त्या वेळी, म्हणजे १९३५ साली महाराष्ट्रातच महाबँकेची स्थापना झाली; पण तिची दृष्टी मात्र स्थापनेपासूनच व्यापक अशा राष्ट्रसेवेची होती. सबंध भारतातल्या दीन-दुबळ्यांची सेवा करण्याचं उद्दिष्ट साधण्यासाठी बँकेचा विस्तार झपाट्यानं करण्यात आला.

१९४६ साली कर्नाटकात पहिली शाखा – हुबळी
१९४९ साली आंध्रप्रदेशात पहिली शाखा – हैदराबाद
१९६१ साली मध्यप्रदेशात पहिली शाखा – दुर्ग
१९६३ साली गोवा-मुक्तीनतर लगेच – पणजी, मडगाव
१९६९ साली करोलबाग – दिल्ली
१९७१ साली गुजराथ राज्यात पहिली शाखा – अहमदाबाद
१९७२ साली तामिळनाडूत – मद्रास
१९७४ साली हरियानात फरिदाबाद येथे, केरळमध्ये कोचीन, पंजाबमध्ये लुधियाना, राजस्थानमध्ये जयपूर येथे, प. बंगालमध्ये कलकत्ता येथे – पहिल्या शाखांची सुरुवात.
१९७६ साली – पॉंडिचरी
१९८० साली जम्मू-काश्मिरमधील श्रीनगर येथे आणि बिहारमध्ये पाटणा.

**आज आपल्या ९०० चे वर शाखांच्या सहाय्याने भारतीयांची सेवा करणारी बँक–**

## बँक ऑफ महाराष्ट्र

**( भारत सरकारचा उपक्रम )**

मुख्य कचेरी : "लोकमंगल", १५०१ शिवाजीनगर
**पुणे – ४११ ००५.**

उथळ बडबडीला !

...तो तुरुंगातून सुटण्याच्या सुमाराला मी फिलोमेनाला म्हटलं होतं की, '...असेल तो तुझा भाऊ. अगदी पाठीला पाठ लावून आलेला; पण मला नाही खपायचं तो आपल्या घरी आलेला. मला त्याचं नावसुद्धा काढलेल खपायच नाही. आधीच सांगतो. मागून वादावादी नको !'

...तेव्हा माझ्या बायकोनं माझ्या म्हणण्याला मान तुकवली होती; पण नंतर तिचं भावावरच प्रेम उफाळून आल असणार. तो खरोखरीच चोरी करून गजाआड गेला होता. त्याबद्दल त्यानं शिक्षाही भोगली होती. आता त्यानं सुधारावं असं तिला मनोमन वाटत असणार त्याच्या पाठीवर मायेचा हात फिरला तर तो सुधारेल या आशेनं तिनं त्याच्याशी संबंध ठेवला असणार. थोडी क्षमा. उदड जिव्हाळा. तिचे ठोकताळे वेगळे होते.

साऱ्या परिस्थितीचा क्षणार्धात अंदाज घेऊन मी पुढं गेलो. त्याच्याशी शेकहॅंड केला आणि म्हटलं, 'हॅलो मारिओ !' तो पाण्यात पडलेल्या ढेकळासारखा विरघळला होता. नेभळटपणे म्हणाला, 'निघालोच मी–' मी म्हटलं, 'जाशील रे! एवढं घाबरायला काय झाल तुला ? मी काय भूत आहे का ?'

...आतल्या पॅसेजमध्ये उभ्या असलेल्या फिलोमेनाचे हुंदके मी ऐकले आणि मला कमालीची शरम वाटली. मी ओशाळून म्हटल, 'मारिओ, नको जाऊस. किती दिवसानी भेटतोय आपण. जेवायला थाब ! फिलोमेना, चालेल ना तो जेवायला थाबलेला? पुरेल ना सैंपाक ?'

तिच्या चेहऱ्यावर अविश्वास, सुटका, आनंद किती तरी भावनांच नर्तन, आलटून-पालटून दिसायला लागलं. ती घामाघूम झाली. मी तिला मायेन जवळ घेतल अन् बेडरूममध्ये गेलो. तिचा घाम मी स्वतःच्या हातानं पुसून काढला आणि क्षमायाचनेसाठी उत्कटपणे तिचं चुबन घेतल. माझ्या मनातलं वादळ शात झाल...

...तरी गटारगप्पाचा प्रश्न शिल्लक होताच. त्या अफवा बद कशा करायच्या ? लोकांच्या तोडाला कुणी हात लावायचा ? मनात पुन्हा चलबिचल झाली; पण मी मारिओला म्हटलं, 'चल, सैंपाक होईपर्यंत आपण माझ्या दुकानात जाऊन येऊ कदाचित आमचा मालक तुला एखादी छोटीशी नोकरी देईल...'

आम्ही दोघं जिने उतरायला लागलो. मध्येच थाबून मी म्हटल, 'हे बघ, इथं कुणी ओळखत नाही. तुझ्या पूर्वायुष्याची कुणाला माहिती नाहीय. तेव्हा आपण सागू की, गेली दोन वर्षे तू मिलानमध्ये होतास ! आता इथं आलायस...'

'बरं. चालेल मला...'

न चालायला काय झाल ?

'...आणि असं सागू की, तू नोकरीच्या शोधात होतास. चागली नोकरी मिळवून तुम्ही दोघ बहीणभावंडं मला चकित करणार होतात. म्हणून तू मी नसताना घरी येत होतास. नीट लक्षात ठेव ! ...'

आम्ही खाली आलो. आमच्या त्या 'केअरटेकर' बाईच्या खोलीचं दार उघडंच होतं. तरी मी दारावर टकटक केली. मुद्दाम तिची आणि मारिओची ओळख करून दिली...'हा मारिओ. माझा मेव्हणा. नुकताच आलाय मिलानहून. पहिली नोकरी गेलीय. दुसरी शोधायला आलाय. त्याला वाटल, पहिल्या नोकरीत त्यानं भाडण केलं म्हणून मी रागावेन. म्हणून मी नसताना यायचा; पण तुम्हीच सागा, मी रागावेन कशाला ? नसेल पटलं तिथं. आता हा आमच्याकडेच राहणार आहे...'

'हो का ? फार छान–फार छान ! ...'

...छान काय डोबलं !

चार बायकाच्या बडबडीपायी मी निढळाच्या घामान मिळवलेल्या एक हजार लिरा घालवल्या आणि वरती एका चोराला घरात घेतलं !! □

(अल्बर्टो मोराव्हियो या सुप्रसिद्ध इटालियन लेखकाच्या 'मारिओ' या कथेचं स्वैर रूपातर.)

---

## सावरकर समता ज्योतीचा संचार : पृष्ठ १५ वरून

नव्यान चिंतन–मनन घडून आल आहे मुख्य म्हणजे सत्तेशी सबधित असे राजकीय हितसंबंध नसलेले विद्यार्थी–युवक समतेसाठी रस्त्यावर येत आहेत व समतेच्या प्रस्थापनेची त्याची प्रामाणिक इच्छा आहे असा नवा दिलासा या यात्रेतून आम्ही या विषयात जिव्हाळा असलेल्या दलित व दलितेतर बांधवांना देऊ शकलो आहोत.

समताज्योतीच्या निमित्ताने स्वा. सावरकरांचं अत्यंत कालोचित असं पुण्यस्मरण, महाराष्ट्रभर महोत्सवी स्वरूपात घडवून आणण्यातही आम्हाला बरंच यश आलं. सावरकराचा समतेचा सदेश गावोगाव, मुख्य म्हणजे घराघरात पोचविण्याचं काम आता आपल्याला करायचय हे बरोबरच्या विद्यार्थी युवकांना अतिशय प्रभावीपणे पटवून देण्यातही या उपक्रमाची मोलाची मदत झाली असं म्हटलं पाहिजे.

**० यात्रा तर संपली ! तिचा पाठपुरावा कसा करणार ? तुमच्या कोल्हापूरच्या वर्गात त्याबाबत काही ठरल काय ?**

० हा विषय आमच्या कामाचा एक नेहमीचाच भाग असल्यामुळे पाठपुराव्याची कामं स्वाभाविकच होणार आहेत. दलित विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्त्याबाबतची समस्या, काही निवडक गावातले पाणवठ्याचे प्रश्न, काही ठिकाणी दलित विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाचे प्रश्न इ. आम्ही हाती घेणार आहोत. शिवाय नित्याचे उपक्रम आहेतच. या समताज्योतयात्रेबाबतची एक छोटीशी पुस्तिकाही येत्या ९ जुलैला आमच्या स्थापना–दिनी प्रकाशित करण्याचा विचार आहे. बघू या काय काय जमतंय ते ! □

# जोहरा फातिमाची 'साहिल यात्रा'

सध्या भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील वेरावळ ते पणजी या १८४० कि. मी. अंतराच्या किनारपट्टीच्या प्रदेशातून जोहरा फातिमा ही विशीतली बुटकीशी, हडकुळी वाटणारी पण तरतरीत तरुणी आपल्या नऊ साथीदारांसह पायी निघाली आहे. 'कोस्टेक्स १९८२–८५ साहिल यात्रा' असे तिच्या या मोहिमेचे नाव आहे. तिचे नऊ साथीदारही दिल्लीतले विशीतले कॉलेज-तरुण आहेत !

जोहराचा सध्याचा हा अठराशे किलोमीटरचा ट्रेक हा तिच्या कोस्टेक्स मोहिमेचा दुसरा टप्पा आहे. तो १ मेला सुरू झालेला असून एकूण ९२ दिवस चालेल. याआधी तिने डिसेंबर १९८२ मध्ये लखपत ते वेरावळ हा ६०० कि. मी. चा पहिला टप्पा २० दिवसांत पूर्ण केला. ती व तिचे साथीदार हे कॉलेज विद्यार्थी असल्याने त्यांची ही किनारायात्रा टप्प्याटप्प्याने चालली असून ती ७ जुलै १९८५ या दिवशी संपेल ! पूर्वकिनाऱ्यावरचे पोर्ट कॅनिंग हे यात्रासमाप्तीचे ठिकाण असेल. सहा टप्प्यांतली ही पदयात्रा एकूण ३१९ दिवसांची आहे.


दिल्लीच्या किरोरीमल कॉलेजमध्ये बी. ए. च्या पहिल्या वर्षाला असलेल्या जोहराचा भूगोल हा मुख्य विषय आहे. कॉलेज–दिवे जाळून अभ्यास–परीक्षा–उज्ज्वल यश ही मात्र जोहराची मळलेली वाट नाहीये. तिचा विषय तिला तिथेच जाऊन शिकायचा आहे. भरती–ओहोटीच्या वेळी होणारी लाटांची हालचाल, समुद्र–जमीन व हवा यांचा परस्परसंबंध, किनारपट्टीचे पर्यावरण व किनारपट्टीलगत होणारी ढगांची निमितीप्रक्रिया हे तिच्या कोस्टेक्स मोहिमेचे मुख्य निरीक्षणविषय तर आहेतच; पण त्याहीशिवाय किनारपट्टीचा भौगोलिक, पुरातत्त्वशास्त्रीय, मानववंशशास्त्रीय व सामाजिक अभ्यासही तिला करायचा आहे. किनारपट्टीवरचे वनस्पती व प्राणिजीवनही तिला आपल्या सहकाऱ्यांबरोबर जवळून पाहायचे आहे. शिवाय प्रत्येक ५ कि. मी. वरील वाळूचे, खडकांचे व मातीचे नमुने गोळा करून स्तरीकरणाबरहुकूम (स्टॅटिफिकेशन) रॉक चार्टस् बनवणे हाही एक मोठा उद्योग हे लोक करणार आहेत.

जोहराला लहानपणापासूनच धाडसी सफरी करण्याची आवड आहे. सेंट्रल इन्फर्मेशन सर्व्हिसमधून निवृत्त झालेल्या तिच्या फ्री–लान्स लेखक वडिलांचेही तिला सततचे प्रोत्साहन मिळत आले आहे. वडलांबरोबर केलेल्या लांबलांबच्या सफरींमधून तिला अनेक अफलातून मोहिमा सुचत गेल्या. गंगेच्या उगमापासून तिच्या मुखापर्यंत पायी प्रवास करावा असे तिला लहानपणीच वाटायला लागले. एकदा तर काराकोरम पर्वत चढून जायचे तिच्या मनाने घेतले; पण इतक्या लहान वयात जोहराला पाठवणे तिच्या वडलांना जोखमीचे वाटले. बारावीत शिकत असतानाच तिने किनारपट्टीवरच्या मोहिमेची ब्लू प्रिंट तयार केली.

## लखपत ते वेरावळ

भूगोलाची विद्यार्थिनी असूनही कोस्टेक्स मोहिमेचा कच्चा आराखडा तयार करताना जोहराला अनेक अडचणी आल्या. भारतीय किनारपट्टीची एकूण लांबी बहुतेक सर्व नकाशांमध्ये ४००० कि. मी. इतकी दाखवलेली असली तरी प्रत्यक्षात १९८१ सालापर्यंत ती ६०८३ कि. मी. पर्यंत गेली असल्याचे बारकाईने केलेल्या अभ्यासावरून तिच्या लक्षात आले. दिवसेंदिवस होणारी जमिनीची धूप, नव्या भूप्रदेशाची निर्मिती या कारणांमुळे तीत दरसाल आणखी भर पडत चालली आहे. मोहिमेवर निघेपर्यंत समुद्र व जमीन हे दोनच घटक त्यांनी गृहीत धरलेले होते. 'समुद्रकिनारा' हा महत्त्वाचा घटक मात्र प्रत्यक्ष मोहिमेतच त्यांच्यापुढे आव्हान देत उभा ठाकला.

मोहिमेच्या पूर्वार्धासाठी १५,००० रुपयांची गरज होती. तिने आपली योजना थेट पंतप्रधानांपुढेच मांडली. पंतप्रधानांनीही आपल्या निधीतून ५,००० रुपये मंजूर केले. तेवढीच रक्कम शिक्षणमंत्रालयाने दिली व उरलेले ५,००० रुपये देणग्यांतून मिळवावे लागले.



जोहरा – मळलेली वाट सोडून नव्या वाटेच्या शोधात...

◻

मुळात मोहिमेचा नकाशाच उपलब्ध नसल्याने सगळ्यात आधी तो तयार करण्यावर बरेच कष्ट घ्यावे लागले. या कामी नेव्हलकमांडर रेखी व कॅप्टन सावदेकर या कच्छमध्ये राहून आलेल्या नौसेना-अधिकाऱ्यांनी मोलाच्या सूचना केल्या. विशेषतः कच्छच्या रणाची भयानकता त्यांनी गटाच्या निदर्शनाला आणून दिली.

१९८२ च्या उन्हाळ्याच्या सुट्टीत पूर्वकिनाऱ्यावरच्या पोर्ट कॅनिंगपासून या साहिलयात्रेला सुरुवात करण्याचे आधी ठरले होते; पण त्या वेळी पुरेसे पैसे जमले नव्हते व आय. टी. डी. सी. च्या अरुण विश्वास या अधिकाऱ्याने बंगालच्या उपसागरात उन्हाळ्यात उठणाऱ्या लाटा धोकादायक असतात म्हणून मार्ग बदला असा सल्ला दिल्याने पूर्वेकडून पश्चिमेकडे असा मार्गबदल करावा लागला.

सरकारी अधिकाऱ्यांकडून आम्हाला फारशी मदत होत नसल्याची तक्रार जोहराने केली आहे. 'दिल्लीतल्या गुजरात माहिती केन्द्राला आम्ही आमच्या मोहिमेची माहिती दिली होती. आकाशवाणीच्या भूज केन्द्राने ती प्रसारित केली व गुजरातमधल्या खेड्यापाड्यातल्या लोकांनी 'दर्याकांते प्रवासी आवे छे' असे म्हणत आमचे स्वागत केले, असे जोहराने सांगितले. तिच्या या तुकडीचे सर्वत्र प्रेमभराने स्वागत झाले. 'शहरी बकालपणा व कुसंस्कार कुठेही आढळले

नाहीत. भांडणे, मारामाऱ्या, खून, दरवडे, बलात्कार तर इकडे घडतच नाहीत असे लखपत इथल्या पोसलीअधिकाऱ्याने आम्हाला सांगितले तेव्हा आम्ही थक्कच झालो !

### शिस्तबद्ध, स्फूर्तिदायक !

लखपत ते वेरावळ या पदयात्रेत या तरुणाना वेरावळपासून साडेतीन कि. मी. अंतरावर एका प्राचीन बंदराचे अवशेष सापडले. समुद्राकडे उतरत जाणाऱ्या पायऱ्याही तिथे असल्याचे त्याना आढळले. एके काळी या ठिकाणी एखादे गजबजलेले बंदर असावे असे त्याचे म्हणणे आहे. तसेच लखपतपासून १५ कि. मी. वर कोडियानी या ठिकाणी एका जुन्या राजवाड्याचे अवशेष त्यांच्या शोधक नजरेस पडले. हा राजवाडा १७ व्या किंवा १८ व्या शतकातला असावा. तसेच देजाडी या लखपतच्या पुढे ६६ कि. मी. वर असलेल्या ठिकाणी त्यांना मोहेंजोदडोच्या धर्तीचे प्राचीन नगर-अवशेष मिळाले. तिथेच एक कुंडही सापडले. इथल्या लोकांची नावे जोखा-ओखा अशी दोन अक्षरी कठीण व्यंजनाची आहेत. लखपतजवळ त्यांना जिप्समचे साठेही सापडले

पोरबंदरजवळच्या किनाऱ्यावर जोहराला व रामन या तिच्या साथीदाराला निळा प्रकाश फेकणारी वाळू आढळली. तो दिवस व ती वेळही जोहराच्या चांगली लक्षात आहे भाभा अणुसंशोधनकेन्द्राने या वाळूचा अभ्यास सुरू केला आहे. चोरवाड इथल्या हॉलिडे रिसॉर्टजवळच्या किनाऱ्यावर अनेक लोकाचे जे बुडून मृत्यू झाले त्याचे भौगोलिक कारण शोधून काढले तेव्हाही तिला व तिच्या सहकाऱ्यांना श्रमाचे सार्थक झाल्यासारखे वाटले असणार.

'पण सगळ्यात महत्त्वाची माहिती मिळाली ती भरतीच्या लाटांचा अभ्यास करताना' जोहरा म्हणते, 'भरती येते तेव्हा पाणी वाळूखालच्या रंध्रांमधून शिरत येतं. अशा वेळी वाळूत पडून राहिलं की,

### कोटेक्स १९८२–८५ मोहीम

| टप्पे | अंतर | कालावधी |
|---|---|---|
| १. लखपत ते वेरावळ | – ६०० कि मी. | – १-१२-८२ ते २०-१२-८२ |
| २. वेरावळ ते पणजी | – १८४० कि. मी. | – १- ५-८३ ते ३१- ७-८३ |
| ३. पणजी ते कॅन्नानोर | – ३०० कि. मी | – १९८३ चा हिवाळा (१५ दिवस) |
| ४. कॅन्नानोर ते नेल्लोर | – १८४० कि. मी | – १- ५ ८४ ते ३१- ७-८४ |
| ५. नेल्लोर ते विशाखापट्टणम् | – ३०० कि. मी. | – १९८४ चा हिवाळा (१५ दिवस) |
| ६. विशाखापट्टणम् ते पोर्ट कॅनिंग | – १३६० कि. मी. | – ७- ५ ८५ ते ७- ७ ८५ |

डोक्याला खालून थपडा बसायला लागतात. पाणी वाळूला वर धक्के देतं. शांत असलेला समुद्र हळूहळू रौद्रस्वरूप धारण करू लागतो.'

मोहिमेची प्रत्येक सकाळ राष्ट्रध्वज उभारून होते. मग 'जनगणमन', 'सारे जहांसे अच्छा' व 'वंदे मातरम्'. ते झाल्यावर मातृभूमीचे चुंबन घेऊन कोस्टेक्स मोहिमेची निशाणी रोवून देशाच्या सुरक्षिततेसाठी व मोहिमेच्या यशस्वितेसाठी प्रार्थना. हे सगळे सोपस्कार झाल्यावरच पुढचे पाऊल उचलले जाते. मग सकाळचे जेवण. दुपारी पायपीट. संध्याकाळी पुन्हा सकाळची पुनरावृत्ती. असे सगळे शिस्तबद्ध, स्फूर्तिदायक. शक्यतो किनारा सोडायचा नाही हा दंडक; पण कुठेकुठे दलदलीमुळे बोटीतून प्रवास. किनाऱ्यालगतच प्रवास करण्यावर कटाक्ष. कोटेश्वर ते जाखा व वसई ते ओखा हा प्रवास बोटीतून करावा लागला.

कोस्टेक्स मोहिमेचा सगळा प्रवास तंबूशिवाय चालतो. रात्री ते जवळच्या गावाचा आसरा घेतात. त्यामुळे पायपिटीत थोडी भर पडते एवढेच. रोज सरासरी २० कि.मी. चालणे होते किनारपट्टीवरच्या लोकजीवनाबद्दल बोलताना जोहरा म्हणते, 'सर्वत्र गरिबी असली तरी मनाची श्रीमंती शाबूत आहे. बाजरीची भाकरी हा मुख्य आहार. कच्छी बायकांना स्वैंपाकात फारशी गती नाही. मासे उदंड असले तरी लोक ते खात नाहीत. कोंबड्याही तुरळक आढळतात. डुकरे फक्त एका ठिकाणी दिसली. अंड्याचा भाव नगाला दोन रुपये ! जमीन सुपीक असली तरी लोक भाजीपाला पिकवीत नाहीत. फक्त सीमा सुरक्षा दलाचे जवान काय ते भाजीपाला करतात. पावसाचे प्रमाण फारच अल्प. तळी खोदून पावसाचे पाणी त्यात साठवायचे आणि तेच वर्षभर पुरवून वापरायचं. काही काही ठिकाणी तर सात-सात वर्षे पाऊस पडलेला नाही ! कच्छमध्ये किनाऱ्यालगत अनेक दर्गे व पीर आहेत आणि आश्चर्य म्हणजे प्रत्येक दर्ग्याजवळ, पिराजवळ जिवंत पाण्याचे झरे आहेत !'

एवढ्या खडतर प्रवासाचे कष्ट तुला कसे काय झेपतात असं जोहराला विचारल तर ती म्हणते, 'उलट मी पुरेपूर एंजॉय केलं. कधीकधी तर उपाशीपोटीच पायपीट व्हायची, तरी पण माझा धीर कधी खचला नाही किंवा मोहिमेतली गोडी कमी झाली नाही. आमचा मोहिमेचा पहिला टप्पा संपला तेव्हा तर माझं वजन किलोभर जास्तीच भरलं !'

—मुकुंद सोमणी

( 'कॅराव्हान' वरून )

## पुस्तके

# मार्गदर्शक, अस्वस्थ करणारे अनुभव – ' संकल्प '

१९६७ च्या आसपास महाराष्ट्रात अनेक तरुण सामाजिक कार्यात उतरले. आज पंधरा वर्षांनंतर यातले काही चिकाटीने टिकून आहेत, तर काही अर्ध्या वाटेवरून परत फिरले आहेत. नवीन मार्ग शोधणारे अनेकजण अंधारात चाचपडत आहेत. आपले चाकोरीबद्ध सुरक्षित जीवन सोडून देऊन सामाजिक कार्यात खेचले जाण्याची प्रेरणा कोणती होती ? कोणत्या क्षणी आपण या वेगळ्या वाटेअर येऊन दाखल झालो ? या प्रकारचे प्रश्न स्वतःलाच विचारून स्वतःच त्याची वस्तुनिष्ठ उत्तरे देणे, त्रयस्थाच्या भूमिकेतून आपण केलेल्या कार्याचे परखड मूल्यमापन करणे ही गोष्ट म्हणावी तेवढी सोपी नाही. सामाजिक चळवळीतील तरुणांच्या जाणिवांचा शोध घेण्याचा डोळस प्रयत्न गेल्या पंधरा वर्षात कोणी केला नाही. ' ग्रंथाली ' परिवारात नव्यानेच दाखल झालेल्या संजीव खांडेकरने (विजय तेंडुलकरांच्या प्रेरणेने ?) हा प्रयत्न केला. त्यातूनच ' संकल्प ' हे सध्या सर्व थरांतील तरुणांना अस्वस्थ करणारे पुस्तक तयार झाले. तसे पाहिले तर या तरुणांनी केलेल्या वेगवेगळ्या प्रयोगांचे मूल्यमापन वेळोवेळी झालेले आहे; परंतु एकत्रित असे मूल्यमापन प्रथमच होत आहे. म्हणूनच ' संकल्प'चे महत्त्व.

'संकल्प'ची विभागणी तीन भागात केलेली आहे. पहिल्या भागात निरनिराळ्या ठिकाणी व निरनिराळ्या संघटनांतून सामाजिक परिवर्तनासाठी लढणाऱ्या कार्यकर्त्यांनी आपली मनोगते लिहिली आहेत. दुसऱ्या भागात चळवळीतून काम करणाऱ्या कार्यकर्त्यांसह इतरांची निरीक्षणे आहेत. तिसऱ्या विभागात आहे म्हैसाळच्या मधुकरराव देवल यांची मुलाखत.

' संकल्प 'मधील मनोगतांचा भाग हा सर्वात महत्त्वाचा. आपले सुरक्षित आयुष्य सोडून देऊन सामाजिक कार्याची वेगळी वाट स्वीकारणारे संख्येने कमीच. तसेच ठराविक काळानंतर वस्तुनिष्ठ आत्मपरीक्षण करणारे अपवादात्मक, अशा सामाजिक कार्यकर्त्यांना लिहितं करणं ही कसोटी कठीण. संजीव खांडेकरसारख्या स्वतः संभ्रमात सापडलेल्या एका कार्यकर्त्याने ही कसोटी यशस्वीपणे पार पाडली.

' संकल्प 'मधील आत्मनिवेदनांमध्ये सामाजिक कार्यकर्त्यांनी निवेदित केलेले काही अनुभव व त्या अनुषंगाने उपस्थित केलेले प्रश्न हे विशेष महत्त्वाचे आहेत. त्यांची तीव्रता ही आजही कमी झालेली नाही. यासाठी केवळ परीक्षणात्मक दृष्टीने संकल्पकडे न पाहता त्यातील काही प्रश्नांची चर्चा करावीशी वाटते.

कोणालाही सामाजिक कार्यात ओढणाऱ्या ज्या अनेक प्रेरणा असतात, त्यातील एक महत्त्वाची प्रेरणा म्हणजे ' तत्त्वप्रणाली '. प्रत्येकाला कोणत्या ना कोणत्या तरी वादाचे, विचारांचे आकर्षण असते. गेल्या पंधरा वर्षात महाराष्ट्रात सामाजिक कार्यात उतरणाऱ्या तरुणांवर मार्क्सवादाचा पगडा दिसून येतो; परंतु सिद्धांत-कल्पना कोठपर्यंत ताणायची याचे भान राहत नाही यातून पोथीनिष्ठपणा वाढतो व कार्याकडे दुर्लक्ष होते. याचा उल्लेख समाजवादी युवक दलाच्या पार्थ पोळकेने केला आहे. (पान ६३)

समविचारी सवर्ण कार्यकर्त्यांबरोबर काम करताना दलित कार्यकर्त्यांचा होणारा कोंडमारा पार्थ पोळकेने नेमक्या शब्दात मांडला आहे. तो म्हणतो, ' त्यांच्या निष्ठांविषयी संशय येत नाही; परंतु कृतीच्या पातळीवर त्यांच्याबरोबर फरफटत जावे लागते. ' हेच मत वेगळ्या शब्दांत श्रमिक संघटनेच्या वाहरू सोनवणे याने व्यक्त केले आहे. शहरी मध्यमवर्गीय कार्यकर्ते कितीही म्हणाले तरी पूर्णपणे वर्गविहीन (डी. क्लास) होऊ शकत नाहीत हा वाहरूचा अनुभव आहे.

स्वीकारलेली तत्त्वप्रणाली जशीच्या तशी अमलात आणताना प्रत्यक्ष व्यवहारात अडचणी येतात, तडजोड करावी लागते. याची स्पष्ट कबुली डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी आपल्या लेखात दिली आहे. पुरेशा वैचारिक तयारीअभावी शेतमजुरांची संघटना बांधण्याचा आपला प्रयत्न कसा फसला याची हकीकत त्यांनी सांगितली आहे (पान ६). तसेच सुशिक्षित मध्यमवर्गीय कार्यकर्त्यांची चळवळीत होणारी ओढाताण त्यांनी स्वानुभवाने कथित केली आहे.

युवक क्रांतिदल ते लोकदल असा प्रवास करणाऱ्या डॉ कुमार सप्तर्षीचे प्रदीर्घ आत्मनिवेदन हे चळवळीत उतरू पाहणाऱ्या शहरी मध्यमवर्गीय युवकांना विशेष मार्गदर्शक ठरावे. त्यांच्या व्यक्तिगत जीवनातील स्थित्यंतरे कुमारपेक्षा वेगळी नसतात. महाविद्यालयांत असताना निवडणुकांचे आकर्षण असते वादसभा, वाङ्मयमंडळे गाजवावीशी वाटतात. चार टाळकी एकत्र करून अभ्यासमंडळे चालविली जातात. यातून ' जोडी ' जमण्याची इच्छा असतेच. व्यवस्थेच्या विरोधात उभे राहणाऱ्या, बंडखोरी करणाऱ्या या युवकांना आजही, चौकटबद्ध जीवन जगणाऱ्या पालक मंडळींशी सामना द्यावा लागतो. एकीकडे ' करिअर ' संभाळत व्यवस्थेशी झगडा चालू ठेवावा लागतो. गेल्या दहा वर्षात महाराष्ट्रातील विद्यार्थी आंदोलनात युक्रांदने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे त्या दृष्टीने युक्रांदच्या स्थापनेत सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांचे मनोगत महत्त्वाचे.

' रचनात्मक ' काम की ' संघर्षात्मक ' काम हे द्वंद्व म्हणजे एक वरवरचा गुंता आहे, असे आदिवासींमध्ये काम करणाऱ्या जगदीश गोडबोले यांचे मत आहे. कोणत्याही ' दलाचा ' अथवा ' शाखेचा ' पगडा गोडबोले यांच्या मनावर नाही. वेगवेगळ्या ठिकाणची आदिवासींमधील कामे पाहून, आदिवासींचे कोणते प्रश्न हाती घ्यावेत याविषयी निश्चय होत नव्हता; पण ' चिपको ' आंदोलनाच्या अभ्यासानंतर सर्व ' वादांना ' जोडणारा व मुख्यतः स्वतःच्या वृत्तीला झेपेल असा सूर सापडत असल्याची जाणीव गोडबोले यांना आहे.

परिवर्तनाचे कार्य करणाऱ्या बाह्य व्यवस्थेशी झगडताना स्वतःभोवतीच्या व्यवस्थेशी झगडा द्यावा लागतो. त्यांचा लढा हा दोन पातळ्यांवरचा असतो. कौटुंबिक व

सामामिक व्यवस्थेला चिकटून राहणाऱ्या व आपल्या मुलानेसुद्धा त्याच व्यवस्थेचा एक घटक म्हणून राहावे यासाठी धडपडणाऱ्या घरातील वडीलधाऱ्यांना समजावण्याचा प्रयत्न करणे, प्रसगी मायेचे पाश तोडून त्याच्यापासून बाजूला होणे याचे अनुभव-कथन वेगवेगळया कार्यकर्त्यांनी 'सकल्प' मध्ये केले आहे. लोकविज्ञानाच्या प्रेरणा राणेचे अनुभव त्याच पठडीतील; परंतु स्त्री-मुक्तीसाठी औद्योगिक वर्तुळात तिने एकाकी-पणे दिलेला लढा अस्वस्थ करणारा. याबाव-तीतली काही वाक्ये लक्षात राहतात. सगळी परिस्थिती विचित्र होत चालली होती. कामगाराची परिस्थिती पाहून आपण इथे राहिले पाहिजे असे वाटत होते. स्वत च एक्सप्लॉयटेशन सहन होतं नव्हतं. आपण स्त्री म्हणून जन्माला येण्यात गुन्हा केला की स्त्री असून इंजिनिअर होण्याचा गुन्हा केला, या प्रश्नाचं उत्तर मी शोधत होते. (पान ६७)

डॉ. नीलम गोऱ्हे (क्रातिकारी महिला संघटना) दीनानाथ मनोहर व विश्वास काकडे (श्रमिक संघटना) शारदा साठे (लाल निशाण पक्ष) सुभाष जोशी (देव-दासी मुक्ति चळवळ), सुनील तांबे (समता युवा सघटना) व सुहास पराजपे (मागोवा गट) या सर्वांची मनोगते मनमोकळी व विचार करावयास लावणारी आहेत.

दलितांच्या सहकारी शेतीचा प्रयोग गेली वीस वर्षे म्हैसाळ येथे चालू आहे. दलित प्रश्नाचा गुता सोडविण्यासाठी अनेकजण म्हैसाळकडे बोट दाखवितात. हा प्रयोग चालविणारे मधुकरराव देवल हे मूळ संघाचे कार्यकर्ते. स्वातंत्र्योत्तर काळात संघाने रचनात्मक कार्यावर भर द्यावा असे देवला-सहित काही संघकार्यकर्त्यांना वाटत होते; परंतु कर्मठ हिंदुत्ववाद्याचा त्या वेळी संघावर पगडा असल्याने हे शक्य झाले नाही. १९७७ नंतर हा विचार पुन्हा एकदा बळावला. आदर्श रचनात्मक कार्य म्हणून सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांनी म्हैसाळ प्रकल्पाचा प्रत्यक्ष भेटीत गौरव केला. म्हणून देवलांच्या मोकळया मुला-खतीचे महत्त्व.

वसंत पळशीकर, अविनाश सप्रे, म. द. हातकणंगलेकर, कुमार केतकर, लक्ष्मण माने याच्या निरीक्षणापैकी अविनाश सप्रे व कुमार केतकर याची निरीक्षणे ही वास्त-वाच्या जवळची. तसेच सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्यामध्ये असलेली भरीव नेतृ-त्वाची उणीव वसंत पळशीकर यानी निदर्श-नास आणली-आहे. रचनात्मक व संघर्षात्मक अशी दोन्ही प्रकारची कार्ये जवळून अभ्यासणारे 'माणूस'कार श्री. ग. माजगाव-कर किंवा सातत्याने माणसाचा शोध घेत फिरणारे विजय तेडुलकर यांच्याही निरी-क्षणांचा समावेश करता आला असता तर 'संकल्प'च्या प्रयोगाची यशस्विता आणखी वाढली असती

एका दिवाळी अकानिमित्त जमविलेल्या साहित्याचे स्थायी मूल्य लक्षात घेऊन दिवाळी अंकाबरोबरच त्याचे पुस्तकात रूपातर करण्याचे 'ग्रंथाली'ने ठरविले परिणामी एका चागल्या पुस्तकाची निर्मिती झाली.

आजपर्यंत महाराष्ट्रात जे समाजपरि-वर्तनाचे प्रयत्न झाले व यापुढेही जे प्रयत्न होत राहतील त्याना निश्चित स्वरूप प्राप्त होण्यासाठी 'सकल्प'सारख्या आणखी काही पुस्तकाच्या निर्मितीची गरज आहे. सामाजिक कामामध्ये कार्यकर्त्यांव्यतिरिक्त स्थानिक जनतेचा सहभाग किती असतो? स्थानिक लोकांना या कामाबद्दल काय वाटते? आपल्या देशाच्या एकूण लोकशाही रचनेत सामाजिक कामांचे महत्त्व कोणते? यासारख्या अनेक प्रश्नाची चर्चा सविस्तरपणे होणे आवश्यक आहे.

ग्रामीण भागात काम करणाऱ्या स्वयसेवी संघटनासाठी एक समान व्यासपीठ तयार व्हावे या उद्देशाने ७४ साली पुण्यात 'ग्रामायन' या सस्थेची स्थापना झाली. ग्रामीण विकासाशी संबंधित विषयावर मेळावे भरवून 'ग्रामायन'ने चर्चा घडवून आणली. या एकत्रित येण्याने काही प्रक-ल्पाना चागली चालना मिळाली. ग्रामीण विकास व समाजपरिवर्तन यासाठी चाल-णाऱ्या प्रयत्नाना स्थिरता आणण्यासाठी, त्याच्या योग्य मूल्यमापनासाठी ग्रामायन व ग्रंथालीने एकत्र येऊन काही सामाजिक महत्त्वाच्या पुस्तकांच्या निर्मितीचे प्रकल्प आखावेत.

साहित्यिक व्यासपीठे सर्वत्र भरपूर आहेत; पण 'सामाजिक' व्यासपीठाची कमतरता आहे. रशियन क्रातीविषयी तासभर भाषण ठोकणारे शेतकरी आदोलनावर पाच मिनिटेही बोलू शकत नाहीत, ही वस्तु-स्थिती आहे. यामध्ये बदल होण्यासाठी सामाजिक विषयांवर वेळोवेळी चर्चा घड-वून आणाव्या लागतील

दिवसेंदिवस आत्यंतिक सत्तावादी बनत चाललेल्या राजकीय संस्कृतीने सामाजिक संस्कृती निष्प्रभ बनविली आहे. 'राजकीय पक्ष हे व्यवस्थेच्या विरोधात खबीरपणे उभे राहू शकत नाहीत. मूलभूत परिवर्तन हे पक्षीय राजकारणापासून दूर राहणारे गटच करू शकतात.' यावर ज्याचा विश्वास होता तेच तरुण 'परिस्थिती'च्या रेट्यापुढे भूमिसेना, 'श्रमिक सघटना' यांसारखे छोटेछोटे गट टिकणार नाहीत असे म्हणत राजकीय पक्षाच्या आश्रयाला गेलेले दिस-तात! या संभ्रमित तरुणाना 'संकल्प' मार्गदर्शक ठरावे.

—रमेश दिघे


मांडणी, विचार व देखणेपणा या साऱ्यातच 'उत्तम' असे म्हणता येईल असे हे पुस्तक आहे.

—प्र. भा. भोसले
संपादक, बळीराजा मासिक

# योद्धा शेतकरी

ले. विजय परुळकर

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

मूल्य : ३६ रुपये

## रंगभूमी

# नाट्यपंढरी

**लाल, पांढऱ्या नि क्वचित् निळसर कमळांनी मढलेले कमळांचे तळे पाहिले की, आपल्याला काही आगळाच आनंद होतो. क्षणभर आपण आपल्यालाच हरवून बसतो. तेथून दूर आलो जरी त्या आनंदाची सावली आपली साथ करीतच असते.**

**मराठी रंगभूमीच्या नंदनवनात अशी अनेक फुले फुलली आहेत की त्यांचा दरवळ मराठी मनाला, गेली शे-दीडशे वर्षं सतत सुखवीत आहे. उगीच का मराठी रंगभूमीला केशराचे शेत म्हणतात? या ना त्या नात्याने रंगभूमीची सेवा करणारी अशी शेकडो कलावंत मंडळी आहेत की, ज्यांच्या वाटचालीत, कळत–नकळत, मौजेचे, सुखदुःखांचे, आनंदाचे अनेक प्रसंग येऊन गेले आहेत. अशा काही प्रसंगांची, नट–नाटककारांची, कथाकारांची आठवण करून देण्याचा, ती स्मृतिसुमने रसिकांच्या ओंजळीत टाकण्याचा विशेषतः ती भावबंध तरुण पिढीपर्यंत पोचविण्याचा मानस आहे. हा रंगभूमीचा इतिहास नाही, खऱ्याखोटयाचा काथ्याकूट नाही, आहे तो केवळ स्मृतिगंध !**

### वंदन विष्णुदासा

तसे पाहिले तर विष्णुदास भावे यांचे 'सीतास्वयंवर' आख्यान रंगभूमीवर येण्यापूर्वी तंजावरच्या भोसलेराजांनी 'लक्ष्मीनारायण कल्याण' नावाचे नाटक लिहिले होते. कोकणात खेळे, दशावतार, कर्नाटकात यक्षगान असे काही नाट्यसदृश प्रकार प्रचलित होते. भारूड, ललित ही तर ज्ञानेश्वर–एकनाथांच्या वेळीही होती; पण खऱ्या अर्थाने ते नाटक नव्हते. विष्णुदासी नाटक जन्माला येण्याआधीच्या त्या प्रसूतिवेदना होत्या. नाटकाच्या जवळपास येणारी ती नाटकाची रूपडी होती.

प्रथम भाव्यांनी सोंगे सजविली, उभी केली. रंगरंगोटी करून, विदूषक, देव, राक्षस अशी पात्रे त्या त्या वेषात आख्यानानुसार रंगमंचावर येऊ लागली. पडदा आला, देवांची कचेरी (सीन), राक्षसांची कचेरी, असे प्रवेश आले, सूत्रधार आला. नाटकाची सारी मदार सूत्रधारावर ! सारं काही तोच बोलणार, तोच गाणार. बाकीच्या पात्रांनी कथानकाच्या संदर्भात थोडेसे भाषण, काही हालचाली करायच्या इतकेच. सगळीच नाटके पौराणिक असल्याने प्रेक्षकांना ती कथाकीर्तन नि पुराणातून तोंडपाठ झालेली असायचीच.

### भाव्यांचे नाटकसुद्धा लंडनला जाणार होते; पण–

आज घाशीराम, गगनभेदीसारखी नाटके साता समुद्रापलीकडे जाऊन आली ना, अगदी तसेच भाव्यांचे सीतास्वयंवर जाणार होते. मुंबईच्या स्वारीत (दौऱ्यात) भाव्यांनी मोठ्या जिद्दीने साहेबाच्याच सुसज्ज ग्रँटरोड थिएटरात, त्यांच्याच रंगमंचावर त्याच दिवेबत्त्यांत आपल्या नाटकाचा खेळ करून दाखविला. म्हणतात की, पाचशे रुपये भाडे भरले होते एका खेळासाठी. थोरामोठ्यांची खूप गर्दी होती. खेळाला गव्हर्नरसाहेब हजर होते. प्रयोग पाहून गव्हर्नरसाहेब एकदम खूष झाले. भाव्यांना भेटून त्यांनीच सुचविले नि सुपारीसुद्धा दिली लंडनला खेळ करून दाखविण्याची !

पण परदेशी जाणे म्हणजे अब्रह्मण्यम्चा काळ होता तो ! (१८५३–५४ चा सुमार) धर्म बुडेल म्हणून विष्णुदासांनी नकार दिला. काय करणार? खूप सोसले होते त्यांनी. नटाचे तोंड पाहिले तर आंघोळ करीत असत. नाटक केले म्हणून त्यांना नि त्यांच्या सहकाऱ्यांना सांगलीत भर पंक्तीतून उठविले होते !

आता 'ही श्रींची इच्छा' या नाटकाचा पेशव्यांच्या पुण्यात, खुद्द शनिवारवाड्यात प्रयोग झाला, तसा विष्णुदासांच्या सीतास्वयंवरचा मिथिलेत किंवा अयोध्येत खेळ झाला की नाही हे मात्र माहीत नाही !

विष्णुदासांनी सीतास्वयंवर, पारिजात, द्रौपदीस्वयंवर, कीचकवध अशी तीस-पस्तीस नाट्याख्याने रचली. त्यांच्या नाटकांची परंपरा पुढे अनेक वर्षं चालली. नाही तरी परवाचे नाटक कालच्यापेक्षा नि कालचे आजच्यापेक्षा जुनेच ठरते. अण्णा किर्लोस्करांपेक्षा भावे जुने व खाडिलकरांपेक्षा अण्णासाहेब जुनेच नाही का? पण खरे म्हणजे नाटकात नव्या–जुन्याचा वाद नसतोच. सुसंवादच असतो. जे नाटक आवडते ते नवे. आवडत नाही ते जुने.

एवढं मात्र खरं की, विष्णुदासांनी खऱ्या अर्थाने अस्सल मराठी नाटक उभे केले. विष्णुदास हे एक बहुढंगी व्यक्तिमत्त्व होते, म्हणूनच त्यांच्या हातून नाटक घडले. ते स्वतः आख्यानकार कवी होते, चित्रकार होते. कळसूत्री बाहुल्यांच्या खेळात तरबेज होते. कवित्व, कुंचला नि रंग यांच्या बळावर ते सोंगे सजवू शकले, नाटकांचे खेळ सिद्ध करू शकले; पण गंमत अशी की, खुद्द विष्णुदासांनी मात्र कधी तोंडाला रंग लावला नाही ! नाट्यरंगी रंगले नि मराठी माणसाला नाटकाचा निखळ आनंद दिला. मराठी रंगभूमीच्या या जनकाला विनम्र अभिवादन !

**–गोपाळ जोशी**

चित्रपट


# बावळट नाम्याची चटपटीत धमाल!

कोणत्याही चित्रपटाचा साचा व्हायला लागला की, त्या चित्रपटाचं यशापयश कथेच्या मांडणीवर ठरत असतं. बुवाबाजी, बावळट हिरो, चलाख हिरॉइन, एकदोन खून अशा मसाल्याचे चित्रपट हिंदी आणि मराठीत भरपूर होते आणि भरपूरं आहेत. अशातच 'गोष्ट धमाल नाम्याची' या चित्रपटाची आणखी भर पडली आहे. कथानक नेहेमीचंच असूनही हा रहस्यमय विनोदी चित्रपट चांगलाच उठावदार झालेला आहे.

कदाचित रहस्यपट विनोदी असला तर त्याची खुमारी जास्त वाढत असावी.

चित्रपटातला विनोदही कशा तऱ्हेनं प्रेक्षकांपर्यंत पोचवला जातो हे पहाणंही महत्त्वाचं असतं. राजा गोसावी, राजा परांजपे, धुमाळ आणि दादा कोंडके या प्रत्येकाची विनोद पेश करण्याची स्वतःची लकब होती. अशोक सराफनं गेल्या दोन वर्षांत आपल्या विनोदासाठी मोठा प्रेक्षकवर्ग निर्माण केला आहे.

'गोष्ट धमाल नाम्याची' मधला नाम्या बावळट आहे. त्याची प्रेयसी शकू (जयश्री टी.) चलाख आहे. नाम्याच्या मानलेल्या बहिणीचा खून, ज्ञानानंदबुवांनी चालवलेला मुलींचा व्यापार ह्या काळचा धंद्याची 'नाम्याने (अशोक सराफ) शकूच्या मदतीनं केलेली उकल अशी या चित्रपटाची सामान्य कथा आहे. शाब्दिक विनोदही फारसे चांगले नाहीत. एकदम किरकोळ विनोद करून प्रेक्षकांना हसवत ठेवण्यात मात्र दिग्दर्शक-लेखक यशस्वी ठरले आहेत. प्रेक्षकांना हसवण्यासाठी त्यांना दादा कोंडकेसारखी अश्लीलता आपल्या चित्रपटात आणावी लागलेली नाही.



अशोक सराफ
नाम्याच्या भूमिकेत फिट्ट !

दादा कोंडकेच्या चित्रपटांनी विनोदी मराठी चित्रपटांचा जमाना जसा सुरू केला तसा संपवलाही. सोंगाड्या, पांडू हवालदार यासारख्या निखळ विनोदी चित्रपटांनंतर विनोदाच्या नावाखाली दादा कोंडकेंनी तमाशातली अश्लीलता पडद्यावर आणली आणि तिथंच खरा विनोदी मराठी चित्रपट संपला! ॲक्शन कॉमेडी आणि डायलॉग कॉमेडी ही या चित्रपटांची खरी ताकद; पण दादांनी द्व्यर्थी गाणी आणि तसेच हावभाव चित्रित करून आपल्या चित्रपटांचा तमाशा करून टाकला! दादांना कॉमेडी हा प्रकार चांगला कळलेला असूनही त्यांनी त्याचा चांगला वापर करून घेतला नाही आणि त्यांच्या चित्रपटाबद्दलचा प्रेक्षकांचा उत्साह कमी व्हायला लागला.


अशोक सराफच्या आगमनानं ही मरगळ थोडीशी झटकली जायला लागली. ॲक्शनच्या जोरावर प्रेक्षकांना हसवणाऱ्या अशोक सराफला द. मा. मिरासदारांच्या कथांवरचे चित्रपट मिळायला लागले. शाब्दिक विनोदांना अशोक सराफच्या 'ॲक्शन कॉमेडीची' साथ मिळाली.

'गोष्ट धमाल नाम्याची' हा चित्रपटही द. मा. मिरासदारांच्या कथेवर आधारित. कॅमेरामन गिरीश कर्वे वगळता दिग्दर्शक गिरीश घाणेकरांपासून ते अगदी आर्ट डायरेक्टर गुरुजीबंधूंपर्यंत सगळेच या क्षेत्रात नवखे; पण चित्रपटातली सफाई जबरदस्त!

गिरीश घाणेकरांचा अनुभव जाहिरात चित्रपट करण्याचा. श्याम बेनेगलबरोबर काही वर्षे या क्षेत्रात काम करता करता घाणेकरांवर बेनेगलच्या कलात्मक दृष्टीचे परिणाम होणं स्वाभाविक आहे. 'जाहिरात फिल्म्स' साठी लागणारा चटपटीतपणा, दोन तासांत सांगायची गोष्ट एका मिनिटात प्रेक्षकांच्या मनात घुसवायची खुबी हे सारं कसब जाहिरात फिल्म्स बनवणाऱ्याकडेच असू शकतं. साहजिकच अशा माणसानं चित्रपट काढल्यावर तो गतिमान असणं आणि (glossy) असणंही स्वाभाविक आहे.

## ॲनिमेशनची धमाल

पण जाहिरात फिल्म आणि चित्रपट याकडे पहाण्याचा घाणेकरांचा दृष्टिकोन किंवा विषयाला हात घालण्याची पद्धत खूपच वेगळी आहे हे 'गोष्ट धमाल नाम्याची' पाहून लक्षात येतं. जाहिरात फिल्ममधली स्वप्नमय सृष्टी किंवा ज्याला ड्रीम सिक्वेन्स म्हणतात तो या चित्रपटातही येतो आणि हा ड्रीम सिक्वेन्सच फक्त Glossy असतो. बाकी चित्रपट सर्वसामान्यांचा असतो. इतर चित्रपटातली स्वप्नदृश्यं केवळ भडक आणि भपकेबाज असतात. हा भडकपणा भपकेबाजपणा टाळूनही नाम्याला पटणारी स्वप्न घाणेकरांनी सुरेख टिपली आहेत. सांगकाम्या नाम्याची स्वप्नं पराक्रम करण्याची. मग शिवाजीमहाराजांचे एक दृश्य, खानाची लढाई, खानाशी तलवारीचे दोन हात करणारा नाम्या... हे बघता बघता घाणेकर आपल्याला वास्तवात आणतात. तेव्हाही नाम्या स्वप्नातच असतो. भराभर तलवारीचे हात चालवत असतो अन् वास्तवात आलेले प्रेक्षक पहात असतात ते दृश्य पोट धरून हसवणारे असते.



बावळट नाम्या, चलाख शकू

संपूर्ण चित्रपटात घाणेकरांनी नाम्याचे स्वप्न आणि वास्तव परिस्थिती यांच्यात सलगता साधलेली आहे. एक दृश्य संपल्यावर एकही फ्रेम कोरी न जाता दुसरं दृश्य आपण पाहू शकतो तरीही त्यात सलगता असते. ठिगळं जोडण्याचा प्रकार नसतोच.

अशोक सराफ, जयश्री टी. चा हा प्रमुख भूमिका असलेला पहिला मराठी चित्रपट. जयश्री टी. (शकू) डान्सर म्हणून या क्षेत्रात शिरली. हिंदी चित्रपटात ती कायम डान्सर म्हणूनच राहिली; पण या चित्रपटात ती हिरॉइन म्हणून आली आणि तिनं काम चक्क चांगलं केलं; पण या चित्रपटातही तिच्या नावांचा, क्वचित देहप्रदर्शनाचा उपयोगही घाणेकरांनी करून घेतला आहे. हेलन किंवा जयश्री टी म्हटल्यावर चित्रपट बघणारा एक आंबटशौकिन प्रेक्षकवर्ग असतो, तसाच रहस्यमय चित्रपटाचाही एक वर्ग असतो. या दोन्ही वर्गांची 'भूक' भागवणारा मसाला 'गोष्ट धमाल नाम्याची' मध्ये आहे.

आता थोडंसं चित्रपटाच्या टायटल्सबाबत. टायटल्ससाठी कार्टूनचा उपयोग करणं हे आता मराठी चित्रपटसृष्टीला नवीन नाही; पण त्या कार्टूनचा आणि चित्रपटाच्या कथानकाचा काही संबंध असावा लागतो किंवा त्या कार्टून फिल्ममधूनच चित्रपट सुरू होतो हे आपल्याला नवीन आहे दिग्दर्शकाला किंवा चित्रपटनिर्मात्याला ॲनिमेशन माध्यमाची पूर्ण जाण असायला हवी. चित्रपटाची विनोदी चित्रपट अशी जाहिरात करायची आणि टायटल्ससाठी कार्टूनचा वापर करून प्रेक्षकांना हसवायचं यापलीकडे ॲनिमेशन जाऊ शकतं. स्थिर चित्रांना चलत् करायचं आणि प्राण्यांच्या, माणसांच्या हालचाली प्रथम स्थिर करून चलत करायच्या हा मूळ फरक ॲनिमेशन आणि फिल्ममध्ये आहे आणि या फरकातच दोन्ही माध्यमांच्या मर्यादा स्पष्ट झालेल्या आहेत. या मर्यादा जाणूनच घाणेकरांनी ॲनिमेशनचा अभिनव पद्धतीनं प्रभावी वापर गोष्ट धमाल नाम्याची मध्ये आहे.

चित्रपटाच्या नावावरून जाहीरनाम्याप्रमाणे हे धमालनामा प्रकरण असावं असं वाटलं तर ती फसगत होईल. आता जाणूनबुजून ही फसगत व्हावी म्हणून दिग्दर्शक–निर्माता घाणेकरांनी अवतरणचिन्हे गाळलीत की अनवधानानं ती राहिलीत हे सांगणं कठीण आहे. असं असलं तरी चित्रपटात काही उणेपणा राहिलाय असा अर्थ कोणी काढू नये.

—उमेश आठलेकर

गोष्ट धमाल नाम्याची
जी'ज फिल्म शॉपनिर्मित
कथा : निर्माता : दिग्दर्शक :
गिरीश घाणेकर
पटकथा, संवाद : द. मा. मिरासदार
छाया : गिरीश कर्वे
आर्ट डायरेक्शन : गुरुजी बंधू

# जुगारी दुनियेतील संन्यस्त कलावंत

'राजकपूर इज अ ग्रेट शो-मन' पण बारा कोटांचं कापड फाडावं आणि त्याचा एक कोट शिवावा, असे त्याचे चित्रपट असतात.'

'व्ही. शांताराम फक्त तंत्र-विशारद आहेत. चित्रपट-निर्मितीचा मंत्र त्यांना अवगत नाही. त्यामुळे एखाद्या लहानशा उंदरावर मोठा दगड टाकावा, तसा त्यांच्या चित्रपटात तंत्राच्या ओझ्याखाली विषय चिरडला जातो.'


'राजेश खन्ना आणि संजीवकुमार हे माझ्या मते चांगले ॲक्टर आहेत. ती रेखाही एक चांगली पोरगी आहे; पण बाकीच्यांचं काही खरं नाही !'

'मला पुरुषार्थाने जेवढी साथ दिली तेवढी भाग्याने दिली नाही. आय ॲम अ व्हिक्टिम ऑफ ग्रेट लाइज !'

हिंदी चित्रपटसृष्टीच्या झगमगत्या दुनियेत गेलं जवळजवळ अर्धशतक ध्रुवताऱ्याप्रमाणं अढळ राहिलेले पंचाहत्तर वर्षांचे तरुण नाना पळशीकर या दुनियेचा हिशेब मांडताहेत 'माणूस' प्रतिनिधींना दिलेल्या खास मुलाखतीमध्ये....

पुढील अंकात प्रसिद्ध होणाऱ्या....

४ लाख ६३ हजार वाचकांची एकमुखी प्रशंसा




चौथी
डिलक्स
आवृत्ती

लेखक : वि. ग. कानिटकर

॥ पृष्ठसंख्या ५४० ॥ मोठा डबल क्राउन आकार ॥ भरपूर छायाचित्रे ॥
॥ मूळ किं. १४० रु. ॥ सवलतीत ९५ रु. ॥

चौथ्या डिलक्स आवृत्तीचे खास आकर्षण

**माइन काम्फ**

या हिटलरच्या दुर्मिळ आत्मचरित्राची सचित्र ओळख

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.


# समुद्राचे पाणी खारट का?

डॉ. सुभाषचंद्र सारंग

सागरांचे पाणी खारट का? या प्रश्नाचे उत्तर देताना लहान मुलांना एक जुनीच गोष्ट सांगितली जाते. समुद्राच्या तळाशी अव्याहतपणे एक मिठाची चक्की चालू आहे, हे त्या गोष्टीतले तत्त्व असते आपल्या धाकट्या भावाला फसवून त्याच्याकडून इच्छिलेली वस्तू देणारी चक्की घेऊन मोठा भाऊ होडीतून समुद्र पार करायला जातो आणि प्रवासात मीठ कमी पडल्याने ती जादूची चक्की सुरू करतो; पण ती त्याला बंद करण्याची युक्ती माहीत नसल्याने बाहेर पडणाऱ्या प्रचंड मिठामुळ होडी बुडून जाते. सागरतळाशी ती चक्की अजून चालूच आहे इत्यादि तपशील त्या कथेत असतो. तपशिलाचा भाग सोडला तरी सागरशास्त्रातील अत्याधुनिक संशोधनानुसार सागरतळावर सतत चालू असलेल्या मिठाच्या चक्कीचे तत्त्वच खरे ठरले आहे असे म्हणावे लागेल.

हे तत्त्व समजून घेण्यासाठी सागर निर्माण कसे झाले याविषयीची माहिती प्रथम करून घेणे आवश्यक आहे. परमेश्वराने पृथ्वीला अनेक बाबतीत झुकते माप दिले आहे. कारण पृथ्वीवर २।३ भाग पाण्याने व्यापला आहे. पृथ्वीभोवताली वातावरणामध्ये पाण्याचा अंश असतोच. पृथ्वीवर पाऊस पडतो, नद्या वाहतात; पण त्याबरोबरच पृथ्वीच्या अंतरंगातसुद्धा पाण्याचा साठा आहे. हा साठा प्रत्यक्ष पाण्याच्या स्वरूपात आहेच; परंतु इतर संयुगांच्या रूपानेसुद्धा तो मोठ्या प्रमाणावर आहे. सूर्यकुलातील इतर ग्रहांचा विचार केल्यास गुरु, शनी, युरेनस, नेपच्यून या ग्रहांना घनगाभा असला तरी त्या भोवतालचा कवचाचा भाग अद्यापि स्थिरावला नाही. शुक्रावर वातावरणच नाही, तसेच त्याची सूर्याकडची बाजू अतिशय तप्त आहे. बुधाला दाट वातावरण असले तरीही त्याचा पृष्ठभाग अतिशय तप्त आहे. बुध व शुक्र या ग्रहांच्यावर पाण्याचे अस्तित्व नाहीच. चंद्र आणि मंगळ या ग्रहांच्या पृष्ठभागावर ज्वालामुखींची विवरे आहेत. शिवाय त्या ग्रहांवर सतत उल्कांचा मारा होत असतो. मंगळावर पाण्याचा अंश असला तरीही तेथे महासागरांची निर्मिती झाली नाही. सारांश पृथ्वीच्या पृष्ठभागासारखा पृष्ठभाग व त्यावरील पर्यावरण फक्त पृथ्वीवरच आहे आणि त्यातही महासागरांच्या अस्तित्वाने आणि पृथ्वीवरील जलचक्रातील संतुलनामुळे आपण 'रम्य ही वसुंधरा' असे म्हणू शकतो. पृथ्वीवर असलेला पाण्याचा साठा युगानुयुगे तेवढाच राहिला आहे. कधी बर्फाचे प्रमाण वाढले आणि पाण्याचे प्रमाण कमी झाले तर कधी बर्फ वितळून पाण्याचे वाढले असेल. समुद्रांचे पाणी बाष्पीभवनाने कमी होते. पावसाच्या रूपाने ते पुन्हा पृथ्वीवर येत असले तरीसुद्धा वातावरणाच्या वरच्या थरामध्ये हैड्रोजन मुक्त होऊन काही पाणी नष्ट होते; परंतु पृथ्वीच्या अंतरंगातील पाणी बाहेर येत असल्याने पुन्हा पाण्याचा समतोल राखला जातो. पृथ्वीच्या अंतरंगातले हे पाणी म्हणजे केवळ भूजल नव्हे तर विविध संयुगांच्या स्वरूपातही पाण्याचे अस्तित्व असतेच. त्यामुळेच समुद्र पूर्णपणे आटून जात नाहीत.

पृथ्वीच्या निर्मितीच्या वेळी ती अतिशय तप्त व वायुरूप अवस्थेत होती. ती द्रवरूप व घनरूप अवस्थेत जात असताना पृथ्वीतून पाण्याच्या वाफेचे लोट बाहेर पडत होते. या वाफेच्या ढगांचे पृथ्वीभोवती दाट आवरण तयार होऊन त्यातूनच पावसाला सुरुवात झाली. लाखो वर्षे संततधार पाऊस पडत होता. अतिशय तप्त अशा पृष्ठभागावर तो पडल्यावर त्याची पुन्हा पुन्हा वाफ बनत होती. सततच्या पावसाने पृथ्वीचे तपमान ११००° सें.ग्रे. वरून १००° सें. ग्रे. पर्यंत कमी झाले व त्यानंतरचा पाऊस पृथ्वीवरील सखल भागात साठून प्राथमिक स्वरूपाचे समुद्र निर्माण झाले. सध्या महासागरात असलेल्या पाण्याच्या फक्त १० टक्के पाणीच त्या वेळच्या पावसामुळे निर्माण झाले. नंतरच्या काळात ज्वालामुखींमधून बाहेर पडणारे पाणी व पृथ्वीच्या अंतरंगातून बाहेर पडणाऱ्या पाण्याची भर पडून



महासागर पूर्णपणे भरून गेले.

सागरामध्ये पाणी कसे आणि कुठून आले हे पाहिले; पण त्यांवरून सागर निर्माण कसे झाले हे लक्षात येणार नाही. सागरतळ कसे निर्माण झाले ? हा महत्त्वाचा प्रश्न आहे. कारण सागरतळ म्हणजे काही पृथ्वीवरील केवळ सखल भाग नव्हेत. सागरतळ हे खंडापेक्षा पूर्ण भिन्न स्वरूपाचे आहेत. त्याची रचना, निर्मिती, विकास, तेथील प्रक्रिया या सर्वच गोष्टी खडाच्या तुलनेने वेगळया स्वरूपाच्या आहेत. गेल्या तीस वर्षांमध्ये महासागराच्या म्हणजे सागरतळाच्या निर्मितीवर नवा प्रकाश पडला आहे. भूशास्त्राच्या अभ्यासात सागरतळांचा अभ्यास ही अतिशय महत्त्वपूर्ण गोष्ट बनली आहे. सागरतळावरसुद्धा पर्वतांच्या रांगा असतात; पण ते पर्वत जमिनीवरील (खंडावरील) पर्वतांसारखे नाहीत. जगातले बहुतेक सर्व महत्त्वाचे पर्वत हे गाळाच्या खडकांवर दाब पडल्यामुळे निर्माण झाले आहेत. म्हणजेच ते घडीचे पर्वत आहेत. आल्पस्, हिमालय, रॉकीज, अँडीज अशा किती तरी घडीपर्वतांची उदाहरणं देता येतील. सागरतळावरील पर्वत मात्र अशा प्रकारचे नाहीत, ते गाळाच्या खडकांचे नाहीतच; परंतु दाब पडल्यानेसुद्धा निर्माण झालेले नाहीत. महासागराच्या मध्यातून जाणाऱ्या सागरी पर्वतांच्या रांगा या ज्वालामुखीय स्वरूपाच्या म्हणजेच अग्निजन्य आहेत. या पर्वतांची रचना पाहिली तर एक महत्त्वाची गोष्ट लक्षात येते. सर्वच सागरी पर्वतमालिकांमधून जाणाऱ्या सलग अशा भेगा आहेत. या भेगा लांबीच्या दिशेने आढळतात. भेगांमधून सतत लाव्हारस बाहेर पडतो व त्यापासून नवीन खडक अथवा सागरतळाचा भाग निर्माण होतो. सागरी पर्वतांच्या दोन्ही बाजूचा भाग दूर सरकत जातो आणि मधला भाग नव्याने निर्माण झालेल्या खडकाने भरून निघतो. याचाच अर्थ असा की, सागरतळाच्या मध्यापासून दोन्ही बाजूंना सागरतळ पसरत जातो. सागरी पर्वतांच्या दोन्ही बाजूस सागरतळावर वेगवेगळ्या कालखंडात निर्माण झालेल्या खडकाचे समांतर पट्टे आढळतात. त्या पट्टयामध्ये निर्मितीच्या वेळी पृथ्वीच्या

---

समजा १ जानेवारीस पृथ्वीची उत्पत्ती झाली असे मानले तर पुढील घटनांचे कॅलेंडर कसे असेल ? ढोबळमानाने असे म्हणता येईल की, फेब्रुवारीमध्ये भूकवचनिर्मिती झाली. मार्चच्या शेवटच्या आठवड्यात सर्वप्रथम महासागराची निर्मिती सुरू झाली; पण १५ जूनपूर्वीच सर्व महासागर निर्माण झाले. ऑगस्टमध्ये जीवसृष्टीची प्राथमिक सुरुवात झाली. ऑक्टोबरपर्यंत सर्व कनिष्ठ प्रकारची जीवसृष्टी निर्माण झाली. ऑक्टोबर–नोव्हेंबरमध्ये महाकाय प्राणी निर्माण झाले आणि वर्षाच्या शेवटच्या दिवशी म्हणजे ३१ डिसेंबरला दुपारी १०॥ नंतर मनुष्य निर्माण झाला ! आता हे कॅलेंडर ४०० ते ६०० कोटी वर्षांच्या भूशास्त्रीय प्रमाणावर बसविण्याचा प्रयत्न केला तर सागर किती पुरातन आहेत हे लक्षात येईल आणि त्याचबरोबर पृथ्वीवर माणसाचे अस्तित्व किती काल–परवाचे आहे हे लक्षात येईल. ◻

---

चुंबकीय क्षेत्रानुसार विकर्षरेषा निर्माण होतात. पृथ्वीचे चुंबकीय क्षेत्र स्थिर नाही. चुंबकीय ध्रुवांमध्ये काही विशिष्ट काळानंतर उलटापालट होत असते. त्यासाठी कधी ५० हजार वर्षे इतका कालावधी लागतो तर कधी त्यापेक्षा किती तरी जास्त कालावधी लागतो. चुंबकीय ध्रुवाच्या उलटापालटीचे प्रतिबिंब सागरतळावर रीजपाशी नव्याने निर्माण होणाऱ्या खडकामध्ये उमटते. म्हणजेच सागरी पर्वतामधील भेगेच्या दोन्ही बाजूंना उलटसुलट दिशेने चुंबकीय क्षेत्र असलेल्या खडकाचे पट्टे आढळतात. भेगेच्या दोन्ही बाजूस लगत असणारे खडकांचे पट्टे अलीकडच्या काळातले असतात तर भेगेपासून दूर खडांच्या जवळ असणारे सागरतळाचे भाग अधिक जुन्या काळातले असतात म्हणजेच सागरतळ पसरत असताना भेगेपासून सागरतळाचा भाग टप्प्या–टप्प्याने दूर जात असतो.

सागरी पर्वताच्या दोन्ही बाजूस सागरतळ पसरत जाण्याचा सरासरी वेग दर वर्षी सुमारे २ से. मी. इतका कमी आहे; पण पॅसिफिक महासागरात तो १६ सें मी. इतका जास्त आढळतो. अ‍ॅटलांटिक महासागरात हा वेग अतिशय कमी आहे. पॅसिफिक महासागराचा तळ १५ हजार कि. मी. रुंदीचा आहे. म्हणजे त्याच्या निर्मितीसाठी कमीत कमी १० कोटी वर्षे इतका प्रचंड काळ लागला असावा.

सागरतळाचे सागरी पर्वताच्या दोन्ही बाजूस होत जाणारे प्रसरण पाहिल्यास दोन प्रश्न स्वाभाविकपणे निर्माण होतात. एक म्हणजे सागरतळाचे स्वरूप कशा प्रकारचे आहे, तो पसरत जातो म्हणजे नेमके काय होते ? आणि दुसरे म्हणजे पसरत जाणारा सागरतळ खडाच्या किनाऱ्याशी धडकतो तेव्हा काय होत असेल ? नवीन संशोधनानुसार पृथ्वीचा पृष्ठभाग हा वेगवेगळ्या आकाराच्या प्लेटस्‌पासून बनला आहे असे सिद्ध झाले आहे. पृथ्वीच्या मृदु अशा गाभ्यावर या प्लेटस् तरंगत असतात. प्लेटस्‌ची जाडी ७० ते १०० कि. मी. असते. सागरी पर्वतातील सलग भेग म्हणजे जवळच्या दोन प्लेटस्‌मधील सीमारेषा होय. पॅसिफिक, इंडियन, अन्टार्क्टिक, अमेरिकन, आफ्रिकन आणि युरेशियन अशा सहा प्रमुख प्लेटस् आहेत. या प्लेटस् प्रचंड आकाराच्या आहेत व त्यामध्ये सागरतळ व खंडेसुद्धा समाविष्ट आहेत. म्हणजेच महासागराचे तळ हे सामान्यपणे दोन भिन्न प्लेटस्‌चे बनले आहेत. कारण प्रत्येक महासागराच्या तळाशी सागरी पर्वत व त्यातील भेग आहेच. काही प्लेटस् आकाराने छोटया व फक्त खंडापुरत्या मर्यादित आहेत. सागरी पर्वतातील भेगेपाशी दोन्ही प्लेटस्‌ची वाढ होऊन त्याचे प्रसरण होते ही गोष्ट स्वाभाविकच; पण सरकणाऱ्या प्लेटस् खंडाच्या किनाऱ्याशी आल्यावर काय होते ?

द. अ‍ॅटलांटिक किनाऱ्यावर काहीच होत नाही. कारण द. अ‍ॅटलांटिक सागरतळावर मिडअ‍ॅटलांटिक रीजच्या दोन्ही बाजूस ज्या प्लेटस् आहेत त्या प्लेटस्‌मध्ये दोन्ही बाजूचे भूभागसुद्धा समाविष्ट आहेत. म्हणजेच खंड व सागरतळ मिळून एकच प्लेट आहे. तिचा प्रसरण पावणारा सागरतळ आणि खड यामध्ये संघर्ष नाही. पॅसिफिक किनाऱ्यावर खड आणि सागरतळ या भिन्न प्लेटस् असल्याने तिथे मात्र विस्तारणारा सागरतळ आणि खंडाचा किनारा यामध्ये संघर्ष

आहे. पॅसिफिक सागरतळाची प्लेट विस्तारत असताना त्यांच्या किनाऱ्यापाशी ती खंडाच्या प्लेटखाली घुसते. अशा ठिकाणी सागरी डोह निर्माण होतो. सागरतळावर जे गाळाचे थर असतात त्यांना घड्या पडतात आणि किनाऱ्याशी समांतर अशी पर्वतश्रेणी तयार होते. त्यालगतच खाली घुसणाऱ्या प्लेटमुळे सागरी डोहाची मालिका तयार होते. सागरी डोह आणि लगतच उंच असे घडीचे पर्वत अशी रचना निर्माण होते. हा भाग भूगर्भशास्त्रीयदृष्ट्या अत्यंत स्थिर असतो. पर्वतीय विभागात ज्वालामुखीचे पट्टे आढळतात तर त्यालगतच सागरी विभागात भूकंपाचे पट्टे आढळतात. काही ठिकाणी सागरी प्लेट बेटाच्या खाली घुसते. तिथे बेटावर ज्वालामुखी आणि लगतच्या सागरी विभागात भूकंप-पट्टे निर्माण होतात. कॅरेबियन, अॅल्यूशियन इत्यादी बेटांवर त्यामुळेच ज्वालामुखीचे प्रमाण जास्त आहे, तर जपानच्या समुद्रात आणि ओखोटोस्क समुद्रात भूकंप-पट्टे आहेत. जपान, फिलिपाइन्स इत्यादी बेटांलगतच खोल सागरी डोह निर्माण झाले आहेत.

सागरनिर्मिती होऊन ४ महापद्म वर्षे झाली; पण सागरतळावर साचणाऱ्या प्रचंड गाळाच्या थराचे १५ कोटी वर्षांपूर्वीचे साठे आज सागरतळावर आढळत नाहीत. ८ कोटी वर्षांपूर्वीचे गाळाचे थर अभावानेच आढळतात. याचा अर्थ असा की, त्यापूर्वीच्या गाळांचे थर महासागरातून, सरकणाऱ्या सागरतळाबरोबर खंडाच्या किनाऱ्याशी वाहून गेले व एकत्रित झाले. त्यांच्यावर दाब पडून काही ठिकाणी खडांच्या किनाऱ्यालगत पर्वतमालिका निर्माण झाल्या. काही थर खाली खचणाऱ्या प्लेटस्‌बरोबर सागरी डोहातून पृथ्वीच्या अंतरंगात गडप झाले.

वरील सर्व तत्त्वांचा आधार घेऊन आपल्याला सागरतळाची निर्मिती व वाढ याविषयी स्पष्ट असे चित्र निर्माण करणे सहज शक्य आहे. ४०० कोटी वर्षांपूर्वी पृथ्वीवर पँजी हे एकच खंड होते. त्या काळात पृथ्वीवर महाभयकर उत्पात होऊन या खंडाची निर्मिती झाली व त्याबरोबरच महासागर, वातावरण याचीसुद्धा निर्मिती झाली; पण तेव्हा महासागर हे आजच्याइतके विस्तृत नव्हतेच. शिवाय अनेक महासागर निर्माणसुद्धा झाले नव्हते. गेल्या १५ कोटी वर्षांमध्ये भूपृष्ठाच्या वेगवेगळ्या प्लेटस् विस्तारत गेल्यामुळे महासागरांचा विस्तार वाढत गेला आणि पँजीचे तुकडे होऊन खंडाचे अनेक भाग परस्परांपासून दूर सरकत गेले. महासागरातील रीजपाशी प्लेटस्‌ची वाढ होते व सागरांच्या किनाऱ्याकडे प्लेटस् सरकत जाऊन खंडाच्या प्लेटखाली घुसतात. तेथील सागरी डोहामध्ये प्लेटस् नष्ट होतात म्हणजेच पृथ्वीच्या अंतरंगात घुसतात व त्या वितळून निर्माण होणाऱ्या पदार्थाचा उपयोग पुन्हा प्लेटस्‌च्या वृद्धीसाठी होतो.

सागरतळाच्या निर्मितीविषयीचे हे नवे संशोधन सागराचा खारटपणा आणि सागरतळावरील धातूच्या गोट्याची निर्मिती यांचे स्पष्टीकरण देण्यास फारच उपयुक्त आहे. सामान्यपणे असंख्य नद्यानी क्षारयुक्त गाळ समुद्रात वाहून आणल्याने समुद्राचे पाणी खारट झाले आहे, अशा प्रकारचे सिद्धान्त १७ व्या शतकामध्ये माडण्यात आले होते. त्यानतर सागरतळावरील खडकातील क्षार पाण्यात मिसळतात व त्यामुळे पाणी खारट होते अशीही पुस्ती वरील सिद्धान्तांना जोडण्यात आली. नव्या संशोधनानुसार सागराच्या मध्यभागी असलेल्या पर्वतांतील भेगामधून बाहेर पडणारा लाव्हा व त्यामधील क्षार यामुळेच सागराचे पाणी खारट बनते असा सिद्धान्त माडण्यात आला आहे. सागरी पर्वतातील भेगामधून आणि सागरी विभागातील ज्वालामुखीच्या उद्रेकाच्या वेळी क्षारयुक्त पाणी व अनेक क्षार बाहेर पडत असतात. सोडियम क्लोराइड ( मीठ ) हा त्यामधील प्रमुख क्षार असून त्याशिवाय इतर ९० क्षार सागराच्या पाण्यामध्ये मिसळतात सागरतळावरील भेगांमधून बाहेर पडणारा लाव्हा, सागराच्या पाण्याचे होणारे बाष्पीभवन, समुद्राला येऊन मिळणाऱ्या नद्यामुळे त्यात पडणारी गोड्या पाण्याची भर आणि सागरतळावर होणारे संचयन यामध्ये एक प्रकारचे संतुलन साधले आहे, म्हणूनच सागर निर्माण झाल्यापासून आजपर्यंत सागराच्या क्षारतेमध्ये फारसा फरक पडलेला नाही.

सागरतळावरील भेगामधून बाहेर पडणाऱ्या लाव्हामध्ये असंख्य खनिजे व धातू असतात. सागरतळावरील विशिष्ट सूक्ष्म पदार्थांच्या भोवती हे धातू एकत्र येऊन त्यांच्यापासून धातूचे गोटे निर्माण होतात. म्हणूनच खोल सागराच्या तळावर धातूच्या गोटयांची पखरण झालेली आढळते. सागरशास्त्रातील सागरतळाच्या निर्मितीबद्दलच्या गेल्या दशकातील संशोधनाच्या आधारे सागरतळाची रचना, सागरातील पाण्याचा खारटपणा, सागरी गर्तांची निर्मिती आणि सागरतळावरील गोट्याची निर्मिती यासारख्या अनाकलनीय आविष्काराबद्दल स्पष्टीकरण देणे सोपे झाले आहे.

☐


**DIAMOND GROUP**

Ward 9, H. No. 637 / 1, Station Road,
ICHALKARANJI

*For* **quality Warping, Sizing, weaving, Bleaching, & Mercersing.**

*Phone : 2442*

# सप्रेम नमस्कार

पृष्ठ २ वरून

¤ 'माणूस' साप्ताहिक, वासंतिक विशेषांक. २८ मे ८३ मधील अरुणा साठे यांचा 'माझा घटस्फोट' हा लेख वाचला.

विस्कटलेल्या संसाराचे चित्र रेखाटणारे हे एक प्रांजल निवेदन हातचे फारसे राखून न ठेवता केलेले.

दोन परस्पर विरोधी व्यक्तिमत्त्वांची सांगड घातली गेल्याने इथे संघर्ष निर्माण झाला आहे. 'समानधर्मेषु विषयेषु सख्यम्' हे खरे असले तरी भिन्न स्वभावधर्माच्या व्यक्तीदेखील गुण्यागोविंदाने एकत्र नांदू शकतात. एकमेकांच्या व्यक्तित्वाविषयी आणि म्हणून एकमेकांच्या आवडीनिवडींविषयी आदर बाळगून असतील तर आणि तरच. त्यासाठी तेवढे सुसंस्कृत मन मात्र हवे आणि या गोष्टीवरच अरुणाच्या कथेने नेमके बोट ठेवले आहे.

निर्बुद्ध, अहंकारी आणि क्षुद्र वृत्तीच्या माणसाबरोबर जन्मभर खितपत पडून राहण्यापेक्षा आपल्याबद्दल पुरेसा आत्मविश्वास बाळगणाऱ्या अरुणाने स्वतंत्र, निर्भर आयुष्य जगण्याचे ठरवले, हा तिचा निर्णय मला धीटपणाचा, शहाणपणाचा आणि समाजाला मार्गदर्शनपर असा वाटतो.

सुशिक्षित पत्नीनेही स्वतःचे सगळे आनंद, इच्छा मारून स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाला फुटणारे धुमारे छाटून टाकून एखाद्या सामान्य व्यक्तीच्या पायाशी आपले आयुष्य वाहायचे, नवऱ्याच्या सावलीप्रमाणेच वावरायचे, ही पुरुषप्रधान समाजातील संकल्पना उलथून टाकली तरच यापुढे संसार सुखाचे होणार आहेत. पत्नीच्या अस्मितेला पुरुषाच्या अस्मितेएवढीच प्रतिष्ठा लाभली तरच मनाचीही जुळणी होणार आहे. मनाच्या जुळणीशिवाय संसाराची इमारत घट्ट उभी राहणे कठीण आहे. हेच अरुणाची कथा स्पष्टपणे दाखवून देत नाही काय ?

२५ जून ८३ डॉ. प्रमिला गोखले
मुंबई

¤ आपण काढलेल्या सर्वांगसुंदर व संग्राह्य वासंतिक विशेषांकाबद्दल आपले अभिनंदन करतो. विषय-निवडीबद्दल धन्यवाद.

श्री. दाभोळकरांचा गोंडा प्रकल्पासंबंधी माहिती देणारा लेख विशेष आवडला. लेख प्रदीर्घ, सविस्तर, कार्याला न्याय देणारा व मोकळ्या मनाने दोष दाखवणारा आहे. संघप्रणीत कार्याचे मूल्यमापन करणे अवघड असते. कारण प्रथमदर्शनीच कार्यकर्त्यांची जिद्द, तळमळ, त्याग, नम्रता, शिस्त यामुळे माणूस प्रभावित होतो. मग दोष दाखवणे अवघड जाते.

लेखकाने दाखवलेला कार्यकर्त्यांचा समांतर सेवाभावी कार्याबद्दलच्या अज्ञानाचा दोष बराचसा बरोबर आहे. आशांकित असण्यात वाईट नाही; पण उघड्या डोळ्यांनी जगातील परिवर्तन पाहून, इतरांचे अनुभव ध्यानात घेऊन पाऊल पुढे टाकता आले तर फायद्याचेच.

डाव्या विचारसरणीच्या लोकांचा प्रकल्पाला असलेला विरोध मात्र समजूच शकत नाही. गरीब लोकांचे उत्पन्न वाढणे महत्त्वाचे की त्याचे श्रेय कोणाला व कसे हा वाद महत्त्वाचा ? एवढ्या बाबतीत तरी पक्षीय मतभेद आड येऊ नयेत. नानाजींनी वजन वापरून लोकांनाच कर्जे दिली, स्वतःचे घर तर भरले नाही ना ? 'कामापेक्षा गाजावाजा जास्त' हा प्रकार संघाबद्दल अद्याप ऐकला नव्हता. त्यामुळे खरा वाटत नाही.

तिन्ही लेखांचा एकंदर परिणाम म्हणून प्रकल्पाविषयी चांगले मत बनते. काही सुधारणा, काही जागृती होते आहे याविषयी विश्वास वाटतो. असे असूनही शेवटी लेखकाने ध्येय-उद्दिष्टाविषयी ज्या शंका व्यक्त केल्या आहेत त्या पटत नाहीत. जयप्रभाग्राम अधिक चांगले व्हावे याबद्दल दुमत नाही; पण आर्थिक प्रश्न असतील.

४ जून ८३ उपेंद्र कुलकर्णी
आय. आय. टी. पवई

□



MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage–No. 11 ) Regd. No. PNCW–28

मुलतान

भारताच्या सीमेनजिक असलेले पाकिस्तानातील एक शहर.

सत्तेवर येऊन भुत्तोंना जेमतेम महिनाच उलटलेला होता.
ब्रिटिशांनी बांधून ठेवलेल्या एका शाही निवासात पाकिस्तानातील निवडक अणुशास्त्रज्ञांची आणि उच्च अधिकाऱ्यांची बैठक भुत्तोंनी बोलावलेली होती. जानेवारी १९७२.

या बैठकीत भुत्तोंनी आपली मनीषा प्रकट केली–

**' पाच नाही, तीन वर्षांतच मला अणुबाँब हवा आहे.... ! '**

बांगला देशच्या युद्धात पाकिस्तानचा पराभव झालेला होता. पाकिस्तानचे तुकडे झाले होते; पण भुत्तो स्वत:ला भारतावर सत्ता गाजवणाऱ्या मोगल सम्राटांचे आपण वंशज आहोत असे मानीत होते. दरिद्री आणि अपमानित पाकिस्तानला समस्त तिसऱ्या जगताच्या शिखरावर नेऊन पोहोचविण्याच्या दुर्दम्य महत्त्वाकांक्षेने आणि सूडभावनेने त्यांना पछाडलेले होते

म्हणून मुलतानला खास बैठक बोलावली गेली होती.

या बैठकीच्या क्षणापासूनच परमाणू विश्वातील आणि औद्योगिक क्षेत्रातील गुपिते हस्तगत करण्याची, त्यासाठी आंतरराष्ट्रीय हेरगिरी करण्याची एक अचाट साहसी योजना आखली गेली.

पुढे भुत्तो फासावर लटकले; पण योजना यशस्वी झाली. आज पाकिस्तान अण्वस्त्रसज्ज आहे !

या अण्वस्त्रसज्जतेची रहस्यमय आणि भारताच्या दृष्टीने तितकीच भीषण ठरू शकणारी कहाणी विस्ताराने प्रथमच सांगणारी नवी, डोळे उघडवणारी लेखमाला....

# द इस्लामिक बाँब

लेखक : **Steve Weissman** ( न्यूयॉर्क टाइम्स )
**Herbert Krosney** ( न्यूयॉर्क टाइम्स )

**अनुवादक : मोरेश्वर तपस्वी, दिल्ली.**

**माणूस :** १६ जुलै अंकापासून

**वाचकांनी आपली मागणी जवळच्या विक्रेत्याकडे त्वरित नोंदवावी.**